प्रकरण - ०१
प्रस्तावना

भारतीय समाज हा जगातील एक प्राचीन समजला जातो. प्राचीनतमतेच्या बाबतीत केवळ चिनी समाजच भारतीय समाजाशी बरोबरी करु शकतो. अन्य प्राचीन ग्रीक, रोमन, सुमेरीयन इत्यादी समाज कालोधात नष्ट झाले. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित विविधता आणि त्या विविधतेतून निर्माण आलेली समृध्दी जेवढी भारतीय समाजात दिसून येते तेवढी जगातील अन्य कोणत्याही समाजात दिसून येत नाही. भारतीय समाज प्राचीन असला तरीही काळानुसार त्यात सतत बदल झालेले दिसून येतात. म्हणून भारतीय समाज प्राचीन असला तरीही तो संस्कृती उत्क्रांतशील आहे असे म्हणता येते. भारतीय समाजातील विविधता वंश, जाती-जमाती, भाषा व प्रदेश या अंगांनी प्रतिबिंबित झाली आहे. या शिवाय लोककला, वस्त्र, चालीरीती, आहार पध्दती इत्यादी बाबतीतही प्रदेशा-प्रदेशानुसार विविधता असल्याचे दिसून येते. थोडक्यात भारतात विभिन्न प्रांतामधील लोकांच्या सामाजिक वर्तनकृतीचे आकृतीबंध हे बहुरंगी स्वरुपाचे आहे. त्याची ओळख करून घेतल्या शिवाय भारतीय समाजाचे आकलन होणे शक्य नाही, असे मत बहुतांश अभ्यासकांनी नमूद केले आहे.

अनेक भारतीय आणि पाश्चिमात्य विद्वानांनी भारतीय समाज व संस्कृतीच्या जडणघडणीचे अध्ययन केले आहे. अशाप्रकारचे अध्ययन विभिन्न सामाजिक शास्त्रामध्येही विपूल प्रमाणात झाले आहे व होत आहे. असे असूनही या प्रकारचे अध्ययन हे सर्वासाठी एक प्रकारचे बौध्दीक आव्हान ठरते, असे म्हणता येईल. कारण अशा अध्ययनाचा प्रारंभ कोणत्या कालखंडापासून करावा ? असा प्रश्न अभ्यासकासमोर उपस्थित होतो. सिंधू सभ्यता ही आर्यांच्या वैदिक संस्कृतीच्या पूर्व काळातील आहे. द्रविडी भाषा बोलणारे लोक आर्यांच्याही आधी हिंदुकूश पर्वतराजी ओलांडून भारतात आले. असे असले तरीही ते भारताचे मुळ रहीवाशी नव्हे, असे सिंधू नदीच्या खोऱ्यात सापडलेल्या अवशेषांच्या आधारे म्हणता येते.[१]

भारतीय समाजरचनेचे अध्ययन हे एक व्यापक स्वरुपाचे अध्ययनक्षेत्र आहे. भारतातील विभिन्न वंशिक, भाषिक, धार्मिक गट या सोबत विशेषत्वाने कुटुंब, विवाह, जाती-जमाती, जातपंचायत या सर्वाचे अध्ययन भारतीय समाजरचना समजून घेण्यासाठी करणे आवश्यक आहे. या देशामधील प्रत्येक माणसाच्या समाज व जातीनुसार जीवन जगण्याच्या पध्दती देखील वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. प्रत्येक व्यक्तीची जात वेगळी आहे, तिचा धर्म वेगळा आहे. त्याच बरोबर त्यांचे जगणे, मरणे देखील वेगळे आहेत. ज्या व्यक्तीचा जन्म ज्या जातीत होतो, तेव्हा त्याच जातीत मरावे हे आपल्या धर्मशास्त्राचे नियम आहे.

याचा परिणाम म्हणून कोणतीच व्यक्ती सहजासहजी आपला धर्म, आपली जात, आपली परंपरा बदलण्याचा प्रयत्न करीत नाही. शक्यतोपर्यंत प्रत्येक माणुस आपल्या जाती आणि धर्माच्या नियमा प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतो. अनेक धर्म असलेल्या समाजव्यवस्थेत जन्मावरुन माणसाची जातवार विभागणी झाली आहे. प्रत्येक जातीचा, समाजाचा आणि त्या माणसाच्या व्यवसायावरुन त्याचा सामाजिक दर्जा ठरविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक जातीच्या व समाजाच्या वस्त्या वेगवेगळ्या आहेत. त्यांचे पिण्याच्या पाण्याचे पानवठे वेगवेगळे आहेत. त्यांची स्मशानभूमी वेगळी आहे. त्याचे दैनंदिन जीवनजगणे वेगळे आहे. यालाच पांरपारिक समाजातील लोक समाज व्यवस्था असे म्हणतात. भारतीय समाजाचा ज्यांनी अतिशय जवळून अभ्यास केला ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. बाबासाहेब आंबेडकरांनी अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेचा उल्लेख बिनपायऱ्याची शिडी असा उलेख केलेला आहे.[२] गांवगाड्यात राहत नाही व गांवगाड्याबाहेरही राहत नाही, त्यांना मात्र सतत भटकंती करावी लागते. अशा समाजाचा उल्लेख भटका समाज म्हणून केला जातो. महाराष्ट्रामध्ये अनेक भटक्या जाती-जमातीचे लोक राहतात त्यामध्ये बंजारा समाज हा एक समाज आहे.[३]

महाराष्ट्र शासनाने १९ फेब्रुवारी १९८६ च्या मुळ भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या यादीमध्ये बंजारा समाजाचाही समावेश केलेला आहे. गांवगाडा अथवा वेशीच्या आत आणि गांवगाड्याबाहेर राहणाऱ्या समाजापेक्षाही बंजारा समाजाचे जीवन वेगळ्या स्वरुपाचे आहे. जाती व्यवस्थेमध्ये हा समाज अस्पृश्य मानलेला नाही किंवा त्यांच्याशी व्यवहार करतांना अस्पृश्यता पाळली जात नाही. त्यामुळे या समाजाचे दु:खणे वेशीबाहेरच्या अस्पृश्य समाजापेक्षा वेगळे आहे. बंजारा समाजातील लोकांना भटकंती आणि उपरेपणाची अधिक खंत आहे. हा समाज जाती व्यवस्थेच्या एक भाग आहे आणि नाही असे त्यांचे स्वरुप आहे. त्यामुळे प्रत्येक समाजातील लोकांच्या प्रश्नांची तऱ्हा वेगळी आहे. त्यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न वेगळे आहेत. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही. गोर बंजारा किंवा बंजारा समाजाचा प्राचीन इतिहास पाहिला असता बंजारा हा समाज भटका आणि वृत्तीने व्यापारी असा उलेख बळीराम पाटील यांच्या पुस्तकात सापडतो.[४] कारण पुर्वीच्या काळी बंजारा समाज हा डोगर, दऱ्याखोऱ्यात राहत असून तो बैलाच्या पाठीवरुन मालाची ने आन करणे, शिकार करणे, गोणपाट तयार करणे व विकणे ही त्या समाजाची वैशिष्ट्ये होत. स्वत:ला क्षत्रिय, आर्यवंशीय आणि राजपूत समजणाऱ्या या समाजाला परिवर्तनाच्या प्रक्रियेत व विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक, राजकिय आणि आर्थिक क्षेत्रात म्हणावी ऐवढी प्रगती करता आलेली नाही. परिवर्तनाच्या काळात आज अमुलाग्र बदल झालेला असतांना आज हा समाज आहे त्या ठिकाणीच आहे असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही.

भारताला स्वातंत्र्य मिळून आज बराचसा कालावधी लोटला तरी या समाजाची प्रगती झालेली दिसून येत नाही. 'भारतावर अनेक परकीय लोकांची सत्ता आणि आक्रमणे होऊन देखील या समाजानी आपली प्राचीन तांडा संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.'[५] अशा बंजारा समाजाच्या संस्कृतीचे आकलन होण्यासाठी, त्याचे रहस्य काय आहे ? हे शोधण्याचा प्रयत्न या अभ्यास विषयाच्या माध्यमातून करण्यासाठी आणि त्यांच्या प्रथा, पंरपरा, चालीरिती, लोकाचार, लोकनिती, पोशाख पध्दती, राहणीमान, खानपान, धर्मभोळेपणा, श्रध्दा व अंधश्रध्दा इत्यादी सर्व टिकवून ठेवण्या पाठीमागचा उदेश काय आहे, ते कशामुळे प्रयत्न करतात ? हे सर्वस्वी तपासून पाहण्यासाठीच या विषयाची निवड करण्यात आली आहे. बंजारा समाजातील बोलीभाषेला कसल्याही प्रकारची लिपी नसतांना देखील या समाजातील लोकांनी हजारो वर्षापासून बोलीभाषेच्या माध्यमाद्वारे आपली संस्कृती कायम टिकावून ठेवली आहे.

प्रत्येक जाती - जमातीची गुणवैशिष्ट्ये वेगवेगळी असली तरी इतर जाती - जमातीचा विचार केला असता बंजारा समाजाच्या गीतांच्या पंरपरा, विवाह पध्दती, विवाहामध्ये रडण्याची पध्दत, हुंडापध्दत, इतर समाजापेक्षा वेगळ्या प्रकारची आहे. बंजारा समाजातील सण - उत्सव पध्दती ह्या देखील वेगळ्या पध्दतीने साजरे केले जातात. या सर्वांची माहिती जाणून घेण्यासाठी 'वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाज शास्त्रीय अभ्यास' या विषयाची निवड करण्यात आली आहे. पंरपरागत असणारा बंजारा समाज आणि आजच्या बंजारा समाज यांच्यामध्ये असणारी समाजिक भावना, वैचारिक भावना जाणून घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. डोंगर, दऱ्याखोऱ्यात आपले वस्तीस्थान मांडून बसलेला समाज शासनाच्या उदासीन धोरणामुळे मुख्य प्रवाहात आलेला नाही. काही लोकांचा अपवाद वगळता हा समाज शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक व राजकिय दृष्ट्या मागासलेला आहे. या करिता बंजारा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक जीवन कशा प्रकारचे आहे. हे मुख्य प्रवाहात आणून त्यावर प्रकाश टाकण्याचा एक छोटासा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनाचा विषय निवडण्याचे कारण व त्यामागचा उद्देश असा आहे की, आजच्या मितीपर्यंत बंजारा समाजावर अनेक संशोधनात्मक अध्ययने अथवा अभ्यास होत आलेला आहे. परंतु बीड अध्ययने ठरावीक प्रदेशापुरतीच मर्यादित आहेत. आता पर्यंत संशोधकाच्या ज्ञात माहितीच्या आधारे जेवढी काही अध्ययने झालेली आहेत. याचा आढावा या ठिकाणी घेण्यात आलेला आहे. तो खालील प्रमाणे आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

१. डॉ. रुक्मिणी पवार यांनी कर्नाटक राज्यतील 'नंदीबीजलगांव' या खेड्याच्या अंतर्गत येणारा 'देवसिंग नाईक तांडा' याची निवडकरुन व्यष्टीअध्ययन पध्दतीने अभ्यास केलेला आहे.

२. डॉ. गणपत राठोड यांनी 'बंजारा लोक गितोंका सांस्कृतिक अध्ययन' विशेष संदर्भ बीड जिल्हा. असा विषय निवडून बंजारा समाजातील विविध गितांचे संकलन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३. डॉ. सुभाष राठोड यांनी 'लमाण बोलीभाषाका समाजाभाषा वैज्ञानीक अध्ययन' असा विषय निवडून बंजारा समाजाची बोलीभाषा यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.(उस्मानाबाद)

४. डॉ. मोहन राठोड ''गोरमाटी भाषा का भाषावैज्ञानीक अध्ययन'' विशेष संदर्भमें माहाराष्ट्र असा विषय घेऊन बंजाराच्या बोलीभाषेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

५. डॉ. किसन पवार ''मराठवाड्यातील गोर बंजाराचा अभ्यास'' असा विषय निवडून एतिहासिक दृष्टीकोणातून बंजारा समाजाची ऐतिहासीक पर्श्वभूमी विषयी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

६. श्री. जाधव राजेंद्र रामभाऊ यांनी एम. फिल. साठी 'बंजाराच्या विवाहातील लोक गितांचा अभ्यास' असा विषय निवडणून बंजारा समाजातील विवाहामध्ये कोणकोणत्या प्रकारचे गीत गायीले जातात याचा अभ्यास केलेला दिसून येतो.

७. डॉ. बबन पवार ''बंजारा समाजाचा इतिहास'' असा विषय निवडणून बंजारा समाजाची ऐतिहासीक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

८. श्री. रमेश धोंडीराम राठोड ''बंजारा समाजाची सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि शैक्षणिक परिस्थिती'' विशेष संदर्भ जालना जिल्ह्याची निवड करुन तो अभ्यास विषय एम. फिल. साठी केलेला आहे.

संशोधकाच्या ज्ञात माहितीच्या आधारे उपरोक्त संशोधनामध्ये जे काही निष्कर्ष काढलेले आहेत ते संख्यात्मक व टक्केवारीच्या स्वरुपात आढळून आले नाही. कारण बरेचशे अध्ययन कर्ते हे मराठी व हिंदी विषयाचे असल्याने त्यांनी मांडलेले निष्कर्ष हे ढोबळ मानाने मांडल्याचे दिसून आले.

प्रस्तुत संशोधनात वरील प्रमाणे जी काही चुक झालेली आहे. ती या अध्ययनाच्या माध्यमातून भरुन काढण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, बंजारा समाजावर आतापर्यंत जी काही अध्ययने झालेली आहेत. ती काहीशा बाबतीमध्ये परीपूर्ण वाटत नाही. यासाठी बंजारा समाजातील असणाऱ्या श्रध्दा, अंधश्रध्दा, आर्थिक माहिती, शैक्षणिक माहिती व राजकिय माहिती तक्त्याच्या आधारे संरव्यात्मक व टक्केवारीच्या स्वरुपात मांडणी करुन योग्य तो निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे. बंजारासमाजाच्या बाबतीत असणारी माहिती मुख्य प्रवाहात अणण्यासाठी बंजारा समाजाचा विविध अंगाने अध्ययन करणे आवश्यक वाटते. जो अभ्यास विषय संशोधनासाठी निवडला आहे तो पूर्णत: बंजारा समाजाचा असून तो अभ्यास विषय समाजशास्त्र या ज्ञानशाखेतील आहे. अखील भारतीय बंजारा समाजाचा अभ्यास करणे शक्य नसले तरी वडवणी ताक्यातील बंजारा समाजाच्या अध्ययनावरुन संपूर्ण बंजारा समाजाचे सामाजिक व आर्थिक जीवनाचे विविध पैलु समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये (१) 'बंजारा' शब्दाची उत्पती, (२) बंजाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, (३) बंजारा समाजातील देवदेवता, (४) बंजाराची तांडा व्यवस्था, (५) बंजारा समाजातील पोट जाती (पोट भेद) (६) वडवणी तालुक्यातील बंजारा समाज इ. माहिती या प्रकरणात दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

बंजारा नावाची उत्पती

पूर्वीच्या काळी बंजारा समाजाची ओळख ही व्यापार करणारी जमात म्हणून होती. हा समाज व्यापार करतांना वाहतुकीचे साधन म्हणून बैलाचा वापर करीत असे. 'बैलाच्या चारा पाण्याची सोय व्हावी महणून बंजारा समाजातील लोकांनी राहण्याचे ठिकाण 'जंगल' यांची निवड केली.'[६] 'जंगल' हा मराठीतील शब्द असून त्यास हिंदी किंवा मारवाडी भाषेमध्ये 'बन' असे म्हटले जाते. म्हणून 'बनात' राहणारा अथवा बनात वास्तव्य करणारा तो बंजारा अशी बंजारा शब्दाची उत्पती झालेली दिसून येते.[७]

बंजारा शब्दाचा उत्पती बदल अनेक विचारवंताची वेगवेगळी मते आहेत. परंतु बंजारा समाजाच्या बाबतीत अत्यंत सखोल असे अध्ययन करुन पुस्तक लिहणारे अभ्यासक श्री. पांडूरंग आंधळे पाटील यांनी बंजारा शब्दाच्या उत्पती बाबत विविध मते प्रतिपादीत केलेली आहेत. ती अशी.....

१. बनज + रा = बनजारा :-

''पांरपारीक समाजव्यवस्थेमध्ये बंजारा समाजाचा मुख्य व्यवसाय व्यापार हा होता. परंतु या समाजातील लोक व्यापारासाठी केवळ बैलाचाच वापर करीत असे. व्यापाराला संस्कृत भाषेमध्ये 'वाणिज्य' असे म्हणतात. परंतु 'वाणिज्य' या शब्दावरुन 'बनज' हा शब्द तयार झाला. हिंदी हा शब्द व्यापार या अर्थाने वापरला असला तरी तो धान्याचा व्यापार करणाराच त्याचा वापर करीत असे. तेव्हा बंजारा - बनजारा हे धान्याचे व्यापार करणारे होतं.''[८]

२. बंजार = पडीत जमीन :-

बंजारा हा उर्दू भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ पडीत जमीन असा होतो. हिंदी भाषेत त्यास 'बंजाड असे म्हणतात. मराठी भाषेमध्ये 'बंजाड' या शब्दाला 'बंजाड' असे म्हटले जाते. 'बंजाड' हा शब्द (वांझ किंवा वाझोटी) अथवा मुलबाळ न होणाऱ्या स्त्रीयाबद्दल वापरतात. बंजार याचा अर्थ निष्फळ असा आहे. तेव्हा बंजारा म्हणजे पडीत जमीनीची मेहनत करणारा, त्या जमिनीशी शत्रूसमान झगडून तिचे मुळ स्वरुप बदलून तिला पिकास योग्य करणारा असा तो बंजारा + अरी, बंजारी वा बंजारा होय[९] बंजारा लोकांचा 'बंजारा' जमिनीशी मिकटचा संबंध होता. व्यापारा निमीत्त बाळगलेल्या हजारो - लाखो गोर वंशाची चारापाण्याची व्यवस्था बंजारा या जमीनीवर करीत असे, तेव्हा बंजारा असे म्हटले जात.

३. बंजारा = धान्याचा व्यापारी :-

बंजारा हा उर्दू भाषेतील शब्द असून ती भारताची भाषा आहे, तसेच हिंदी देखील भाषा आहे. परंतु दोन्ही भाषांच्या लिपी मात्र वेगवेगळ्या आहेत. परंतु उच्चार आणि शब्दाचा अर्थ जवळजवळ सारखाच आहे. 'बंजार' या हिंदी भाषेतील शब्दाचा अर्थ व्यापारी असा होतो. 'बंजार' या शब्दास आणि ई प्रत्यय लागून 'बंजारी' असे शब्द रुढ झाले आहेत.[१०]

४. बनज - व्यापार :-

'बनज' हा पंजाबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ व्यापार असा होतो. त्यास उपपद व प्रत्यय लागून बनजारा, बंजारी असे शब्द रुढ झाले आहेत. म्हणूनच बनज करणारा तो बनजारा, बंजारा किंवा बंजारी होय.[११]

५. बनजाळे - वनजाळे (जंगल जाळणारे किंवा नाहीसे करणारे) :-

बंजारा समाज हा डोंगर व दऱ्याखोऱ्यात राहत असल्याने पोटाच्या उपजिवीकेसाठी जंगलात जाऊन शिकार करीत असे. जंगलात (वनात) जातांना त्यांना जाण्या - येण्यासाठी वाटेत अडचण होऊ नये म्हणून झाडा - झुडूपाची तोड करीत असे. लढाई जिकडे असे त्या दिशेला रसद पुरवितांना कसलीच अडचण होऊ नये यासाठी जंगल जाळून टाकत असे. अशी कामगीरी करणारा तो बनजाळे. 'बनजाळे' या शब्दातील 'ळे' या शब्दाचा लोप होऊन त्याची जागा 'रे' या शब्दानी घेतली आणि 'बंजारे' हा शब्द रुढ झाला. अशी कामे करणाऱ्या समाजास 'बनजाळे' असे म्हणतात[१२] श्री पांडूरंग कच्छेश्वर आंधळे यांनी बंजारा समाज हा पूर्वीच्या काळात वनात (जंगलात) वास्तव्य करीत असे यावरुन बनात राहणारा बंजारा, बनज करणारा बजारा, अशा नावाची जी काही उत्पती सांगीतली आहे ती योग्य वाटते.

भारताच्या प्राचीन भाषा साहित्यामध्ये बंजारा या शब्दाची उत्पती व अर्थ सांगीतलेला आहे. ऋगवेदात व्यापाराशी संबधीत असणाऱ्या व्यक्तीला वाणिज्य असे म्हटले जाते. वाणिज्य म्हणजे वाणिज्यकार (व्यापारकरणारा) आणि 'बनिजारो' म्हणजे 'बंजारा' यावरुन असे म्हटले जाते की, बंजारा शब्द जातीसूचक नसून व्यवसाय सूचक आहे. वाणिज्य या संस्कृत शब्दास 'हिंदी' पर्यायी शब्द आहे 'बनज' पुढे बनज या शब्दास 'रा' हे प्रत्यय लाऊन बंजारा झाला. पंचहत्यारे धारण करतो तो पंचहत्यारा होतो. हत्या करणारा तो हत्यारा होतो. त्याच प्रमाणे बनज करणारा 'बंजारा' झाला. अशा प्रकारचा उलेख कै. बळीराम हिरामन पाटील याच्या पुस्तकात पहावयास मिळतो.[१३]

बंजारा समाजामध्ये अनेक पोटजाती आहेत. त्या पोटजातीतील लोकांना आपल्या जातीच्या नावापुढे 'बंजारा' हा शब्द लावता येतो. भारत आणि भारताच्या बाहेर राहणारा समाज स्वत:ला बंजारा म्हणून घेण्यात आनंद मानतो. या समाजाला 'लमाणी' या नावानेही ओळखले जाते. कारण पुर्वीच्या काळी बंजारा समाज हा मिठाचा व्यापार करीत असे. मीठाला संस्कृत भाषेमध्ये 'लवण' असे म्हणतात. परिवर्तनाच्या काळामध्ये 'लवण' याचा अपभ्रंश 'लवाणी' असा झाल्यामुळे लवाणी हा शब्द रुढ अर्थाने 'लवणाचा' व्यापार करणारे 'लमाणी' असे झाले. आणि हा समाज लमाणी या नावाने ओळखू लागला.[१४] बंजारा समाजातील लोक स्वत:स 'गोरमाटी' म्हणून घेण्यात धन्याता मानतो. कारण प्रत्येक बंजारा समाज स्वत:स गोर वंशाचे मानले जातात. 'गोर' या शब्दातील 'गो'याचा अर्थ 'गाय' आणि 'र' याचा अर्थ रक्षा' जो समाज गायी व बैलाची रक्षा (राखण अथवा सांभाळ) करतो त्यास गोरमाटी म्हटले जाते. बंजारा समाजातील लोक गोर आणि कोर या दोन्ही शब्दामध्ये भेद करतो. कारण गोर म्हणजे आपला माणूस आणि कोर म्हणजे परजाती धर्माचा माणूस.[१५] बंजारा समाजातील लोक गाय व बैल आपल्या व्यवसायाचे मुव्य साधन मानतात. आजही बंजारा कुंटुंबात प्रत्येकाच्या घरासमोर गाय असते व त्या गायीची पुजाअर्चना केली जाते.

बंजारा समाजाची ऐतिहासीक पार्श्वभूमी

बंजारा समाज हा प्राचीन काळापासून बैलाच्या पाठीवरुन मालाने भरलेल्या गोण्या लादून तो माल सर्व भारत भर पोहचविणारा व व्यापार करणारा असा एक मेव प्राचीनतम समाज आहे. प्रामुख्याणे बंजारा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या समाजास ब्रिंजारी लामाणी, लंबाडी, लंबाडोडू, सुगली, बोईपारी व सूकली इत्यादी अनेक नावाने स्थानपरात्वे भारतभर ओळखले जाते. बंजारा समाजाचे मुळ वास्तण्य स्थान राजस्थानातील आहे. परंतु हा समाज भारतातच नव्हे तर इतर देशात पसलेला आहे असे मानण्यास अनेक आधार सापडतात.[१६] परंतु हा समाज पाच हजार वर्षापासून आपले अस्तीत्व टिकवून असल्याचे आढळून येते. हा समाज आर्यपूर्व काळात भारतात प्रगत असे नागरी जीवन जगत होता. 'सिंधु संस्कृती, ऋगवेद व हिंदू संस्कृती' या प्रसीध्द ग्रंथाचे लेखक प्र. रा. देशमुख यांनी आपल्या बहुमोल ग्रंथातून बंजारा समाज हा आर्यपूर्व सिंधू संस्कृतीमध्ये असणारा समाज होता.[१७]

हडप्पा आणि मोहंजोदडो येथील उत्खननात सापडलेल्या खापराच्या मुद्रावर आर्यपूर्व देवाच्या डोक्यावर शिंगे होती असे दिसते. डोक्यावर शिंगे धारण करणे हा आर्यपूर्व लोकांच्या देवांचा अविभाज्य भाग होता असे दिसते. आर्यपूर्व बंजारा समाज हा गायी - बैलांची पुजा करीत व या पुजा करण्याच्या पध्दतीपासूनच शिंगे धारण करण्याची पध्दती उत्पन्न झाली असावी असे वाटते. ही पध्दत फक्त देवापुरतीच मर्यादित न राहता सिंधु संस्कृतीतील देवाचे पुजारी, राजे आणि श्रेष्ठ पुरुषही डोक्यावर शिंगे धारण करीत असे. अशी डोक्यावर शिंगे धारण करणारा समाज म्हणजे बंजारा समाज होय. आजच्या काळात सुध्दा बंजारा समाजातील स्त्रीया शिंगे धारण करतांना दिसून येतात. काळानुरुप शिंगे धारण करण्याची प्रथा जरी पुरुषाने सोडली असली तरी बंजारा स्त्रीने शिंगे धारण करण्याची प्रथा कायम टिकवून ठेवल्याचे दिसून येते. बंजारा समाजामध्ये आज प्रचलीत असलेली जीवन पध्दती व प्राचीन काळामध्ये असलेली जीवन पध्दती यामध्ये साम्य दिसून येते व या मुळेच बंजारा हा समाज प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आहे असे सिध्द होऊ शकते. आर्यपूर्वकालीन लोक बैलाची पुजा करीत होते. ते शिवभक्त होते. आजचे बंजारे बैलाचीपुजा करतात व शंकराला देव मानतात. या सर्वच गोष्टी वरुन बंजारा समाजाचे प्राचीन काळापासून भारतात असलेले आस्तित्व मान्य करण्यासारखे आहे.

'राजस्थानमध्ये वास्तव्य करणारा 'गोर' समाज हा स्वत:स राजस्थानी समजत असे. पुर्वीच्या काळी भटक्या आवस्थेत असणारा मीठाचा आणि गव्हाचा व्यापार करणारा प्रसिध्द समाज म्हणजे बंजारा समाज होय'[१८] १६व्या आणि १७ व्या शतकात मोगल सैन्यास रसद पुरविणारा मीठाचा व खजुरांचा व्यापार करणारा तसेच युध्दप्रसंगीयुध्द करणारा अशा विविध प्रकारच्या भूमिका बंजारा समाजाला पार पाडाव्या लागत असे.[१९]

भारतात बंजारा समाजाची वस्तीस्थाने इ.स. चौथ्या शतकापासून वास्तव्यकरुन राहतात असे एम. ए. इलीयट या शास्त्रज्ञाने सांगीतले आहे. तसेच 'इन्सायक्लोपिडीया ऑफ इथिक्स ॲन्ड रिलीजन' या ग्रंथात बंजारा समाज व्यापार करणारा समाज म्हणून ओळखला जातो. तसेच 'गॅझीटीअर ऑफ इंडिया', महाराष्ट्र स्टेट, या ग्रंथातही बंजारा हे व्यापार करणारे होत असा उल्लेख आलेला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत अत्यंत दुर्गम अशा प्रदेशातून माल वाहून नेण्यासाठी बंजाराचे तांडे प्रसिध्द होते.[२०] बंजारा समाजामध्ये माल वाहून नेण्याचे तांडे असायचे त्यामुळे बंजारा समाजातील वस्तीला 'तांडा' असे म्हणतात.[२१] जवळपास १७८० च्या दरम्यान बंजारा समाजानी आपले मुळ वस्तीस्थान राजस्थान सोडून दिल्याची विविध कारणे आहेत. वाढती दुष्काळ परिस्थिती, मोगंलाचा वाढता अत्याचार ही त्याची प्रमुख कारणे आहेत. पूर्वीच्या काळी बंजारा समाजाचा व्यापार करणे हा व्यवसाय ब्रिटीश आमदानीमध्ये बंद झाला.[२२] याचे एकमेव कारण म्हणजे १८५३ साली भारतात इंग्रजानी रेल्वेचे जाळे काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे बंजारा समाजाचा लदेणीवर (व्यापारावर) परिणाम होऊन हळुहळू त्याचा लदेणीचा व्यवसाय बंद पडला. व्यवसायाची कोणतीच पर्यायी योजना त्यांच्याकडे नसल्या कारणाने बंजारा समाजातील लोकांना पोटाची खळगी भरण्यासाठी वेगवेगळ्या राज्यात जावे लागले.[२३] नवीन व्यावसाय (धंदा) निवडण्यासाठी हा समाज लदेणीसाठी (व्यापारासाठी) ज्या राज्यात गेला त्याच राज्यात स्थायीक होवून त्या - त्या ठिकाणी आपले तांडे बसवून विविध व्यावसाय करुन आपले जीवन जगु लागला. बंजारा समाज भारतातील बहुतेक राज्यात वास्तवलेला असून हा समाज पूर्वीपासून या देशात वास्तव्य करतो आहे असे विविध इतिहासाच्या अध्ययनावरुन लक्षात येते. बंजारा समाजाचा पांरपारीक व्यवसाय बंद पडल्या कारणाने हा समाज नंतर शेती, मजुरी, व गुन्हेगारीकडे वळाला. मुख्येत्वेकरुन कर्नाक राज्यातील बंजारा समाज गुन्हेगारीकडे वळाला. दारु पाडणे, चोरीकरणे, वाटमारीकरणे, चोरुन आणलेल्या जनावरांची शिंगे कापून दुसऱ्यांना विकणे, गुजरात राज्यामध्ये राहणारे गोवारीया विना परवाना अफु विकत असे, परंतु ही जात १६३८ मध्ये दक्षिण भारताच्या बाजार पेठेत तांदुळ आणि गव्हाचा व्यापार करणारी जमात म्हणून ओळखली जात होती. ''चोरुन आणलेल्या मुलांचे पालन पोषन करीत असे. परुतु अशा मुलांना मात्र आपल्या जातीतील मुलगी त्यास विवाहासाठी देता येत नसे. अशा प्रकारच्या मुलांना बंजारा समाजामध्ये 'जांगड' असे म्हणतात. जांगड ही बंजारा समाजातील कनिष्ट जात समजली जाते''.[२४] जर अशा जांगड मुलांना बंजारा जातीत सामाऊन घ्याययाचे असेल तर त्यास पाच ते सात बकऱ्याचा बळी देऊन त्यास विविध तांड्याचे पाच नायकांना आमंत्रीत करावे लागते. जांगड मुलांना बंजारा समाजात घेतांना हा विधी करावा लागतो. त्याच्या ताटात खाण्यासाठी नाईकांना बसविले जाते. त्या शिवाय त्याचे जांगडपण फिटत नाही. खाणेपिणे आटोपल्यानंतर या मुलाने आमंत्रीत केलेल्या नाईकांना पाच-पाच ग्रॅम सोन्याची अंगठी प्रदान करावी लागते.

अशा विधीला बंजारा समाजात 'जांगड भेळणो' असे म्हणतात.[२५] ही प्रथा आजही बंजारा समाजात दिसून येते. आजही 'जांगड बंजारे' इतर बंजारा पेक्षा कनिष्ठ समजले जातात. सांगावयाचे तात्पर्य असे की, बंजारा समाजामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ परंपरा दिसून येते.

भारतात इस्लाम राजवटीच्या कालखंडापासून बंजाराच्या संदर्भात व्यवस्थीत व अभ्यासपूर्ण उलेख करण्यात आलेला आहे. बंजारे हे शिकारकरणारे व शौर्यशाली वृत्तीचे होते. त्यामुळे तत्कालीन शेरशहाचा वजीर मुस्लिम बादशहा आसरफ खानवरही त्यांची छाप पडली. जंगीवभंगी हे असरफ खानच्या वेळचे प्रसिध्द बंजारे नाईक समजले जात असत. असा उल्लेख रसेल आणि हिरालाल यांच्या पुस्तकात करण्यात आलेला आहे.[२६] जंगी आणि भंगी नाईक या दोघाकडे मिळून १,८०,००० गायी बैल होते. जंगी आणि भंगी नईक यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाता यावे म्हणून त्यांना ताम्रपटाचा परवाना मुस्लीम बादशहा असरफखान कडून देण्यात आलेला होता. जंगी नाईक व भंगी नाईक हे असरफ खान बरोबर प्रवास करीत असतांना 'बंजारा समाजाची ओळख त्यांनी विश्वासू जात म्हणूनच केली आहे'[२७] जंगी व भंगी नाईक यांना ताम्रपटाचा परवाना दिला व ताम्रपटावर खालील ओळी कोरण्यात आलेल्या होत्या.

''रंजन का पाणी, छप्पर का घास,
दिन में तीन खुन माफ,
और जहा असरफ खान के घोडे,
वहाँ जंगी भंगी के बैल खडे''[२८]

जंगी नाईक व भंगी नाईक या प्रमाणे भगवानदास वडतीया (जाधव) यांनी देखील ताम्रपटाची मागणी केली होती. परंतु त्यांना ती देण्यातआली नाही. 'भगवानदास वडतीया जवळ (जाधव) ५२००० बैल होते असे कम्बरलेज यांनी लिहीले आहे.'[२९] 'भारतीय संस्कृती कोश खंड सहावा यामध्ये जोशी महादेवशास्त्री यांनी बंजारा समाजाची माहिती दिली आहे. त्यामध्ये बंजारा समाज महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजराज, कर्नाटक, आंध्रप्रदेश, दिल्ली इत्यादी राज्यात बंजारा समाजाचे वस्तीस्थान आढळून येतात.'[३०] हे लोक लदेणी म्हणजे बैलाच्या पाठीवरुन खजुर, नारळ, मीठ, गहू, तांदूळ लादून नेत असत. ऐतिहासीक पुराव्यावरुन असे दिसते की, १३९६ ते १८९६ या प्रदीर्घ कालखंडात बंजारा समाजाने लदेणीचा व्यवसाय केला इ.स. १३९६ पासून पुढे उत्तर भारतात मोठा दुष्कळ पडला होता. त्यावेळी या लोकांनी नेपाळ, चीन, तिबेट, ब्राम्हदेश, इराण वगैरे देशातून धान्य वाहून आणले आणि लाखो लोकांचे प्राण वाचविले असे सांगण्यात येते. मोगल काळात त्यांनी विश्वासपूर्ण भूमिका पार पाडल्या कारणांने मोगल राजाच्या काळात त्यांना जमिनी व जहागीरी देण्यात आल्या. आजही कर्नाटक राज्यातील काही ठिकाणी बंजारा समाज 'जहागिरदार' या नावाने ओळखला जातो.

औलइंडिया बंजारा स्टडी टीमच्या १९६७ च्या रिपोर्ट मध्ये असे सांगण्यात आले आहे की, आजही

बंजारा समाजाची तांडे जंगली भागात दिसून येतात. जंगली भागात राहणे ते पसंत करतात. निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे बंजारे निसर्गाशी जवळीक साधलेले दिसून येतात. आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आजही अनेक वनस्पतीचा औषध म्हणून वापर करतात. पुर्वीच्या काळी बंजारा समाजातील लोक केवळ पावसाळ्यात घर करुन राहत असे. दसरा सण साजरा केला केला की, हे लोक आपापले बैलाचे तांडे घेऊन निघून जात असे. ज्या ठिकाणी ते आपल्या वसाहती करुन राहत त्यांना ते तांडा म्हणत असे. प्रवासात राहण्यासाठी कपडा किंवा ताडपत्री याचे छोटे घर तयार करीत असे त्यास 'पाल' म्हणत असे. दरकोस दर मुकाम करीत असे त्यास ते 'मलान' म्हणत असे. आज इथे तर उद्या दुसरीकडे अशी त्यांची साधी जीवन पध्दती होती. आजचा दिवस आपला उद्याची मात्र चिंता करण्याची गरज नाही. असा त्याचा साधा आणि सरळ जीवन जगण्याचा मार्ग होता. बंजारे मात्र एकाच ठिकाणी जास्तकाळ स्थिर राहत नसत. प्रवासामध्ये शकुन - अपशकुन याचे काटेकोरपणे पालन करीत असे. प्रवासामध्ये तांड्याला मागदर्शन करण्यासाठी एक नाईक असे. आज देखील बंजाराच्या वस्तीचा एक प्रमुख असतो त्यास 'नाईक' म्हणतात. तांड्याच्या अंतर्गत ज्या अडचणी येतात त्याची सोडवणूक करण्याचे काम नाईकांना करावे लागते. बंजारा समाज हा प्राणीपुजक आहे. तसेच बंजारांना शिकार करणे अतिशय आवडते. कुत्र्याच्या साहय्याने वेगवेगळ्या प्राण्याची शिकार करण्याची सवय बंजारा समाजाला फार पूर्वीपासून आहे. 'बंजारा समाजाचे अंधश्रध्देवर दृढ विश्वास आहे. तांड्यातील लोकांना भुतबाधा किंवा भानामाती, करणी, चेट्रक यांचा काही त्रास होऊ नये म्हणून तांड्यात एक भगत ठेवला जातो. त्या भगत व्यक्तीवर बंजारा समाजाचा पूर्ण विश्वास असतो'[३१] बंजारा समाजातील लोक घराचे बांधकाम करतांना घराचे दार पूर्व दिशेल करीत असे. दक्षिण दिशेन घराचे तोंड असणे अपशकुन मानले जात असे. परंतु ही पध्दत केवळ बंजारा समाजामध्येच नसून अन्य कोणत्याही जाती-जमातीमध्ये दिसून येते. यापाठीमागे एकमेव अंधश्रध्दा हेच कारण असु शकते.

बंजारा समाजातील देवदेवता

बंजारा समाजात अनेक प्रकारच्या देवदेवता आहेत याचा या ठिकाणी क्रमशा उल्लेख करण्यात आलेला. तो खालील प्रमाणे आहे.

बंजारा देवी :- बंजारा समाज आपला तांडा घेऊन बैलाच्या पाठीवर गोणी लादून सर्व भारतभर मालवाहतुकीचे काम करीत असे. या काळात संपूर्ण डोगर, रानावनातून व दऱ्याखोऱ्यातून त्यांना प्रवास करावा लागे. जंगलामध्ये अचानक येणाऱ्या अनेक संकटांना त्यांना तोंड द्यावे लागत असे. रानावनातून मोहिमेवर असतांना आपले संरक्षण व्हावे म्हणून वाटेत जंगलामध्ये ठिकठिकाणी बंजारा समाजातील लोक बंजारा देवीची प्रतिष्ठापना करीत व तिची पूजा करीत असत. 'जंगलामधील देवी' म्हणून बंजारा देवीस ओळखले जात असे. जंगलामध्ये दगडाच्या ढिगाऱ्यावर एक मोठा शेंदूर फासलेला दगड ठेवतात व हा दगड म्हणजे 'बंजारादेवी' होय.

या देवीची प्रतिष्ठापना करुन तिला तांड्याचे रक्षण करण्यासाठी प्रार्थना केली जात असे. घरात सुध्दा बंजारा देवीची प्रतिष्ठापना केली जाते. यावेळी घरामध्ये धान्याच्या गोणीवर उंचावर ही देवी बसवितात आणि तांडा प्रवासात जाण्यापूर्वी तिची पूजा करतात.[३२] तांड्यातील बैल आजारी असेल तर बैलाला बरे वाटू दे, त्याचबरोबर तांड्यावर कोणत्याही प्रकारचे संकट येऊ नये म्हणून बैलाच्या गळ्यातील घंटा देवीला वाहण्याची प्रथा या जमातीत दिसून येते.

मरीआईची पूजा :- पावसाळा सूरु झाला की, तांड्याचा प्रवास थंबवला जात असे. तांडा ज्या जागेवर थांबविण्यात येई. तेथे काळी पाट किंवा बकरी आणून बळी देत असे. या बळीची हळद - कुंकवाने पूजा केली जाई. बळीच्या बकऱ्याला पाणी पाजून तांडा सुखी ठेवण्याबदल मरीआईला प्रार्थना केली जाते. आई मरीमाया सर्वांना प्रसन्न हो, आलेले संकट टाळ, चांगल्या माणसाची भेट होऊ दे. सर्व जीवाना, गुराढोरांना, प्रसन्न हो. गांवात, नगरीत राहणाऱ्या सर्वाना आशीर्वाद दे. मुलबाळाकडे लक्ष दे, सर्व जीवजंतूना, मुगीला आशीर्वाद दे शेर असेल त्याला सव्वाशेर कर, प्रगती होऊ दे, सावकार लोकांच्या नेहमी समोर ठेव. कर्ज बुडविणे बंजारा जमातीमध्ये पाप समजले जाते. कोर्टकचेरी समोर आम्हाला नेऊ नको. आमच्या सर्व चुका पोटात घाल आणि जे कबूल केले आहे त्याला मंजुरी दे. प्रार्थना झाल्यावर बळीच्या बकऱ्याचा अंगावर पाणी शिंपडले जाते. बकऱ्याने अंग हलविले तर होकार मिळाला असे समजून बकऱ्याचा बळी दिला जातो. तांड्यातील सर्व लोक जेथे बकऱ्याचा बळी दिला जातो तेथे सर्वानी चुली पेटवून जेवन करतात. या प्रकारास 'ओरी करणे'असे म्हणतात. ही ओरी झाली की, प्रत्येकजण आपापल्या घरामध्ये प्रवेश करतो. तांड्यात कोणत्याही प्रकारचे संकट येऊ नये म्हणून 'ओरी' केली जाते.[३३]

मिठूभुकीया :- मिठूमुकीया हा बंजारा समाजाचा एक प्रमुख देव समजला जातो. बंजारासमाजातील लोक या देवाला मानतात. पूर्वीच्या काळी मिठूभुकीया होऊन गेला. तो लुटमार करण्यामध्ये अतिशय पटाईत होता. लुटमार करण्यासाठी जेव्हा बंजारा समाजातील लोक मोहीमेवर जातात तेव्हा मिठूभुकीयाचा कौल घेतात. या देवाबदल बंजारा समाजामध्ये अत्यंत पूज्यभाव बाळगला जातो. तांड्यामध्ये मिठूभुकीयासाठी स्वतंत्र झोपडी उभारण्यात येऊन तेथे मिठूभुकीयाची स्थापना केली जाते. मिठूभुकीयाच्या मंदिरामसोर पांढऱ्या कपड्याचा ध्वज करुन लावतात. दरोडा किंवा चोरी, कराण्यासाठी जाणारे सर्वजन मिठुभुकीयाच्या देवळात (मंदिर) जमा होतात. त्यांच्या समोर दिवा लावातात व शकून विचार करतात. यावेळी दिव्याची ज्योत कमजोर होऊ लागली तर शकून अनुकूल आहे असे समजतात. दरोडा किंवा चोरी यशस्वी झाल्यानंतर मिळालेल्या संपतीची वाटणी केली जाते, व त्यातील काही भाग मिठूभुकीयाचा वाटा म्हणून प्रथम बाजूला काढतात. नाईक किंवा तांडाप्रमुखाने या दरोड्यात भाग घेतला असेल, तर त्याला दोन भाग दिले जातात. तसेच जो माणूस दरोडा घालतांना पहिल्यांदा कृती करतो, त्यालाही दोन भाग दिले जातात. बाकीचा सर्वांना एकएक भागाची वाटणी दिली जाते.

मिठुभुकीयाच्या वाटणीमधून मेजवाणीचे आयोजन केले जाते. यावेळी मिठुभुकीचाच्या समोर धूप जाळला जातो. त्याच्या ध्वजावर दारु शिंपडली जाते आणि मिठुभुकीयाचे आभार मानले जातात. तयार केलेल्या अन्नातील काही भाग मुलांना व बायकांना दिला जातो. हे सर्व झाल्यावर दरोड्या मधील सर्वजन जेवन करतात. मिठुभुकीयाच्या देवळात दर्शन घेण्यासाठी बायकांना पूर्णपणे बंदी असते. त्यांना देवळात जाता येत नाही.[३४]

सेवाभाया :- बंजारा समाजाचे आराध्य दैवत म्हणून सेवाभायास पूज्य समजून त्याची मनोभावे पूजा केली जाते. बंजारा समाजात सेवाभायास कल्याकारी देव म्हणून पुजण्याची प्रथा आहे. सेवाभायाच्या बाबतीत एक दंत कथा आहे. सर्वसाधारणपणे सुफी संत किंवा पिराच्या देवस्थानाप्रमाणे आहे असे दिसून येते. सेवाभायाची कथा अशी संगितली जाते की, एकदा मरीआईच्या मनात राठोड कुळातील सेवाभाया बरोबर प्रेम करण्याची इच्छा झाली. सेवाभाया आपला होण्यासाठी तीने खूप प्रयत्न केले. परंतु सेवाभायाने त्यास नकार दिला. नकार दिल्यामुळे सेवाभायावर देवीचा कोप झाला. त्याने योजलेल्या सर्व योजना निष्फळ ठरल्या. नंतर सोवाभायाने देवीला शरण जाण्याचे कबूल केले. शरणगती पत्कारल्याने सेवाभायास गतवैभव प्राप्त झाले. त्यास दैव सिष्दी प्राप्त झाली. त्याची किर्ती सर्वत्र पसरली. बंजारा समाजातील लोक त्यास आपला रक्षण कर्ता मानु लागले. काहीही केल्याने सेवाभायाने देवीशी लग्न करण्याचे नाकारले. पोहरादेवी या ठिकाणी सेवालाल (सेवाभाया) महाराजाची समाधी आहे. प्रत्येक वर्षी रामनवमीला त्याची यात्राभरते. या यात्रेस भारत व भारताबाहेरुन बंजारे लोक येतात. बंजारा समाजात सेवाभायाची शपथ घेतली जात नाही. जर आपण शपथ घेतली तर आपले नुकसान होईल. असा समज या समाजात प्रचलित आहे.[३५]

बंजाराची तांडा व्यवस्था

बंजारा समाज ज्या ठिकाणी आपली वस्ती करुन राहतो त्यास 'तांडा' असे म्हणतात. लाकूड गवतांनी तयार केलेली ही राहण्याची आवस्था तात्पूरती असते. गायी - बैलांना खाण्याचा चारा संपाला की, तेथून पलायन होणे किंवा वस्ती सोबत घेऊन जाण्याच्या स्थितीला तांडा असे म्हणतात. तांठा वस्ती आजही कायम आहे. डोंगर किंवा जंगलाच्या शेजारी असणाऱ्या वस्तीला नेमाडी भाषेमध्ये 'टोडा' असे म्हणतात. टोडा पासून पुढे तांडा शब्द बंजारा बोली भाषेत निर्माण झाला. बंजारा समाजामध्ये तांडा व्यवस्था कशाप्रकारची असते. याचा उल्लेख याठिकाणी करण्यात आलेला आहे.

१) नाईक (नायक) :- बंजारा तांडा प्रमुखास 'नायक' असे म्हटले जाते. नायक / नाईक हा तेलगु शब्द आहे. त्याचा अर्थ मालक किंवा प्रमुख असा होतो. नाईक हे पद वंशपंरपरागत आहे. नाईक म्हणजे तांड्याचा राजा म्हटले तरी चालेल. तांड्यातील सर्व भांउण तंटे मिठविण्याचा आधिकार हा नाईकाकडे असतो. नाईकाला तांड्यामध्ये महत्वपूर्ण दर्जा प्राप्त झालेला असतो. तांड्यातील मुलामुलीचे लग्न, तांड्याचा व्यापार, विधवेच्या लग्नासाठी द्यावी लागणारी रक्कम, नाईकाच्या संमतीने नक्की होते. म्हणून बंजारा तांड्यामध्ये नाईक ही अतिशय महात्वपूर्ण अशी व्यक्ती आहे.

२) कारभारी :- बंजारा समाजातील लोकांना पुर्वी काहीही लिहता वाचता येत नसे. परंतु ती व्यापार व हिशोबाच्या बाबतीत अतिशय हुशार होती असे अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी आपल्या वृत्तांतामध्ये नोंद करुन ठेवली आहे.[३६] नाईकाचा सर्व हिशोब कारभारी ठेवीत असे. नाईकाच्या कामामध्ये मदत करणारी व तांड्यातील दोन नंबरची व्यक्ती म्हणजे कारभारी होय. तांड्यामध्ये नवीन काही सुरु करावयाचे असेल तर, किंवा तांड्यातील तक्रारी, तंटे, समस्या इत्यादी गोष्टी कारभारी मार्फत नाईकाकडे पोहचविल्या जात असत. समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना नाईक कारभारीस विचारीत असे. तांड्याच्या नियमाचे उल्लघंन होऊ नये यासाठी नाईक आणि कारभारी सतत प्रयत्नशिल राहत असे.

३) डांयसाळे :- नईक व कारभारी यांना अडचणीच्या वेळी तांड्यातील वृध्दमंडळी सल्ला देण्याचे काम करीत असे. त्यांचा सल्ला सर्वजण मान्य करीत असत. यांचा अर्थ तांड्यातील वडीलधाऱ्या मंडळींना तांड्यात मानाचे स्थान दिले जाई. कारभारी व नाईक यांच्या बायकासुध्दा तांड्यातील प्रत्येकास आपुलकीने वागवीत असत. नाईकाच्या बायकोस तांड्यामध्ये आई प्रमाणे मान मिळत असे. तांड्यामध्ये जी वृध्दमंडळी सल्ला देण्याचे काम करतात त्यांना 'डांयसाळे' असे म्हणतात. आजच्या परिस्थितीमध्ये बंजारा समाजामध्ये डांयसाळेना पूर्वीप्रमाणे मान सन्मान व महत्त्व आहे.

४) ढालीया :- बंजारा समाजामध्ये संपूर्ण तांड्याची सेवा अथवा चाकरी करण्याचे काम या ढालीयाकडे असे. तांड्याचा तो सेवक म्हणून त्याच्याकडे बघितले जात असे. तो व्यापार करीत नसे. तांड्यामध्ये तो दररोज मागून खात असे. भीक मागून खाण्यामध्ये त्यास लाज वाटत नसे. तांड्यातील नाईक व कारभारी यांच्या आदेशाचे तो पालन करीत असे. तांड्यातील सर्व लोक त्यांना आदराची वागणूक देत असे. तांड्याचे निरोप पोहचविण्याचे काम त्यांना करावे लागत असे. त्याच्या पोटापाण्याची व कपडेलत्याची जिमेदारी तांड्यावर असे. लग्न कार्यात नाचगाणे करणे, तांड्यातील लोकाची करमणूक करणे इत्यादी कामे तो करीत असे. बंजारा तांड्यातील ज्या देवदेवता असतील त्याच्या समोर दररोज सकाळ व संध्याकाळच्या वेळी हालगी वाजवित असे.[३७]

५) ढाडी :- वाद्य वाजवून लोकांची करमणूक करणे, त्याबरोबर भाटासारखी पूर्वजाची स्तुती करुन तांड्यातील लोकांना त्यांच्या कुळाचा इतिहास ढाडी गाऊन दाखवित असे व त्यावरच तो आपली उपजीवीका करीत असे. तो निरनिराळ्या तांड्यात फिरत असल्यामुळे त्याच्या अनेक लोकांशी ओळखीपाळखी झालेल्या असत. त्यामुळे तांड्यातील मुलामुलीचे लग्न जुळवून आणण्यास त्याची मदत होत असे. नाईक, कारभारी व तांड्यातील लोक त्याला मान देत असे. तो तांड्यात आल्यावर त्याला सन्मानाने जेवण घातले जाई.[३८]

६) सनार (सोनार) :- बंजारा समाजातील स्त्रीयांना दागीने घालण्याची फारच मोठी हौस आहे. हे दागीने करण्याचे काम सनार बंजारा करतात. अतिशय सुबक अशा पध्दतीने हे दागीने केले जातात. प्रत्येक तांड्यामध्ये दागिने करणाऱ्या सनाराचे एक तरी कुटुंब असतेच. सनार हा इतरापेक्षा स्वत:ला उच्च समजतो. तांड्यातील लोकांचे जेवण असेल तो कोरडा शिधा घेतो. इतराशी त्याचे रोटी - बेटी व्यवहार होत नाही. सनार जातीतील स्त्रियाची पोशाख पध्दत इतरा पेक्षा वेगळी असते. स्त्रिया साडी घालतात व कपाळा कुंकू लावतात. परंतु सनार जातीची बोली भाषा बंजारा प्रमाणेच असते. अशा प्रकारची बंजारा समाजाची तांडा व्यवस्था पूर्वी होती व आजही ती दिसून येते.[३९]

बंजारा समाजातील पोट जाती

बंजारा समाजामध्ये अनेकविध पोट जाती आहेत. त्यामध्ये खालील उपजातीचा समावेश करण्यात आलेला आहे.

(१) गोरबंजारा (२) चारण बंजारा (३) मथुरा बंजारा (४) सनार बंजारा (६) शिंगाडा बंजारा
(७) ढालीया बंजारा (८) मारु बंजारा (९) बामणीया बंजारा (१०) बागोरा बंजारा (११) गिगोरा बंजारा
(१२) रोहिदास बंजारा (१३) घमकुटा बंजारा (१४) भाट बंजारा (१५) जोगी बंजारा (१६) ब्रिजवासी बंजारा
(१७) धाडी बंजारा

अशा प्रकारे बंजारा समाजातील असणाऱ्या ज्या काही पोट जाती आहेत त्याची माहिती या ठिकाणी देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा वडवणी तालुकयातील असल्या कारणाने वडवणी तालुक्यातील वास्तव्य करणारा बंजारा समाज हा कोणत्या जाती आणि पोट जातीतील आहे. याचा या ठिकाणी उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते.

वडवणी तालुक्यातील बंजारा समाज

बीड जिल्ह्यात बंजारा समाजाचे वस्तीस्थान असून हा समाज वेगवेगळ्या तालुक्यात आढळुन येतो. त्यामध्ये बीड, आष्टी, गेवराई, माजलगांव, केज, धारुर, परळी आणि वडवणी तालुक्यात या समाजाचे वास्तव्य आहे. वडवणी तालुक्यातील एकुण बंजारा समाजाची जी काही वस्तीस्थाने आहेत या वस्तीस्थानाचे संशोधन काळा दरम्यान निरीक्षण आणि सर्व्हेक्षण करतांना असे निदर्शनास आले की, या तालुक्यात वास्तव्य करणारा बंजारा समाज हा लमाण बंजारा, सोनार बंजार, ढालीया बंजारा या नावाने ओळखला जातो. कारण ते स्वत:स बंजारा माणून घेण्यास ध्यन्यता मानतात. लमाण व बंजारा हा शब्द कोणत्या अर्थाने वापरला जातो यांचा संदर्भ प्रस्तुत प्रकरणामध्ये पाठीमागे आलेला आहे. त्याची या ठिकाणी पुनरावृत्ती करण्याची गरज वाटत नाही. महाराष्ट्रामध्ये वास्तव्य करणाऱ्या बंजारा समाजाचा समावेश आरक्षण सूचीमध्ये 'विभुक्त जाती' या प्रवर्गमध्ये केलेला दिसून येतो. यास वडवणी तालुक्यातील बंजारा समाज देखील अपवाद नाही. संशोधन काकामध्ये सर्व्हेक्षण करताना वयस्क व्यक्तीशी चर्चा केली असता बंजारा समाजास 'लमाण' यानावाने का ओळखले जातात. याचे नेमके काय कारण आहे आणि तेव्हा बहुतांशी वयस्क व्यक्तीने असे सांगीतले की, पुर्वीच्या काळी हा समाज बैलाच्या पाठीवरुन मिठाचा व्यवसाय करीत असे. फक्त मिठाचा व्यवसाय अथवा व्यापार करणाऱ्या समाजालाच 'लमाण' म्हणून घेण्याचा अधिकार होता. असे सांगण्यात आले. वडवणी तालुक्यातील बंजारा समाज हा स्वत:स सेवालाल महाराजाचे अनुयायी समजतात. या समाजाची सेवालाल महाराजावर अपार श्रध्दा आहे. कारण तोच आमचा कर्ता, करविता, सर्वेसर्व असून प्रत्येक कार्याची सुरुवात श्री संत सेवालाल महाराजाच्या नावापासून करतात असे निदर्शनास आले.

संदर्भ

१) रा. ज. लोटे - भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर, प्रथम आवृत्ती जून २००४, पृ. क्र. १

२) रामनाथ नामदेव चव्हाण - जाती आणि जमाती - मेहता पब्लिशिंग हाऊस १२१६, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती एप्रिल १९८९, पृ. क्र. १०

३) कित्ता पृ. क्र. १२

४) कै. बळीराम हिरामन पाटील - गोर बंजारा लोकांचा इतिहास, प्रकाशक, सुधाकर नाईक, यवतमाळ, प्रथम आवृत्ती १६३६, पृ. क्र. १

५) प्रा. मोतीराज राठोड - गोरमाटी - बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, संजय नगर, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९८८ पृ. क्र. ९

६) पूर्वोक्त क्र. ४ पृ. क्र. ९

७) पूर्वोक्त क्र. ४ पृ. क्र. १०

८) श्री. पांडूरंग कच्छेश्वर आंधळे पाळील, वनगारी - बनजारी, सुराकिर्ती प्रकाशक, नाशिक, ३१ डिसेंबर १९९९ पृ. क्र. २९

९) कित्ता पृ. क्र. २९

१०) कित्ता पृ. क्र. २९

११) कित्ता पृ. क्र. ३०

१२) कित्ता पृ. क्र. ३०

१३) पूर्वोक्त क्र. ४ पृ. क्र. ९, १०

१४) साप्ताहिक, साथी बंजारा संपादक सरीचंद्र जाधव, दिवाळी विशेषांक १९९६, मालेगांव रोड, शिवाजीनगर, चाळीसगांव पृ. क्र. १७

१५) पूर्वेक्ति क्र. ५ पृ. क्र. १

१६) प्रा. मोतीराज राठोड, गोरबंजारा जनजातीका इतिहास, विद्या प्रकाशन कानपूर, जानेवारी २००३, पृ. क्र. २२

१७) पूर्वेक्ति क्र. ५ पृ. क्र. १३

१८) साप्ताहिक, बंजारा पुकार, संपादक, आणि गोविंदराव चव्हाण, विष्णूनगर नांदेड, २०१२ पृ. क्र. २८

१९) प्रा. डॉ. गणपत राठोड, बंजारा लोकगिंतोका सांस्कृतिक अध्ययन, चंद्रलोक प्रकाशन, किदवईनगर, कानपूर, २००२, पृ. क्र. १९

२०) कित्ता पृ. क्र. १२

२१) श्री. हरिभाऊ राठोड, लमाण - बंजारा आणि वंजारी, संबोधी प्राकशन मुबंई, प्रथम आवृत्ती २० एप्रिल १९९४, पृ. क्र. ३७

२२) श्री. रमेश राठोड, बंजारा गोत्राची उत्पती, रविश प्रकाशन २०, विज्ञाननगर, मानेवाडा, नागपूर - ४, १५ फेब्रुवारी २००२, पृ. क्र. १९

२३) डॉ. रुक्मिणी पवार, बंजारा लोकजीवन पध्दती, कैलाश पाब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट २००५, पृ. क्र. ३६

२४) कित्ता पृ. क्र. ३७

२५) कित्ता पृ. क्र. ३८

२६) Rusell R. Hirala R. B., Tribe and caste of the central Provincess of India, S. K. Jain, Rajdhani book centre Delhi,1975 page - 168

२७) Ibid - page No - 164

२८) पूर्वोक्त क्र. १६ पृ. क्र. ३२

२९) पूर्वोक्त क्र. २३ पृ. क्र. ३७

३०) जोशी महादेव शास्त्री, भारतीय संस्कृती कोश, ४१०, शनिवारपेठ पुणे - ३०, १९७० खंड ६ वा, पृ. क्र. २३

३१) डॉ. श्रीराम शर्मा, बंजारा संस्कृती, दक्षिण प्रकाशन, गांधीबजार हैद्राबाद, प्रथम आवृत्ती १८८३, ५०००० पृ. क्र. १७६

३२) पूर्वोक्त क्र. २६ पृ. क्र. १६७

३३) श्री. लक्ष्मण माने, विमुक्तायन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण मुबंई, प्रथम आवृत्ती १२ मार्च १९९७, पृ. क्र. १.

३४) कित्ता पृ. क्र. १८.

३५) कित्ता पृ. क्र. १८.

३६) पूर्वोक्त क्र. २६ पृ. क्र. १९१.

३७) पूर्वोक्त क्र. ३३ पृ. क्र. ९५.

३८) पूर्वोक्त क्र. ३३ पृ. क्र. २५.

३९) पूर्वोक्त क्र. ३३ पृ. क्र. २५.

प्रकरण ०२
सामाजिक संशोधन पध्दती

महाराष्ट्राचे प्रामुख्याने चार विभाग पाडले जातात. त्यामध्ये पश्चीम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ आणि मराठवाडा होत. महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभाग हा तसा मागासलेला आहे. मराठवाड्यामध्ये एकूण आठ जिल्हे आहेत. औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लांतूर, उस्मानाबाद आणि बीड याचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्याचा एकंदरीतपणे अभ्यास केला असता बीड जिल्हा अतिशय मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर इतर राज्याना ऊसतोड मजूर पुरविणारा जिल्हा म्हणून त्याची ओळख आहे. खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्याची ओळख ही ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. बीड जिल्ह्यात एकूण अकरा तालुके आहेत. त्यामध्ये १) आष्टी (२) पाटोदा (३) शिरुर (कासार) (४) बीड (५) गेवराई (६) माजलगांव (७) परळी (८) अंबाजोगाई (९) धारुर (१०) केज (११) वडवणी यांचा समावेश केलेला आहे. वडवणी तालुका सुध्दा म्हणावा तेवढा विकसीत झालेला नाही. अशा या तालुक्यामध्ये बंजारा समाजाचे वास्तव्य आहे. बंजारा समाजाच्या वर्तमान कालीन परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी ''वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाज शास्त्रीय अभ्यास.'' असा संशोधनाचा विषय निवडून त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी वडवणी तालुक्यातील पाच तांड्याची सर्व्हेक्षणासाठी निवड करण्यात आलेली असून या पाच तांड्यामधून १०० (शंभर) उतरदात्याची निवड करण्यात आलेली आहे.

विविध सामाजिक शास्त्रात सामाजिक घटनांचा आणि वास्तव परिस्थितीचा अभ्यास करावयाचा असेल तर त्याकरिता संशोधन आराखड्याचे कार्य अत्यंत महत्वपूर्ण समजले जाते. जगातल्या कोणत्याही संशोधची सुरुवात व सत्य घटनांचा अभ्यास संशोधन आराखड्या शिवाय होऊ शकत नाही. म्हणून सामाजिक संशोधन आराखड्याचा उपयोग महत्वपूर्ण साधन म्हणून केला जातो. एकंदरीत संशोधन आराखड्याचा उदेश पुढील प्रमाणे मानला जातो.

अध्ययन क्षेत्राचा परीचय

पुर्वीच्या हैद्राबाद राज्यातील मराठी भाषीका पैकी एक जिल्हा म्हणून बीड जिल्ह्यची ओळख आहे. सन १९५६ साली द्विभाषीक राज्याच्या स्थापनेवेळी हा जिल्हा द्विभाषीक राज्याच्या मराठवाड्यात होता. १९६० ला महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर हा जिल्हा भाषीक राज्यात म्हणजे महाराष्ट्रात समावीष्ट करण्यात आला.

बीड जिल्हा औरंगाबाद विभागाच्या पश्चिमेस मध्यभागी वसलेला जिल्हा आहे. हा जिल्हा १८.२६ ते १९.२६ या उत्तर अक्षांशावर आणि ७४.५४ ते ७६.५७ या पूर्व रेखांशावर आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना तसेच पुर्वेस परभणी व लातून हे जिल्हे आहेत. जिल्ह्याच्या दक्षिणेस उस्मानाबाद व पश्चिमेस [१]

अहमदनगर हे जिल्हे आहेत.

बीड पासून पूर्वेस साधारणता ३५ कि.मी अंतरावर वडवणी हे शहर वसलेले आहे. वडवणी शहरात पुर्वीपासून हातमागाच्या साहय्याने टेरीकॉट कापड तयार करण्याचा व्यवसाय चालत असे. परंतु आज या शहरातील कापड निर्मीतीचा व्यावसाय हा पावर लुमच्या साहय्याने चालतांना दिसून येतो. कापड निर्मीतीच्या व्यवसायामध्ये प्रामुख्याने कोष्टी हा समाज आग्रेसर आहे. येथे तयार होणारा कपडा खरेदीसाठी विविध जिल्ह्यातूनच नव्हे तर विविध राज्यामधून येतात. वडवणी ही बाजारपेठ कापड्यासाठी प्रसिध्द समजली जाते. बीड जिल्ह्यातील वडवणी शहराच्या आजुबाजुला असणाऱ्या साधारणता ५० ते ६० खेड्याचा संपर्क येतो. याचे कारण म्हणजे वडवणी पासून धारुर हे ३० कि.मी. दूर आहे. माजलगांव हे वडवणी पासून ३५ कि.मी. दुर आहे. बीड हे वडवणी पासून ३५ कि.मी. दूर असल्याने जवळपासचे लोक वडवणी या शहरामध्ये येतात. यामुळे येथील बाजारपेठ गजबलेली दिसून येते.

अध्ययनक्षेत्राची ऐतिहासीक पार्श्वभूमी

मराठवाडा विभागामध्ये असणाऱ्या जिल्ह्या पैकी बीड जिल्हा हा एक निजामकालीन व प्राचीन असा आहे. बीड या शहराचा शासकीय दफ्तरामध्ये 'भीर' असा उल्लेख सापडतो. ऐवढेच नाहीतर बीड या शहराचा उल्लेख अनेक शासकीय कागदापत्रामध्ये 'चंपावती नगरी' असा उल्लेख सापडतो. अशा या बीड जिल्ह्यामध्ये 'वडवणी' या तालुक्याचा समावेश आहे. वडवणी हे शहर बीड ते तेलगांव या रस्त्यावर वसलेले शहर आहे या शहरा लगत बंजारा समाजाची काही वस्तीस्थाने आहेत. बंजारा समाज या तालुक्यात केव्हापासून किंवा कधी काळापासून वास्तव्य करत आहे हे मात्र समजू शकले नाही. परंतू संशोधन काळाच्या दरम्यान वयस्क व्यक्तीशी चर्चा केली असता बंजारा हा समाज किमान सहा ते सात पिढ्यापासून वास्तव्य करीत आहे असे समजून आले. वडवणी आणि वडवणी परीसरामध्ये कोणते बंजारा वास्तव्य करतात तेव्हा असे दिसून आले की, या तालुकयामध्ये सोनार बंजारा, लमान बजारा व ढाडी बंजारा यांचे तांडे दिसून आले. प्रामुख्याने भोटा नाईक तांडा तेथे १० ते १५ कुटुंब ही सोनार बंजाराची आहेत. तसेच वडवणी पासून २ कि.मी. अंतरावर दामूनाईक तांडा असून या तांड्यामध्ये ढाडी बंजाराची काही घरे आढळून येतात. केवळ बंजाराच्या तांड्यामध्ये बंजाराच राहत नाही तर अन्य जाती जमातची कुटुंबे राहतांना दिसून आली. अशा प्रकारे बंजारा समाजाच्या अध्ययन क्षेत्राची पार्श्वभूमी या ठिकाणी स्पष्ट केलेली आहे.

वडवणी तालुक्याची लोक संख्या

बीड जिल्ह्याच्या एकूण लोकसंखेमध्ये वडवणी तालुक्याची लोकसंख्या १,२४,८,२९ एवढी असून त्यामध्ये पुरुषांची संख्या ६४,३,६५ व स्त्रियांची संख्या ६०४८४ एवढी आहे. वडवणी तालुक्यामध्ये एकूण कुटुंबाची संख्या २४०६२ असून लोकसंख्येची घनता ८९० ऐवढी आहे. वडवणी तालुक्यामध्ये स्त्री पुरुषांचे प्रामण ९४० इतके आहे.[२]

वडवणी तालुक्यामध्ये एकूण ४५ गांवाची संख्या असून या तालुक्याचे साक्षरतेचे प्रमाण एकूण ५०.६४ इतके आहे व स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ३६.१७ इतके आहे. अनुसूचीत जातीचे प्रमाण १४.२२ % इतके असून अनुसूचीत जमातीचे प्रमाण १.१४ % इतके आहे.

क्षेत्रफळ व प्रशासकिय विभाग

बीड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळापैकी १०४४०.३५ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या ३.३९ % इतके आहे. या क्षेत्रफळापैकी ४१.२४ चौ. कि.मी. क्षेत्रफळ नागरी भागात असून १०३९९.११ चौ कि.मी. क्षेत्रफळ ग्रामीण भागात आहे. प्रशासकिय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन महसुली विभाग पाडण्यात आले असून एक विभाग बीड येथे असून या अंतर्गत बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, शिरुर (कासार) हे तालुके येतात. दुसरा उपविभाग अंबाजोगाई येथे असून त्याखाली अंबाजोगाई, केज, माजलगांव, धारुर, परळी, वडवणी हे तालुके येतात. या उपविभागा करिता स्वतंत्र उपजिल्हाधिकारी कार्यालय आहेत. जिल्ह्यात ११ तालुके असून नागरी विभाग वगळता ११ पंचायत समित्या आहेत. सर्व पंचायत समितीसाठी बीड येथे जिल्हा परिषद कार्यरत आहे.[३]

भू - विज्ञान

बीड जिल्ह्यातील बहुतांश जमिनी पातळ थराच्या व खडकाळ आहेत. गेवराई व माजलगांव तालुक्यातील जमिनी सुपिक काळ्या प्रतीच्या आहेत. नद्याच्या व नाल्याच्या काठावर काळ्या जमिनीचे पट्टे आहेत. पाटोदा तालुका हा डोगराळ आहे. वडवणी तालुक्यातील जमिनी काळ्या व खडकाळ अशा स्वरुपाच्या आहेत.

व्यवसाय

बीड जिल्ह्यातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून बहुंतांशी शेती पावसावर अवलंबून आहे. असे असले तरी पावसाचे प्रमाण बरेचशे कमी असून तो वेळेवर पडत नाही आणि त्यामुळे जिल्ह्यात अधून-मधून दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. जिल्ह्यात २००४-२००९ मध्ये पावसाचे प्रमाण ६७४.६७ कि.मी. होते. वडवणी, गेवराई, शिरुर, अंबाजोगाई या तालुक्यात पावसाचे प्रमाण बरेचशे कमी आहे. जिल्ह्यात २००८-२००९ वर्षात आष्टी, पाटोदा, बीड, धारुर, परळी व माजलगांव तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त असून येथ

७०४ कि.मी. तर केज तालुक्यामध्ये सर्वात कमी म्हणजे ८१ कि.मी. पाऊस पडला. जिल्ह्यात सर्वसाधारणपणे जुनच्या पंधरवाड्यापासून पावसाला सुरुवात होते व तो सप्टेंबर अखेर राहतो. कधी-कधी ऑक्टोबर महिन्यात सुध्दा पाऊस पाडतो.[४]

१) संशोधनाचा उदेश (Objects of Research) :-

समाजशास्त्राचा अभ्यासक म्हणून समाजशास्त्र विषयाची आवड ही सुरुवातीपासूनच निर्माण झालेली होती. बंजारा समाजात जन्म झाल्यामुळे बंजारा समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करावा हा मुख्य उदेश डोळ्यासमोर होता. बंजारा समाजाचा इतिहास पाहिला असता हा समाज पूर्वीपासून दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणारा समाज आहे, हे मात्र विसरुण चालणार नाही. आजच्या परिस्थितीमध्ये अनेक प्रकारचे परिवर्तन होऊन देखील या समाजाचे आपली परंपरा जोपासलेली आहे. वर्तमान स्थितीमध्ये सुध्दा आपली 'तांडा संस्कृती' कायम टिकवून ठेवल्याचे दिसून येते. बंजारांची संस्कृती इतर समाजापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी आहे. या संस्कृतीचे रहस्य काय आहे ? हे शोधण्याचा प्रयत्न या अभ्यास विषयाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. परंपरागत असणारा बंजारा समाज आणि आजच्या बंजारा समाज यामध्ये असणारी वैचारिक भावना जाणून घेण्यासाठी त्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. आजच्या वर्तमान परिस्थितीमध्ये देखील या समाजाने जुनी वैशिष्ट्ये कायम टिकवून ठेवलेली आहेत. आजदेखील या समाजामध्ये श्रध्दा, अंध्दश्रदा, जादुटोना, भानामती, करणी, चेटूक इत्यादीवर त्याचा विश्वास आहे. हे सर्वस्वी तपासून पहण्यासाठी वडवणी तालुक्यातील बंजारा समाजावर लक्ष केंद्रीत करुन त्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश एवढाच आहे की, अतिशय पारंपारीक अशा पध्दतीने जीवन जगणाऱ्या बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विश्लेषणात्मक आढावा घेणे, बंजारा समाजातील श्रध्दा आणि अंधश्रध्दांचा शोध घेणे, बंजारा समाजात झालेल्या बदलांचा शोध घेणे. बंजारा समाजाची शैक्षणिक स्थिती, राजकिय स्थिती जाणून घेणे हाच उदेश डोळ्यासमोर ठेवण्यात आलेला आहे.

बंजारा समाजात काही प्रथा आणि परंपरा आहेत अशा अलिखीत प्रथा आणि परंपरांचा लिखीत स्वरुप प्राप्त व्हावे या उदेशाने विविध तांड्यामध्ये जाऊन, वयस्कर व्यक्तीशी संपर्क साधून बंजारा समाजा विषयी माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. संशोधकाच्या ज्ञात माहितीच्या आधारे वडवणी तालुक्यातील बंजारा समाजावर आतापर्यंत सामाजिक व आर्थिक बाजूने समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास झालेला नाही. म्हणून या संशोधनाचे उदिष्ट काही प्रमाणात अन्वेषणात्मक व परिचयात्मक अध्ययनाकडे झुकणारे आहे. 'डॅनियल कॅटझ' याच्या मताप्रमाणे परिचयात्मक अध्ययनाचा उदेश गृहीतकृत्याची चाचणी घेणे नसून मिळालेल्या माहितीचे वर्णन करणे हा असतो.[५] क्षेत्र निरीक्षणासाठी प्रस्तुत संशोधनात काही प्रमाणात हाच उदेश निश्चीत करण्यात आलेला आहे.

२) संशोधनाचे महत्त्व (Importance of Research) :- बंजारा समाजावर आतापर्यंत अनेक संशोधनात्मक अध्ययने झालेली आहेत परंतु ती अध्ययने ठराविक प्रदेशापुरतीच मर्यादित आहेत. या अध्ययनाची गती आवश्यकते पेक्षा फारच कमी आहे. बंजारा समाजातील असणाऱ्या प्रथा आणि परंपरा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या समाजाचा विविध अंगाने अध्ययन करणे आवश्यक आहे. वडवणी तालुक्यामध्ये बंजारा समाजाचे वास्तव्य आहे. वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या अभ्यासावरुन संपूर्ण बंजारा समाजाचे सामाजिक व आर्थिक जीवनाचे विविध पैलु समजून घेण्यात आले आहे. त्याचे कौटुंबिक जीवन धार्मिक जीवन, आर्थिक जीवन यावर परिवर्तनाचा काही परिणाम झालेला आहे का ? हे सर्वस्वी पाहण्यासाठी त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. म्हणून याठिकाणी बंजारा समाजासंबंधी लिहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३) नमुना निवड (Sampling Method) :- बंजारा समाज हा भारताच्या बावीस (२२) प्रांतामध्ये वास्तव्य करुन राहणारा समाज म्हणून ओळखला जातो. अशा संपूर्ण भारतात वास्तव्य करणाऱ्या बंजारा समाजाचा अभ्यास करणे केव्हाही शक्य होणार नाही. नमुना निवडीच्या आधारे क्षेत्र निवड करुन वडवणी तालुक्यातील (१) भोटानाईक तांडा (२) बाबी तांडा (३) बिचकुला तांडा(४) रामजी नाईक तांडा (५) दामूनाईक तांडा या पाच तांड्याची सहप्रयोजन नमुणा निवडीच्या आधारे निवड केलेली आहे. या पाच तांड्यामधून प्रत्येक कुटुंब प्रमुख या नात्याने वेगवेगळ्या कुटुंब प्रमुखाची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये शेती करणारे कुटुंब प्रमुख, शेतमजुरी करणारे कुटुंब प्रमुख, नोकरी करणारे कुटुंब प्रमुख, व्यापार करणारे कुटुंब प्रमुख, विधुर कुटुंब प्रमुख आणि स्त्री कुटुंब प्रमुख या प्रमाणे निवेदकाची (उत्तरदात्याची) निवड करण्यात आली आहे. या कुटुंब प्रमुखामध्ये शिक्षण च्या बाबतीत निरक्षर, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पदवी आणि पदण्युत्तर अशा विविध शिक्षण स्तरातील कुटुंब प्रमुखांना स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक तांड्यामधून २०(वीस) निवेदक या प्रमाणे १०० (शंभर) निवेदकांची मुलाखतीसाठी निवड करुन त्यांच्याकडून बंजारा समाजाची माहिती संकलीत करण्यात आली. व अंतीमतः त्या आधारे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले.

४) संशोधन समस्या (Research Problem):- 'वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाला अनुसरुन बंजारा समाजाच्या एकूण घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये बंजारा समाजाच्या समाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकिय स्थितीचे अवलोकन करुन त्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

५) तथ्य संकलण तंत्र (Techniques of Data Collection) :-

तथ्य संकलन हा संशोधनाचा गाभा समजला जातो. तथ्य संकलना शिवाय संशोधन अहवाल पूर्ण होऊ शकत नाही. सामाजिक संशोधनामध्ये वैज्ञानिक आणि अवैज्ञानीक पध्दतीचा अवलंब करुन समुहाच्या किंवा एखाद्या घटनेच्या संदर्भात सत्य शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तथ्य सेकलन होय. तथ्य संकलनाशिवाय माहितीचे विश्लेषण करता येत नाही. तथ्य संकलनासाठी व माहिती करुन घेण्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीचा अवलंब करावा लागतो. केवळ माहिती गोळा करणे म्हणजे तथ्य संकलन नव्हे. तथ्य संकलन करतांना ज्ञनेंद्रियांचा आधार घेऊन तथ्यांना वैज्ञानीकतेचा दर्जा द्यावा लागतो.

तथ्य संकलन करण्यासाठी त्यामध्ये सहभागी निरीक्षण, असहभागी निरीक्षण, मुलाखत, मुलाखत अनुसूची, आणि क्षेत्रिय सर्व्हेक्षणाची नितांत गरज असते. प्रस्तुत संशोधनासाठी उपरोक्त साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. बंजारा समाजाच्या बाबतीत माहिती संकलीत करतांना कोणत्या तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. याची थोडक्यात माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. त्याचा उल्लेख खालील प्रमाणे घेत.

१) मुलाखत (Interview) :-

प्रस्तुत संशोधनाच्या बाबतीत बंजारा समाजाची माहिती संकलीत करता यावी व निवेदकाशी केलेल्या संवादाला एक प्रकारे दिशा मिळावी म्हणून मुलाखती सूची तयार करण्यात आली. मुलाखत सूची तयार करतांना रचनात्मक अनुसूचीचा आधार घेण्यात आला आणि त्याआधारे गृहीतकृत्य पाहिली. अनुसूची भरुन घेतांना 'प्रत्यक्ष मुलाखत' या तंत्राचा अवलंब करण्यात आला. या मुलाखत अनुसूचीच्या आधारे बंजारा समाजातील स्त्री-पुरुषांना बोलके करुन त्यांच्याकडून जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. बंजारा समाजात साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे लिखित माध्यमातील तंत्रे फारशी उपयोगी पडली नाही. अनेक स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या विचारांचे मुल्यमापन करुन मुलाखत अनुसूची भरुन घेतल्या. स्त्री-पुरुषांच्या जेव्हा एकत्र मुलाखती घेतल्या तेव्हा स्त्रिया पुरुषांच्या दबावाखाली असल्याचे जाणवले. जेव्हा स्त्रियांच्या मुलाखती स्वतंत्रपणे घेण्यात आल्या तेव्हा मात्र त्यांनी मनमोकळे पणाने उत्तरे देण्याची क्रिया सुरु झाली. मुलाखतीच्या माध्यमाद्वारे लोकांच्या भावभावनांचा अंदाज घेता येतो. निवेदकाकडून (उत्तरदात्याकडून) बोलला जाणारा प्रत्येक शब्द महत्वाचा असतो. हे सर्व समजून घेण्यासाठी मुलाखतीचे माध्यम महत्वपर्ण वाटते. मुलाखत घेतांना अनुसूचीतील प्रश्नासोबत अधिकच्या परंतु संशोधनास पुरक ठरण्याऱ्या माहितीच्या नोंदी घेतल्या व माहितीचा उपयोग संशोधन अहवाल लिहण्यासाठी करण्यात आला. मुलाखत म्हणजे सामाजिक आंतरक्रियेची एक प्रक्रिया आहे. मुलाखतीमुळे उत्तरदात्याच्या किंवा निवेदकाच्या चेहऱ्यावरील हावभाव समजून येतात. बंजारा समाजाची भाषा अवगत असल्यामुळे बंजारा समजातील स्त्री-पुरुषांची मुलाखत घेऊन त्याच्यामध्ये असणारी समूह भावना आणि व्यक्तीगत भावना समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२) निरीक्षण (Observation) :-

संशोधनामध्ये निरीक्षणाला अतिशय महत्व देण्यात आलेले आहे. सामाजिक संशोधनामध्ये एखाद्या समुहाचा अभ्यास करतांना दैनंदिन जीवनातील पारंपारिक संबध सामाजिक व्यवहाराचे निरीक्षण करण्याचे प्रभावी तंत्र म्हणून निरीक्षणाचे महत्व आहे. निरीक्षणा शिवाय क्रिया प्रतिक्रियांची पार्श्वभूमी लक्षात येत नाही. बंजारा समाजाचा अभ्यास करतांना समुदायामध्ये बंजाराची बोलीभाषा, सण, उत्सव, विविध प्रथा, परंपरा, आहारपध्दती, त्यांची नातेदारी व्यवस्था हे सर्व निरीक्षणाच्या माध्यमाद्वारे संकलीत करता येतात. बंजाराची वस्ती म्हणजे 'तांडा संस्कृती' कशा प्रकारची आहे. हे सर्व पाहण्यासाठी निरीक्षण तंत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आलेला आहे. ज्याठिकाणी तथ्य संकलणाची कठिणथा असते अशाठिकाणी निरीक्षण हे तंत्रच फायदेशिर ठरते. काही प्रसंगी व्यक्ती वर्तमात बदल जाणवतो हे बदल जाणून घेण्यासाठी निरीक्षण तंत्राची बहूमोल कामगीरी असते. निरीक्षणामुळे विचार करायाची क्षमता वाढते.

सहभागी निरीक्षणामुळे समुह जीवनाशी एकरुप होऊन समुहाचा घटक बणून जीवनाशी निगडीत असणाऱ्या घटनांचे विवेचन करण्यात आलेले आहे. एकाच वेळेला केलेले निरीक्षण योग्यच असते असे न मानता वारंवार निरीक्षण या तंत्राचा वापर संशोधन विषयासाठी करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक स्त्रोता बरोबरच दुय्यम तथ्यांना जो पुरावा म्हणून आधार असतो त्याचा उपयोग करण्यात आलेला आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून, सामाजिक संशोधनाच्या ग्रंथालयातून, विविध लिखित साहित्य, पुस्तके, अहवाल संशोधन मासिके, वर्तमानपत्रे इत्यादी साहित्याची उपलब्धता झाल्यामुळे फारच मदत झाली.

६) तथ्याचे वर्गीकरण (Classification of Data):-

संशोधनासाठी जो विषय निवडलेला होता त्या अनुसंगाने 'मुलाखत अनुसूची' तयार करुन घेतली. तयार करुन घेतलेल्या अनुसूची टाईप करुन त्यामध्ये काही चुका राहु नये म्हणून त्याची फेर तपासणी करण्यात आली. सर्व मुलाखत अनुसूची बरोबर असल्याची खात्री केल्यानंतरच त्या भरुन घेतल्या. 'मुलाखत अनुसूची'भरण्याचे कार्य पार पडल्यानंतर प्रश्नावलीतील पाडलेल्या मुख्य विभागाचे स्वतंत्र रकाने (तक्ते) तयार करुन प्रत्येक तक्त्याला क्रमांक देण्यात आला. महत्वाचे तक्ते तयार झाल्यानंतर 'सांकेतिकरण' करण्यात आले. सांकेतिकरणानंतर 'सारणीयन' करण्यात आले. संशोधनासाठी ज्या-ज्या साहित्यांचा, पुस्तकांचा, ग्रंथाचा, वापर करण्यात आला त्या सर्वाची संदर्भ सूची शेवटी जोडण्यात आली.

७) तथ्य विश्लेषण (Data Analysis) :-

संशोधन विषयाशी निगडीत असणारी माहिती संकलीत करुन त्या-त्या प्रकरणामध्ये विस्तारीत रुपाने प्रकाशित करण्यात आली. संकलित तथ्यांना समाजशास्त्रीय स्वरुप देऊन मिळविलेल्या माहितीचे विशलेषण करण्यात आले.

८) संशोधनाची ग्रहीतके (Hypothesis of Research):-

अभ्यासाठी जो विषय निवडलेला आहे त्या विषयासाठी काही ग्रहीकृत्याची मांडणी करण्यात आलेली होती. ती मांडणी खालील प्रमाणे होती.

१) बंजारा समाजात विविध रुढी, प्रथा, परंपरा यांचे प्राबल्य आहे.

२) बंजारा समाजात आर्थिक मागासलेपणा बहूकारणी आहे.

३) बंजारा समाजात अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे.

४) बंजारा समाजात शैक्षणिक मागासलेपणा असून मुलीच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

५) आधुनिक सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्याची प्रथा कमी आहे.

६) बंजारा समाज राजकिय दृष्ट्या अजागरुक आहे.

९) तथ्य संकलनातील अनुभव (Experience in Data Collection):-

संशोधन कर्त्यास कोणत्याही समाजाचा अभ्यास करतांना त्या समाजा विषयी सखोल माहिती असतेच असे मात्र नाही. संशोधकास तथ्य संकलन करतांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागते. मी जेव्हा वडवणी तालुक्यातील असणाऱ्या बंजारा समाजाच्या तांड्यावर माहिती मिळविण्यासाठी गेलो असता अनेक कटू प्रसंग माझ्या समोर आले. अगदी पहिल्याच वेळी बिचकुलदरा तांडा येथे गेलो असता माझ्या विषयी त्यांना काही फारशी आपुलकी वाटली नाही. पण अनेक वेळा तांड्यांना भेटी देण्याचा प्रसंग आला तेव्हा मात्र तांड्यातील एक ना एक माणूस मला भेटण्याचा प्रयत्न करु लागला. माझ्याशी सर्वजण मनमोकळे पणाने बोलु लागले. मी बंजारा समाजातील असल्या कारणाने मला बंजारा भाषा येणे साहाजिकच होते. भाषेचे ज्ञान अवगत असल्यामुळेच मला संशोधनासाठी लागणारी माहिती अतिशय कमी वेळेत मला प्राप्त करता आली. दामूनाईक तांडा हा वडवाणी पासून २ कि.मी. अंतरावर आहे. मी जेव्हा या तांड्यात गेलो तेव्हा एका वयवृध्द महिलेशी संपर्क साधून बंजारा समाजाची माहिती विळवावी म्हणून प्रयत्न केला तर त्या महिलेने मला चक्क माहिती देण्यासाठी ५०० रुपयाची मागणी केली. या प्रसंगी मला माहिती मिळविण्यासाठी ५०० रुपये नाही परंतू ३०० रुपये द्यावे लागले. तोच प्रसंग दुसऱ्या एका तांड्यामध्ये वेगळ्या प्रकारचा घडून आला. ते म्हणजे मी तुला बंजारा समाजाची सर्व माहिती सांगतो परंतु मला पायात घालण्यासाठी जोडा घेऊन द्यावा लागेल. परंतु गरजूवंताला अक्कल नसते या उक्तीप्रमाणे मी त्यास ४०० रुपये देऊ केले. असे विविध प्रसंग संशाधन काळाच्या दरम्यान आले.

१०) संशोधन अहवाल (Research Report) :-

'वडवणी तालुक्यातील बंजारा समजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाजशास्त्रीय अभ्यास' करण्याचा एक छोटासा प्रयत्न केलेला आहे. या संशाधन समस्येचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत अनुसूची या तंत्राचा उपयोग करुन, संशोधनाचा जो उदेश होता तो साध्य करण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

संदर्भ

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन बीड जिल्हा मार्च २००९ पृ. क्र. १

२) कित्ता पृ. क्र. ६८

३) कित्ता पृ. क्र. ०१

४) कित्ता पृ. क्र. ०२

५) Festinger Leonand Daniel Katz (eds) 1966, Research methods in the Behavioural science, New york Holt, Rinenart and wiston - page No 73.

प्रकरण ०३
कुटुंब आणि विवाह

मानवाच्या संपूर्ण सामाजिक संस्थामध्ये कुटुंब सस्था ही एक आधारभूत व सर्व व्यापी सामाजिक संस्था आहे. मानवी विकासाच्या सर्वच अवस्थामध्ये कुटुंबाचे अस्तित्व दिसून येते. मानवी समाजाच्या विकास टप्प्यातील पहिली आवस्था म्हणजे कुटुंब होय. मानवी समाजाचा इतिहास कुटुंबाचा इतिहास होय. मानवी समाजाच्या अनेक स्थित्यंतरानंतरही तो अद्याप टिकून राहिला आहे. कुटुंब संस्थेच्या निर्मितीमुळेच समाजातील स्थैर्य व सातत्य टिकून राहिले आहे. म्हणूनच कुटुंब संस्थेला सर्व प्रकारच्या समाजात महत्वपूर्ण स्थान आहे. केवळ व्यक्तीचे एकत्रीकरण म्हणजे कुटुंब नव्हे. एका विशिष्ट प्रकारच्या सामाजिक संबधाची व्यवस्था असाच कुटुंबाचा अर्थ अभिप्रेत आहे. संस्कृतीच्या सर्वच स्तरात मग ती प्रगत असो अथवा मागास, कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कुटुंब संघटन दिसून येते. शारीरिक गरजा अथवा कामवासनांची पूर्तता या गरजांनीच कुटुंब संस्थेला जन्म दिला. कुटुंब हेच नवजात अपत्यांची व गर्भवती माताची देखभाल करते. लैगिक संबध आणि अपत्यप्राप्तीचे नियम करुन त्यांना सामाजिक मान्यता प्रदान करते. भावनात्मक घनिष्ठतेच्या वातावरणाची निर्मिती करुन मुलांचे पालपोषण, सामाजिकरण आणि शिक्षणासाठी योगदान देते. एवढेच नव्हे तर आपल्या कुटुंब सदस्यांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकिय गरजांच्या पूर्ततेसाठी योगदान देते.

कुटुंब हे मानवी जातीचे आत्मरक्षण, वंशसंवर्धन आणि जातीय जीवनांची निरंतरता कायम ठेवण्याचे प्रमुख साधन आहे. मनुष्य हा मृर्त्य प्राणी आहे, परंतु मानव समाज हा अमर प्राणी आहे. मृत्यू आणि अमरत्व या दोन विरोधी टोकाच्या अवस्थांचे समन्वय कुटुंबातच होत असते. मनुष्याचा जन्म, विकास व सामाजिकरणाचा प्रारंभ कुटुंबातच होतो. कुटुंबाचे विकसीत स्वरुप म्हणजेच संपूर्ण मानवजात असे आपण म्हणतो. कुटुंब संस्था प्रत्येक समाजात दिसत असली तरी त्याचे स्वरुप मात्र सारखे नाही. समाजपरत्वे कुटुंबाचा आकार, सभासद, संरव्या, विवाह, अधिकार व कर्तव्य यांच्यातील स्वरुप भिन्न असु शकते. एवढे मात्र खरे की, बुध्दिमतेची अद्वितीय देणगी प्राप्त झालेल्या मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी व्यक्तीचे सहकार्य घेवून निसर्गाचा उपयोग केला. अनेक समूह निर्माण करुन मानवी संस्कृतीच्या विकासाला हातभार लावला. या प्रक्रियेत कामवासनेची गरज पूर्ण करण्याची विषम लिगीयांचे सहकार्य घेतले. त्या अनुसंगाने येणारी अपत्यप्राप्ती व त्याचे संगोपन या गरजा भागविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्य संघटनेलाच कुटुंब म्हणण्यात येवू लागले.[१]

आप्तसंबध, रक्तसंबध ही कार्ये कुटुंब संकल्पनेशी इतकी निगडीत आहे की, समाज शास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी या घटकांनाच महत्व देवून कुटुंबाची व्याख्या केली आहे. यात प्रामुख्याने हर्टन आणि हंट म्हणतात,

‘‘असा नातेसंबधीत गट की, जो निश्चीत मानवी गरजा भागवितो आणि मुलांचे पालन पोषण करतो ते कुटुंब होय.’’ डी. एन. मुजुमदार म्हणतात, ‘एकाच गटात राहणात्या, एकमेकांशी रक्तसंबधीत असणाऱ्या आणि स्थान, हित व परस्परांविषयीच्या कर्तव्याची जाणीव याबदल जागरुक असणाऱ्या व्यक्तीच्या समूहास कुटुंब म्हणतात.’ ‘प्रजोत्पादन करण्यासाठी लहान, कायमस्वरुपाचा, पुरेशा लैगिंक संबंधावर आधारीत गट म्हणजे कुटुंब होय.’ अशी व्याख्या मॅकआयव्हर आणि पेज यांनी केली आहे.

लैगिंक संबधावर आधारलेल्या आणि प्रजोत्पादन करुन बालसंगोपन करणाऱ्या समूहाला जर राहण्यासाठी घर असेल, तर त्यांचे परस्पराशी रक्तसंबध असतील, ज्याने स्थान, हित, परस्पराविषयी जाणीव ठेवण्याची तयारी ठेवली असेल अशा समूहाला नक्कीच कुटुंब म्हणता येते. विविध विचारवंतानी कुटुंबाबाबत जे विचार प्रकट केले आहेत ते बंजारा समाजातील कुटुंबाला लागू पडते.

धर्म निहाय निवेदक

भारतीय समाजात विविधता आहे. भारतात अनेक धर्माचे, जातीचे, वंशाचे, भाषाचे, पंथाचे संस्कृतीचे लोक राहतात. ग्रामीण, आदीवासी, शहरी लोक वस्तीची विविधता आढळते. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही. वडवणी तालुक्यामध्ये बंजारा समाजाचे वास्तव्य आहे. या तालुक्यातील बंजारा समाजाचा अभ्यास करतांना आपला धर्म कोणता आहे याची माहिती तक्ता क्रमांक ३.१ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.१ धर्म निहाय निवेदक

अ. क्र.	निवेदकाचा धर्म	वारंवारीता	टक्केवारी
१	हिंदू	९८	९८ %
२	इसलाम	-	-
३	ख्रिचन	-	-
४	जैन	-	-
५	शिख	०२	०२ %
६	इतर	-	-

प्रस्तुत संशोधन करतांना वडवणी तालुक्यातील बंजारा समाज हा कोणत्या धर्माचा आहे याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा असे आढळून आले की, एकूण १०० निवेदका पैकी ९७ % निवेदक हे हिंदू धर्माचे आढळून आले. बंजारा समाजावर शिख धर्माचा प्रभाव असल्या कारणाने एकूण निवेदका पैकी ०३ % निवेदक हे शिख धर्माचे आढळून आले. संशोधन काळादरम्यान इस्लाम, ख्रिश्चन, जैन व इतर धर्माचा एकही निवेदक आढळून आला नाही. सदरील तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविल्या प्रमाणे बहुतांशी बंजारा समाजाचे निवेदक हे हिंदू धर्माला मानणारेच आहे. हे या ठिकाणी स्पष्ट होते. केवळ ३ % निवेदकांनी शिख धर्म स्वीकारल्याचे दिसून आले.

वयोगट निहाय निवेदक

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाची माहिती जाणून घेण्यासाठी कोणत्या वयोगटातील निवेदकाची निवड करणे योग्य ठरेल. कारण प्रस्तुत संशोधनासाठी कोणते निवेदक माहिती देऊ शकता हा दृष्टीकोण समोर ठेवून विविध वयोगटाच्या निवेदकाची निवड करण्यात आली आहे. याची माहिती तक्ता क्र. ३.२ मध्ये स्पष्ट केलेली आहे.

तक्ता क्र. ३.२ लिंग व वयोगट निहाय निवेदक

लिंग	वयोगट							
	०० ते २५	२६ ते ३०	३१ ते ३५	३६ ते ४०	४१ ते ४५	४५ पुढे	वारंवारीता	टक्केवारी
स्त्री	-	-	०१		०२	०२	०५	०५%
पुरुष	१०	१६	०४	१२	१८	३५	९५	९५%

एकूण १०० निवेदका पैकी वयोगट निहाय विचार करता जास्तीत जास्त वयोगटाच्या निवेदकांना प्राधान्य देण्यात आलेले आहे. नमुना निवड म्हणून वडवणी तालुक्यातील पाच तांड्याची सहप्रयोजन नमुना निवडीच्या आधारे निवड करण्यात आली. मुलाखतीसाठी कुटुंब प्रमुखांची निवड करण्यात आली. त्यामध्ये स्त्री कुटुंब प्रमुखांचा समावेश कण्यात आलेला आहे. कारण विधवा स्त्री कुटुंबप्रमुख म्हणून एकूण निवेदका पैकी ०५% स्त्रियांची निवड करण्यात आली आहे. पुरुष कुटुंब प्रमुख म्हणून ९५% निवेदकांची निवड करण्यात आली आहे.

सदरील तक्त्यामध्ये ० ते २५ वर्षे वय, २६ ते ३०, ३६ ते ४० वयोगटामध्ये एकती स्त्री ही कुटुंब प्रमुख म्हणून दिसून आल्या नाही. कारण त्यांचे पती हायात असल्याकारणामुळे कुटुंब प्रमुख हे पुरुषच आढळून आले.

निवेदकाचा शैक्षणिक स्तर

आजच्या परिवर्तनाच्या काळामध्ये शिक्षण ही एक महत्वाची बाब समजली जाते. शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे प्रवेश द्वार आहे असे म्हटले जाते. मानवाची प्रगती व अधोगती ही केवळ शिक्षणामुळेच होऊ शकते.आज मिळणाऱ्या शिक्षणावरच समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारु शकते. शिक्षण हे व्यक्तीला सर्वांत सुंदर जीवन जगण्याचा मार्ग निर्माण करण्याचे कार्य करते. व्यक्तीच्या वर्तमान जाणीवपूर्वक विकास घडवून आणला जातो ते शिक्षण होय. अशा परिस्थितीमध्ये बंजारा समाजाची शैक्षणिक स्थिती काय आहे. याची माहिती तक्ता क्र. ३.३ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.३ निवेदकांचा शैक्षणिक स्तर

लिंग	शैक्षणिक स्तर								
	निरक्षर	साक्षर	प्राथमिक	माध्यमिक	उच्चमाध्यमिक	पद्वी	पदव्युत	वारंवारीता	टक्केवारी
स्त्री	०४	०१	-	-	-	-	-	०५	०५%
पुरुष	६२	१५	०४	०३	०२	०४	०५	९५	९५%
एकूण	६६	१६	०४	०३	०२	०४	०५	१००	१००%

बंजारा समाजातील शैक्षणिक स्तर पाहतांना तालुक्यातील एकूण १०० निवेदकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये स्त्री व पुरुषाचा समावेश करण्यात आला. शैक्षणिक स्तराच्या बाबतीत निरक्षर, साक्षर, प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पद्वी, पदव्युतर असे स्तर पाडले असता निरक्षर स्तरावर ६६% निवेदक आढळून आले. त्यामध्ये स्त्री निवेदक ४% तर पुरुष निवेदक ६२% आढळून आले. साक्षर स्तरावर १६% निवेदक असून त्यामध्ये १% स्त्री निवेदक तर १५% पुरुष निवेदक आढळून आले. प्राथमिक स्तरावर ४% निवेदक आढळून आले त्यामध्ये फक्त पुरुष निवेदक आढळून आले. माध्यमिक स्तरावर ३%, उच्चमाध्यमिक स्तरावर २%, पद्वी स्तरावर ४%, आणि पदव्युत्तर स्तरांवर ५%, निवेदक आढळून आले. ५% मधील निवेदक हे नोकरी करणारे आढळून आले. सदरील तक्त्याच्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, बंजारा समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असून स्त्री शिक्षणाचे प्रमाण नगण्य आहे.

वैवाहिक दर्जा

अन्न, वस्त्र, निवारा ह्या मानवाच्या मूलभूत गरजा बरोबरच 'काम' या गरजेला देखील महत्वाचे स्थान आहे. मानवेत्तर प्राणी देखील कामइच्छांची पूर्तता करतात. परंतू त्यामध्ये त्यांचा केवळ जैविक आधार असतो. विवाहाच्या बाहेर जावूनही कामतृप्ती केल्या जाऊ शकते. परंतू समाज त्याला उचित मानत नाही. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही. म्हणून बंजारा समाजाचा वैवाहिक दर्जाची माहिती तक्ता क्र. ३.४ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता ३.४ कुटुंबातील सदस्यांचा वैवाहिक दर्जा

वैवाहिक दर्जा	वय आणि लिग निहाय वयोगट												
	०० ते २५		२६ ते ३०		३१ ते ३५		३६ ते ४०		४१ ते ४५वर		एकुण		एकुण
	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	
अविवाहित	७५	९२	-	-	-	-	-	-	-	-	७५	९२	१६७
विवाहित	२५	१०	४२	३१	५३	६७	२९	३२	३३	३५	१८२	१७५	३५७
विघवा-विधुर	००	००	००	००	०४	०५	०३	०९	०७	०४	१४	१८	३२
घटस्फोटीत	००	००	००	००	०२	०३	००	०५	०१	०२	०३	१०	१३
परित्याक्ता	०४	००	०५	००	०६	००	०२	०६	००	००	१७	०६	२३
	१०४	१०२	४७	३१	६५	७५	३४	५२	४१	४१	२९१	३०१	५९२

सदरील तक्त्याच्या माहितीवरुन असे स्पष्ट होते की, एकूण १०० निवेदकांच्या कुटुंबातील वयोगट अविवाहित, विवाहित, विधवा-विधुर, घटस्फोटीत, परित्याक्ता इत्यादी प्रकारच्या सर्व नोंदी घेण्यात आलेले आहेत. वय विचारात ०० ते २५ पर्यंत, २६ ते ३०, ३१ ते ३५, ३६ ते ४०, ४१ ते ४५ च्या वर घेण्यात आलेले आहे. बंजारा समाजाची माहिती जाणून घेण्यासाठी कुटुंब प्रमुखाची निवेदक म्हणून निवड करण्यात आलेली. असून विविध वयोगटाचे आणि स्त्री, पुरुष, विधवा इत्यादीचा समावेश करण्यात आलेला आहे. एकूण १०० निवेदकांच्या कुटुंबामध्ये ५९२ व्यक्ती आढळून आल्या. अविवाहितामध्ये १६७ (२८.२०%) आहेत. त्यापैकी स्त्रिया ७५ (४४.९१%) असून पुरुष संख्या ९२ (५५.०८%) एवढी आहे. पैकी ०० ते २५ वर्ष वयापर्यंत सर्व स्त्री-पुरुष मिळून १६७ (१००%) आढळून आले.

विवाहित :-

निवेदकांच्या कुटुंबातील विवाहित गटात ३५७ (६०.३०%) सदस्य आढळून आले. त्यापैकी स्त्रिया १८२ (५०.९८%) आणि पुरुष १७५ (४९.०१%) आढळले. विवाहितामध्ये ०० ते २५ या वयोगटात स्त्रिया २५ (१३.७३%) आणि पुरुष १० (५.७१%) आहेत. २६ ते ३० या वयोगटात ४२ (२३.०७%) आणि पुरुष ३१ (१७.७१%) आहेत. ३१ ते ३५ या वयोगटात स्त्रिया ५३ (२९.१२%) आणि पुरुष ६७ (३८.२८%) ३६ ते ४० या वयोगटात स्त्रिया २९ (१५.९३%) आणि पुरुष ३२ (१८.२८%) आहेत. ४१ ते ४५ च्या वरील वयोगटात स्त्रियांची संख्या ३३ (१८.१३%) आहे. आणि पुरुष ३५ (२०%) आहेत.

विधवा-विधुर :-

एकूण निवेदकाच्या कुटुंबातील व्यक्ती पैकी विधवा स्त्रिया व विधुर पुरुष ३२ (५.४०%) आढळून आले. त्यामध्ये स्त्रिया १४ (४३.७५%) आणि पुरुष १८ (५६.२५%) आहेत. त्यापैकी ०० ते २५ या वयोगटात एकही विधवा व विधुर (स्त्री-पुरुष) आढळून आले नाही. २६ ते ३० या वयोगटात देखील (स्त्री-पुरुष) विधवा व विधुर आढळून आले नाही. ३१ ते ३५ या वयोगटात स्त्रिया ०४ (२८.५७%) आणि पुरुष ०५ (२७.७७%) आहेत. ३६ ते ४० या वयोगटात स्त्रिया ०३ (२१.४२%) आणि पुरुष ०९ (५०%) आहेत. ४१ ते ४५ च्यावर असलेल्या वयोगटात स्त्रिया ०७ (५०%) आणि पुरुष ०४ (२२.२२%) आहेत.

घटकस्फोटीत :-

एकूण व्यक्ती पैकी घटस्फोटीतांची संख्या १३ (२.१९%) असून त्या पैकी स्त्रिया ०३ (२३.०७%) आणि पुरुष १० (७६.९२%) आहेत. वयोगटानुसार ०० ते २५ या वयोगटामध्ये एकही स्त्री-पुरुष घटस्फोटीत आढळले नाही. त्याच प्रमाणे २६ ते ३० या वयोगटात सुध्दा एकही स्त्री-पुरुष घटस्फोटीत असल्याचे दिसून आले नाही. वयोगट ३१ ते ३५ मध्ये स्त्रिया ०२ (६६.६६%) आणि पुरुष ०३ (३०%) आहेत. ३६ ते ४० या वयोगटामध्ये स्त्रिया एकही आढळून आल्या नाही. परंतु पुरुषांची संख्या ०५ (५०%) आहेत. ४१ ते ४५ च्यावर असलेल्या वयोगटामध्ये स्त्रिया ०१ (३३.३३%) आणि पुरुष ०२ (२०%) आहेत.

परित्याक्ता :-

एकूण व्यक्ती पैकी परित्यांक्ताची संख्या २३ (३.८८%) एवढी असून त्यामध्ये स्त्रिया १७ (७३.९१%) आणि पुरुषाची संख्या ०६ (२६.०८%) एवढी आहे. त्या पैकी ०० ते २५ या वयोगटात स्त्रिया ०४ (२३.५२%) आणि पुरुषाची संख्या एकही नाही. २६ ते ३० या वयोगटात स्त्रिया ०५ (२९.४१%) असून पुरुषाची संख्या एकही नाही. ३१ ते ३५ या वयोगटात स्त्रिया ०६ (३५.२९%) पुरुषाची संख्या दिसून आली नाही. ३६ ते ४० या वयोगटात स्त्रिया ०२ (११.७६%) आणि पुरुष ०६ (१००%), वयोगट ४१ ते ४५ आणि त्याच्यावरील वयोगटात एकही स्त्री-पुरुष परित्याक्ता असल्याचे आढळून आले नाही.

तक्ता ३.५ कुटुंब प्रमुखा संबधीचे वर्गीकरण

अ. क्र.	लिंग	कुटुंब प्रमुख	वारंवारिता	टक्केवारी
१	स्त्री	०५	०५	०५%
२	पुरुष	९५	९५	९५%

पुर्वीच्या काळी बंजारा समाजात पितृसत्ताक कुटुंब पध्दती होती. आजच्या परिस्थितीमध्ये त्यात काही परिवर्तन झाले आहे काय ? याचा मागोवा घेऊन निवेदकांना प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा ०५% स्त्रिया ह्या कुटुंब प्रमुख असल्याचे दिसून आले आणि ९५% निवेदक पुरुष कुटुंब प्रमुख म्हणून आढळून आले. उपरोक्त तक्त्याच्या अध्ययनारुन असे आढळून येते की, बंजारा समाजात आजही पुरुष प्रधान संस्कृती असून कुटुंब प्रमुख म्हणून पुरुषच आढळून आले. काही अपरीहार्य कारणामूळे स्त्रिया कुटुंब म्हणून आढळून आल्या.

तक्ता क्र ३.६ कुटुंब प्रकार संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कुटुंब प्रकार	वारंवारीता	टक्केवारी
१	संयुक्त	२७	२७%
२	विभक्त	७३	७३%
	एकूण	१००	१००%

सदरील तक्त्यामध्ये कुटुंब प्रकाराचा मागोवा घेतला असता १०० निवेदका पैकी २७% निवदेक निवदेक संयुक्त कुटुंबात राहताना दिसून आले आणि ७३% निवेदक हे विभक्त कुटुंबात राहत असल्याचे दिसून आले. यावरुन असे स्पष्ट होते की, या समाजात विभक्त कुटुंबाचे प्राबल्य दिसून येते.

तक्ता क्र ३.७ घराच्या स्वरुपाचे वर्गीकरण

अ.क्र	घराचे स्वरुप	वारंवारीता	टक्केवारी
१	झोपडी	०६	०६%
२	कुडाचेघर	०९	०९%
३	पत्र्याचे घर	३७	३७%
४	दगड मातीचे घर	३६	३६%
५	चिरेबंदी घर	०७	०७%
६	आर.आर.सी.	०५	०५%

सदर तक्ता क्र. ३.७ मध्ये राहत्या घरासंबधीचा मागोवा घेतलेला असून १०० निवेदकांना प्रश्न विचारण्यात आला होता की, आपणर कोणत्या घरामध्ये राहता व त्यांना झोपडी, कुड, पत्रे, दगड माती, चिरेबंदी आणि आर.आर.सी. असे पर्याय देण्यात आले होते. (३७%) निवेदक हे पत्र्याच्या घरामध्ये राहतात, ३६% निवेदक दगड मातीच्या घरात राहतात, (०९%) निवेदक कुडाच्या घरामध्ये राहतात. (०७%) निवेदक हे चिरेबंदी घरामध्ये राहत असून, (०५%) निवेदक हे आर.आर.सी च्या घरात राहतांना दिसून आले. (०५%) निवेदक हे नोकरी व घरची परिस्थिती चांगली असल्याचे आढळून आले. यावरुन असे दिसून येते की बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिची अतिशय हालाकीची असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ३.८ घरातील खोल्याचे वर्गीकरण

अ.क्र.	वापरात असलेली संख्या	वारंवारीता	टक्केवारी
१	एक	१७	१७%
२	दोन	३३	३३%
३	तीन	२७	२७%
४	चार	०९	०९%
५	पाच	०९	०९%
६	सहा	०५	०५%

सदर तक्ता क्रमांक ३.८ मध्ये खोल्याच्या संरव्याचे गर्वीकरण दर्शविलेले आहे. १०० निवेदकांना प्रश्न विचारुन खोल्यांच्या संरव्याची माहिती मिळवून घेतली असता १७% निवेदक हे एका खोल्यामध्ये, ३३% निवेदक दोन खोल्यामध्ये, २७% निवेदक तीन खोल्यामध्ये, चार खोल्या राहणारे ९% निवेदक व पाच खोलल्यामध्ये राहणारे ०९% निवेदक आढळून आले. पाच पेक्षा जास्त खोल्या वापरणारे ०५% निवेदक आढळून आले. यावरुन बंजारा समाजात जास्त खोल्या वापरणारांची संख्या खूप कमी अल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ३.९ घरातील वस्तु संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	घरातील वस्तू	आहे	नाही	एकूण
१	टि.व्ही.	३०	७०	१००
२	फ्रिज	०९	९१	१००
३	शिलाई मशीन	१३	८७	१००
४	हिटर	१५	८५	१००
५	वॉशिग मशिन	०५	९५	१००
६	कुलर	१०	९०	१००
७	मिक्सर	४५	५५	१००
८	कपाट	६०	४०	१००
९	रेडीओ	२२	७८	१००
१०	व्ही. सी. डी.	१६	८४	१००
११	सी.डी.	१९	८१	१००
१२	टेपरेकॉर्ड	१७	८३	१००
१३	इस्त्री	२३	७७	१००
१४	फॅन	३७	६३	१००
१५	टेलीफोन	०२	९८	१००
१६	मोबाईल	६७	३३	१००
१७	वरील पैकी सर्व	२०	८०	१००

निवेदकांच्या मुलाखती घेत असतांना घरामध्ये कोणकोणत्या वस्तू आहेत किंवा नाहीत असा प्रश्न विचारुन त्यांना तक्त्यामधील पर्याय दिलेले होते. तक्ता क्र. ३.९ मध्ये टि.व्ही वापरणाऱ्यांची संख्या ३०% असून ७०% टि.व्ही. न वापणारे आहेत. ०९% निवेदक हे फ्रिज वापणारे असून ९१% निवेदक फ्रिज न वापणारे आहेत. शिलाई मशिन वापणारे १३% निवेदक व न वापणारे ८७% आहे. हिटर वापणारे निवेदक १५% निवेदक असून न वापणारे ८५% आहेत. वॉटिंग मशिन आहे म्हणारे ०५% निवेदक असून नाही म्हणणार ९५% आहेत. कुलर आहे म्हणारे निवेदक १०% आहे व नाही म्हणणारे ९०% आहेत. मिक्सर आहे म्हणणारे ४५% निवेदक असून नाही म्हणणारे ५५% निवेदक आहे. कपाट आहे म्हणणारे ६०% व नाही

म्हणणारे ४०% निवेदक आहेत. रेडिओ आहे म्हणणारे २२% व नाही म्हणणारे ७८% आहेत. व्हि.सी.डी आहे असे १६% व नाही म्हणणारे ८४% निवेदक आहेत. सी.डी. आहे असे १९% निवेदक असून नाही ८१% टेपरेकॉर्ड आहे असे १७% व नाही म्हणणारे ८३%, स्त्री आहे असे २३% व नाही म्हणणारे ७७% निवेदक आहेत, फॅन आहे असे ३७% व नाही म्हणणारे ६३%, टेलीफोन आहे असे म्हणणारे ०२% व ९८% नाही म्हणणारे आहे. मोबाईल आहे असे म्हणणाऱ्याची संख्या ६७% असून नाही म्हणणाऱ्याची संख्या ३३% आणि तक्त्यामध्ये दर्शविलेल्या वस्तु पैकी सर्वच वस्तु आहेत असे म्हणणारे २०% निवेदक आढळून आले. आणि वरील पैकी नाही म्हणणारे ८०% निवेदक आढळून आले.

तक्ता ३.१० घरातील सुविधे संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	घरातील सुविधा	आहे	नाही	एकूण
१	वीज (लाईट)	७५	२५	१००
२	नळ कनेक्शन	०५	९५	१००
३	शौचालय	०७	९३	१००
४	स्नान गृह	४५	५५	१००

कोणत्याही व्यक्तीचा सामाजिक दर्जा हा कसा आहे. हे ठरविण्यास त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक ठरते. सदरील तक्त्यामध्ये त्यांच्या घरात कोणकोणत्या सुविधा आहे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते. वीज (लाईट) आजच्या परिस्थिती आवश्यक मानलेली आहे कुअुंबातील बऱ्याच गोष्टी त्यावर आवलंबून आहेत. बंजारा समाजातील १०० निवदेकांचा मागोवा घेतला असता ७५% निवेदक लाईट आहे असे म्हणणारे आढळून आले व नाही म्हणणारे २५%निवेदक आढळून आले. घरामध्ये पाण्याचे नळ कनेक्शन आहे असे ०५% निवेदक आढळून आले. व नाही असे म्हणणारे ९५% निवेदक आढळून आले. शौचालय आहे असे म्हणणारे ०७% निवेदक आहेत. आणि नाही म्हणणारे ९३% निवेदक आढळून आले. स्नान गृह आहे असे म्हणणारे ४५% निवेदक आढळून आले आणि नाही म्हणणारे ५५% निवेदक आढळून आले. थोडक्यात वरील तक्त्याच्या आधारे वीज (लाईट), नळकनेक्शन, शौचालय आणि स्नानगृह आहे असे म्हणणारे ३३% निवेदक आढळून आले. आणि वरील पैकी कोणत्याच सुविधा नाहीत असे म्हणणारे ६७% निवेदक आढळून आले.

तक्ता क्र. ३.११ कुटुंबात बोलली जाणारी भाषांचे वर्गीकरण

अ.क्र.	कुटुंबात बोलली जाणारी भाषा	वारंवारिता	टक्केवारी
१	बंजारा	८७	८७%
२	मराठी	-	-
३	दोन्ही	१३	१३%
४	अन्य	-	-

संशोधन क्षेत्रातील बंजारा जातीची संख्या सर्वाधिक आहे. बंजारा समाजातील १०० निवेदकांना प्रश्न विचारण्यात आला. तो म्हणजे कुटुंबात कोणती भाषा बोलली जाते. तेव्हा ८७% निवेदक बंजारा भाषा बोलणारे आहेत. बंजारा आणि मराठी अशा दोन्ही भाषा बोलणारे निवेदक १३% आढूळन आले. यावरुन असे लक्षात येते की, बंजारा कुटुंबात सरासरीने बंजारा भाषेचा अवलंब करणाऱ्या निवेदकाची संख्या जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.३.१२ आहारा संबंधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आहार प्रकार	वारंवारिता	टक्केवारी
१	शाकाहारी	२०	२०%
२	मांसाहारी	८०	८०%
३	दोन्ही	८०	८०%

प्रत्येक समाजाची आहार पध्दती ही वेगवेगळी असते. यास बंजारा समाज देखील देखील अपवाद नाही. बंजारा समाजात कोणत्या प्रकारचा आहार घेतला जातो. याचे विवरण वरील तक्त्यात केले आहे. बंजारा समाजात शाकाहारी आहार घेणारे २०% निवेदक आढळून आले. मांसाहार करणारे ८०% निवेदक आढळून आले. शाकाहार आणि मांसाहार अशा दोन्ही प्रकारचे आहार घेणाऱ्या निवेदकाचे प्रमाण ८०% इतके आहे. याचे कारण म्हणजे जो शाकाहारी असतो, तो मात्र मासाहार करीत नाही परंतू जो मांसाहारी असतो तो मात्र शाकाहारी असतो म्हणून दोन्ही आहार सेवन करणाऱ्याचे प्रमाण ८०% इतके आहे. असे उपराक्त तक्त्यातील माहितीच्या आधारावर स्पष्ट होते. थोडक्यात बंजारा समाजात मांसाहार करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

तक्ता क्र. ३.१३ कुटुंबातील स्त्रियाचा दर्जा संबधी वर्गीकरण

अ.क्र.	कुटुंबात स्त्रियाचा दर्जा	वारंवारीता	टक्केवारी
१	श्रेष्ठ	-	-
२	कनिष्ठ	९८	९८%
३	मध्यम	०२	०२%

भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे. यामुळे भारतीय समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा पारंपारिक समाजापासून ते आजपर्यंत कशा प्रकाराचा आहे याचा मागोवा घेतांना स्त्रियांचा दर्जा संबधिची माहिती उपरोक्त तक्त्याच्या अध्ययनावरुन लक्षात येते. बंजारा समाजातील स्त्रियांचा दर्जा कुटुंबाच्या बाबतीत कसा आहे; असा प्रश्न १०० टक्के निवेदकांना विचारला असता ९८% निवेदकांनी बंजारा स्त्रियांचा दर्जा कुटुबात कनिष्ठ मानल्याचे दिसून येते. फक्त ०२% निवेदकांनी बंजारा स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा मध्यम स्वरुपाचा आहे असे सांगील्याचे दिसून येते. बंजारा समाजातील स्त्रियांचा दर्जा फक्त कुटुंबातच कनिष्ठ मानला जात नाही. तर समाजिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रात देखील कनिष्ठ मानला जातो. मुलाखतीच्या वेळी स्त्रियां मात्र पुरुषांना घाबरुन घराबाहेर येण्याचे धाडस करीत नव्हत्या. यावरुन असे स्पष्ट होते की, बंजारा समाजात आजही स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ आहे, असे आढळून आले.

तक्ता क्र. ३.१४ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया संबधी वर्गीकरण

अ.क्र.	लिंग कुटुंब नियोजन शस्त्र कोण करुन घेतात	वारंवारिता	टक्केवारी
१	स्त्री	७७	७७%
२	पुरुष	२३	२३%

कुटुंबाचा आकार मर्यादीत ठेवण्यासाठी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया महत्वाची समजली जाते. लोकसंख्या कमी करण्याचा प्रयत्न भारतात आता सर्वच पातळीवर सुरु आहे. कुटुंबातील सदस्य मर्यादीत ठेवण्यासाठी कुटुंब नियोजनाचा वापर केला जातो का ? असा प्रश्न विचारण्यात आला. कुटुंब नियोजचा शस्त्रक्रिया कोण करुन घेतात यासाठी दोन पर्याय देण्यात आले होते. बंजारा समाजात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेची जाणीव झालेली असून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्याचे प्रामण स्त्रिया मध्ये दिसून येते. ७७% स्त्रिया

कुटुंब नियोजन करुन घेतलेल्या आढळून आल्या. व फक्त १३% पुरुषांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याचे आढळून आले. तक्ता क्र. ३.१४ अभ्यासावरुन असे लक्षात येते की, बंजारा समाजात पुरुषापेक्षा स्त्रियामध्ये कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण जास्त आहे.

तक्ता क्र. ३.१५ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कधी करावी यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कुटुंब नियोजन शस्त्र क्रिया कधी करावी असे वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	एक अपत्यानंतर	२३	२३%
२	दोन अपत्यानंतर	५९	५९%
३	तीन अपत्यानंतर	०९	०९%
४	चार अपत्यानंतर	०७	०७%
५	चार पेक्षा जास्त अपत्यानंतर	०२	०२%

तक्ता क्र. ३.१५ मध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कधी व केव्हा केली जावी याचा मागोवा घेतला असता असे दिसून आले की, एक अपत्यानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली पाहिजे असे म्हणणारे २३ (२३%) निवेदक आढळून आले. दोन अपत्यानंतर कंटुंब नियोजन क्रिया करावी असे सांगणारे ५९ (५९%) निवेदक आढळून आले. चार अपत्यानंतर कुटुंब नियोजन करावे असे ०९ (०९%) निवेदक आढळून आले. आणि चार पेक्षा जास्त अपल्यानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करवी असे सांगणारे ०२ (०२%) निवेदक आढळून आले. सारांश बंजारा समाजात दोन अपत्यानंतर कुटुंब नियोजन करणाऱ्याची संख्या जास्त असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र. ३.१६ अपत्य प्रकारा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणते अपत्य जन्माला यावे असे वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	मुलगा	६७	६७%
२	मुलगी	१०	१०%
३	दोन्ही	२३	२३%

तक्ता क्र. ३.१६ मध्ये अपत्य प्रकारासंबधीची मागोवा घेतला असता असे निददर्शनास आले की, ६७ (६७%) निवेदक म्हणतात कुटुंबात प्रथमता मुलगाच जन्मास यावे असे म्हणतांना आढळून आले. १० (१०%) निवेद कुटुंबात मुलगी प्रथमता जन्मास यावे असे म्हणतांना आढळून आले आणि मुलगा आणि मुलगी कुटुंबात जन्मास आले तरी काही वाईट नाही असे सांगणारे २३ (२३%) निवेदक आढळून आले उपरोक्त माहितीच्या आधारे असे म्हणता येईल की मुली पेक्षा मुलगाच जन्मास आले तर फारच चांगले असे म्हणतांना आढळून येते.

तक्ता क्र. ३.१७ कुटुंबात मुलगा जन्मास यावे या संबधी वर्गीकरण

अ.क्र.	मुलगाच जन्माला यावे असे का वाटते	वारंवारीता	टक्केवारी
१	वंशाचा दिवा	३५	५२.२८%
२	सांभाळ करावा	१९	२८.३५%
३	संपती रक्षण	१३	१९.४०%

समाज हा कोणताही असो मग तो प्रगत किंवा अप्रगत या सर्वांना एकच वाटते की, कुटुंबामध्ये प्रथमत: मुलगा जन्मास आले तर आनंद वाटतो. याचे कारण तो त्या वंशाचा दिवा अथवा वारसादार समजला जातो ६७ (६७%) निवेदकांना प्रश्न विचारुन त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता असे आढळून आले की, मुलगा जन्मास आला तर तो वंशाचा दिवा लावणारा असतो असे म्हणणारे ३५ (५२.२८%) निवेदक आढळून आले मुलगा जन्मास आला तर तो आई-वडिलांचा सांभाळ करु शकतो असे म्हणणारे १९ (२८.३५%) निवेदक आढळून आले. १३ (१९.४०%) निवेदकांनी मुलगा जन्मास आला तर कुटुंबामध्ये जेवढी संपत्ती असेल त्याची तो रक्षण करु शकतो.

तक्ता क्र. ३.१८ मुलीच्या जन्मा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुलगी जन्मास आली तर कसे वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	चांगले वाटते	३३	३३%
२	वाईट वाटते	६७	६७%

भारतीय संस्कृती पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की आपल्या कुटुंबामध्ये मुलगा जन्माला आला तर आनंद व्यक्त केला जातो. मुलाच्या जन्माच्या वेळेस पेढे वाटून आनंद साजरा करतात. परंतू मुलगी जन्मास आली तर जन्म देणारी आई पण नाराज होते. स्त्री पण मुलीच्या जन्मास नकार देतांना दिसून येते. सदरील तक्त्याचा मागोवा घेतांना १०० निवेदकांना मुलगी जन्मास आली तर कसे वाटते या बदल प्रतिक्रया जाणून घेतांना त्यांचा चांगले वाटते, वाईट वाटते असे पर्याय देण्यात आले होते. मुलगी जन्मास आली तर चांगले वाटते असे म्हणणारे ३३ (३३%) निवेदक आढळून आले आणि मुलगी जन्मास आली तर वाईट वाटते असे सांगणारे ६७ (६७%) निवेदक आढळून आले.

तक्ता क्र. ३.१९ मुलीच्या जन्मा संबधी वाईट वाटण्याचे कारण

अ.क्र.	वाईट वाटण्याचे कारण काय आहे ?	वारवारीता	टक्केवारी
१	हुंडा द्यावा लागतो	३९	५८.२०%
२	दुसऱ्या घरी जाते	०८	११.९४%
३	दुसऱ्याची वाईट नजर राहते	१५	२२.३८%
४	इतर	०५	०७.४६%

बंजारा समाजातील निवेदकांना मुलगी जन्मास आल्यास वाईट का वाटते ? वाईट वाटण्याचे कारण काया आहे याचा जेव्हा मागोवा घेतला. ६७ (६७%) निवेदकांनी मुलगी जन्मास आल्यावर वाईट वाटते याचे कारण दिलेले आहे. मुलीला हुंडा द्यावा लागतो असे सांगणारे ३९ (५८.२०%) निवेदक आढळून आले. मुलीला पाळून पोसून दुसऱ्याघरी जावे लागते असे सांगणारे ०८ (११.९४%) निवेदक आढळून आले. मुलगी मोठी झाल्यावर मुलीवर दुसरे वाईट नजर ठेवतात असे सांगणारे १५ (०७.४६%) निवदेक आढळून आले. या व्यतिरीक्त वेगळे कारण सांगणारे ०५ (०७.४६%) निवेदक आढळून आले. सारांश बंजारा समाजात जास्त हुंडा द्यावा लागतो म्हणून मुलीच्या जन्मास विरोध करणारे ३९ (५८.२०%) निवेदक आढळून आले.

विवाह (Marriage)

विवाह ही स्त्री-पुरुषांना कौटुंबीक जीवनात प्रवेश मिळवून देणारी एक समाजिक संस्था आहे. पृथ्वीच्या पाठीवर ज्या-ज्या ठिकाणी मानवी समूह आहेत त्या-त्या ठिकाणी विवाह सारखी संख्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. प्रत्येक समाजातील विवाहाचे स्वरुप वेगळे असू शकेल ; परंतु विवाह संस्था नाही असा कोणताच समाज आढळणार नाही. विवाहामुळे पती पत्नीमध्ये अधिकार आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होते. समाज मान्य मार्गाने संततीची निर्मिती करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला विवाह करावा लागतो. विवाहाच्या माध्यमातून प्रस्थापित झालेले पती-पत्नीचे संबध दीर्घकाळापर्यंत टिकणारे असतात. जात, धर्म, पंथ यांचा विवाहाकडे पाहण्याचा दृष्टीकोण भिन्न भिन्न स्वरुपाचा असतो. काही समाजात विवाह संस्कार आहे तर काही समाजात तो करार मानला जातो. कुटुंबाची स्थापना, समाज मान्य मोर्गाने लैगिंक संबध कौटुंबिक स्वास्थ मुलांचे संगोपन यासाठी विवाह संस्काराला अत्यंत महत्व आहे.

हिंदू विवाहाची कल्पना स्पष्ट करतांना आर. एन. मुखर्जी म्हणतात, काही धार्मिक संस्काराच्या साहाय्याने समाजाने मान्यता दिलेले स्त्री-पुरुषांचे विधिवत मिलन म्हणजे हिंदू विवाह होय. धर्मकार्य, पुत्रप्राप्ती व रती हे विवाहाचे तीन मुख्य उदेश आहेत. व्यक्ती कोणत्याही जाती-जमातीचा असो, प्रत्येकाच्या जीवनात विवाह संस्काराला आवश्यक समजण्यात आलेले आहे. बंजारा समाजाने देखील विवाहाला संस्कार मानलेले आहे. जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहणारा बंजारा समाज विवाहाच्या संदर्भात आपले वेगळे अस्तित्व निर्माण करुन आहे.

बंजाराच्या विवाह पध्दती, विवाहाचे प्रकार, विवाह विधी, हुंड्याची प्रथा इत्यादी बाबीचे विवेचन या ठिकाणी निवेदका कडून मुलाखत अनुसूची भरुन त्यात आलेल्या माहितीच्या आधारे स्पष्ट करण्यात आलेले आहे. बंजारा समाजात विवाह, जन्म, मृत्यू हे तीन संस्कार अतिशय महत्वाचे मानले जातात. विवाहा सारखा विधी पार पाडतांना कोणकोणत्या घटकांना प्राधान्य देण्यात आलेले आहे. विवाह संबध जुळविण्यापूर्वी बंजारा समाजातील लोक जाती, उपजाती, कुळ, पाडा इत्यादीचा बारकाईने विचार करतात. एका कुळातील व्यक्ती सगोत्र समजल्या जातात. राठोड-पवार, पवार-चव्हाण, जाधव-चव्हाण अशी विषम असणारी आडनावे ते असतील तर अशा जाती-जमातीमध्ये विवाह संबध प्रस्थापित केले जातात. आते-मामे बहिण भावाचे विवाह बंजारा समाजात होतात. अपवादात्मक बाल विवाहाचे प्रकार आढळून येतात.

मुलाखत अनुसूचीच्या आधारे जी माहिती प्राप्त झालेली आहे. त्याचा क्रमशा या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ३.२० विवाह स्वरुपा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	बंजारा समाजातील विवाहाचे स्वरुप	वारंवारीता	टक्केवारी
१	आधुनिक	९३	९३%
२	पारंपारीक	०७	०७%

विवाह हे दोन जीवाचे मिलन समजले जाते. पूर्वीच्या काळात बंजारा समाजात पारंपारिक विवाहाचे प्रमाण जास्त प्रमाणात होते असे. परंतू आज परिवर्तनाच्या प्रवाहामध्ये बंजारा विवाह पध्दतीमध्ये बदल झालेला दिसून येतो. जेव्हा या प्रश्नासंबधीचा मागोवा घेताला तेव्हा असे आढळून आले की, आधुनिक विवाह पध्दतीचे पालन करणारे ९३ (९३%) निवेदक असून पारंपारिक म्हणजे जुन्या पध्दतीने विवाह करणारे ०७ (०७%) निवेदक आढळून आले.

आजच्या परिस्थितीमध्ये बंजारा समाजाने स्वत:स बदलून घेतल्याचे दिसते. पूर्वीच्या काळी बंजारा समाजात बाल विवाहाची प्रथा होती ती आज आहे की, नाही याची माहिती तक्ता क्र ३.२० मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.२१ बालविवाह प्रथेचे वर्गीकरण

अ.क्र.	बंजारा समाजात बालविवाहाची प्रथा आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	०२	०२%
२	नाही	९८	९८%

तक्ता क्र. ३.२१ मध्ये बंजारा समाजातील १०० निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला की, बंजारा समाजात बालविवाहाची प्रथा आहे काय ? याला होय आणि नाही असे पर्याय देण्यात आले होते. १०० पैकी ९८ (९८%) निवेदकांनी बालविवाहाच्या प्रथेचा नकार दर्शविल्याचे दिसून येते आणि फक्त ०२ (०२%) निवेदकांची यास होकार दिल्याचे आढळून आले. यावरुन असे लक्षात येते की, बंजारा समाजामध्ये बालविवाहाची प्रथा नाही असे स्पष्ट होते. फक्त ०२ (०२%) निवेदकांना बाल विवाहाचे कारण विचारले असता त्यांनी वेगवेगळी कारणे सांगीतल्याचे दिसून आले ती म्हणजे विवाहाच्या जिम्मेदारीतून मुक्त होता येते, कुटुंबात मनुष्य बळ वाढते, शेती कामात मदत होते.

तक्ता क्र. ३.२२ बालविवाह न करण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	बालविवाह न करण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	समाजाची भिती	२९	२९.५९%
२	कायद्याची भिती	६९	७०.४०%

बाल विवाह न करण्याच्या कारणा संबधीचा मागोवा घेता ९८ (९८%) निवेदकांना हा प्रश्न विचारण्यात आला होता. तेव्हा समाजाची भिती वाटते असे म्हणणारे २९ (२९.५९%) निवेदक आढळून आले. कायद्याची भिती वाटते असे म्हणणारे ६९ (७०.४०%) निवेदक आढळून आले. सदरील तक्त्यातील माहितीच्या आधारे असा निष्कर्ष काढता येतो. बंजारा समाजात बाल विवाहाची प्रथा नाही असेच म्हणावे लागेल. काही अपवाद वगळता बाल होतांना दिसून येतात.

तक्ता ३.२३ विवाह विषयक निर्णयाचे वर्गीकरण

अ.क्र.	विवाह विषयक निर्णय कोण घेतात	वारंवारीता	टक्केवारी
१	कुटुंब प्रमुख	६९	६९%
२	कुटुंबातील सदस्य	२१	२१%
३	स्वत:	१०	१०%

प्रत्येक समाजाचा प्रथा आणि परंपरा ह्या वेगवेगळ्या असतात. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही. सदरील तक्त्यामध्ये बंजारा समाजातील विवाह विषयक निर्णय कोण घेतात असा प्रश्न १०० (१००%) निवेदकांना विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाला पर्याय म्हणून कुटुंब प्रमुख, कुटुंबातील सदस्य, स्वत: असे पर्याय देण्यात आले होते. बंजारा समाजात विवाह विषयक निर्णय हे कुटुंब प्रमुखच घेतात असे सांगणारे ६९ (६९%) निवेदक आढळून आले. विवाहाच्या बाबतीत कुटुंबातील सदस्य मिळून निर्णय घेतात असे २१ (२१%) निवेदक आढळून आले. विवाहाच्या बाबतीत स्वत: निर्णय घेणारे १० (१०%) निवेदक आढळून आले. थोडक्यात असे म्हणता येईल की, आजच्या बदलत्या परिस्थिती देखील बंजारा समाजाने आपली मुळ संस्कृती कायम ठेवल्याचे आढळून आले.

बंजारा समाजामध्ये विवाह करण्या पर्वी मुला-मुलीची पसंती विचारात घेतली जाते काय ? या संबधी माहिती तक्ता क्र. ३.२४ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.२४ मुला-मुलीच्या विवाह जुळणीचे वर्गीकरण

अ.क्र.	विवाह जुळणी पूर्वी मुला-मुलीच्या पसंतीचा विचार केला जातो काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७३	७३%
२	नाही	२७	२७%

बंजारा समाजामध्ये पूर्वी आई-वडिलांच्या पसंती वरुन मुला-मुलीचा विवाह केला जात असे. मुलाखत अनुसूची भरुन घेतांना १०० निवेदकांना विवाह पूर्वी किंवा विवाह जुळणी पूर्वी मुला-मुलीच्या पंसतीचा विचार केला जातो काय ? या प्रश्नाच्या प्रतिक्रियासाठी होय आणि नाही असे पर्याय देण्यात आले होते. विवाह पूर्वी मुला-मुलीच्यपसंतीचा विचार केला जातो असे सांगणारे ७३ (७३%) निवेदक आढळून आले. मुला-मुलीच्या पसंतीचा विचार केला जात नाही असे सांगणारे २७ (२७%) निवेदक आढळून आले.

बंजारा समाजातील मुला-मुलीने अंतर जातीय विवाह करावा किंवा नाही, या संबधीची माहिती तक्ता क्र. ३.२५ मध्ये सांगण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.२५ आंतरजातीय विवाह संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुला-मुलीने अंतर जातीय विवाह करावा असे वाटते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	-	-
२	नाही	१००	१००%

कोणत्याही समाजात होणारी स्थित्यंरे त्यात नवीन पधदतीचा होणारा समावेश यावरुन कोणत्याही समाजाचा प्रागतिक प्रवाह दिसून येतो. या प्रवाहात जोडला गेलेला नवीन विचार व संस्कार म्हणजे आंतर जातीय विवाह होय. प्राचीन काळात मान्य झालेली वर्णव्यवस्था व जाती व्यवस्था विवाह संस्थेस अमान्य करुन आंतरजातीय विवाह आजही कमी अधिक प्रमाणात का असेना ते होतांना दिसून येतात. बंजारा समाजात आंतरजातीय विवाहास १००% निवेदकांनी आंतर जातीय विवाह करणे म्हणजे जात पंचायतीचा रोष ओढून

घेणे होय. बंजारा समाजात असे विवाह आढळून येत नाही. परंतू अपवादात्मक एखादे असे विवाह झालेच तर समाज त्यास वाळीत टाकतो असे निवेदकांच्या बोलण्यातून समजले.

तक्ता क्र. ३.२६ आंतरजातीय विवाह न करण्याचे कारण

अ.क्र.	आंतर जातीय विवाह न करण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	समाजाची भिती वाटते	०७	०७%
२	जात पंचायतीची भिती वाटते	८३	८३%
३	समाज वाळीत टाकतो	१०	१०%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या वैवाहीक स्थितीचा मागोवा घेतांना या प्रश्नाला अनुसरुन निवेदकाच्या प्रतिक्रियेचा विचार करण्यात आलेला आहे. बंजारा समाजामध्ये आंतर जातीय विवाह का केला जात नाही असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला अनुसरुन ८३ (८३%) निवेदकांनी आंतरजातीय विवाह करु नये असे सांगतांना आढळून आले. याचे कारण त्यांनी जातपंचायतीच्या भिती मुळे असे विवाह करणे कठीण असते. आंतर जातीय विवाह करुन नये असे सांगणारे ०७ (०७%) निवेदक असून समाजाची भिती वाटते असे कारण सांगतांना आढळून आले. आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाज अशा लोकांना वाळीत टाकतो असे सांगणारे १० (१०%) निवेदक आढळून आले. यावरुन असे लक्षात येते बंजारा समाजामध्ये जातीय अभिमान बळगणारे व जाती अंतर्गतच विवाह करावा असा निष्कर्ष या तक्त्याच्या माहितीवरुन लक्षात येते.

बंजारा समाजात हुंडा घेताला जातो काय यासंबधीचे विवेचन तक्ता क्र. ३.२७ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ३.२७ हुंडा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	बंजारा समाजात हुंडा घेतला जातो काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	९८	९८%
२	नाही	०२	०२%

समाज हा कोणताही असो प्रत्येक समाजात हुंडा घेणे हा एक शिष्टाचार झालेला आहे. बंजारा समाजात हुंडा घेतला जातो व दिलाही जातो. परंतु कायद्या प्रमाणे हुंडा घेणे व देणे गुन्हा समजण्यात आलेला आहे. हुंडा घेण्या संबधीचा मागोवा घेतांना ९८ (९८%) निवेदक हे हुंडा घेणे पसंत करतात. परंतु केवळ ०२ (०२%) निवेदक हे हुंडा न घेणारे आढळून आले. यावरुन असे लक्षात येते. बंजारा समाजात हुंडा घेणाऱ्या प्रमाणे सर्वाधिक म्हणजे ९८ (९८%) इतके असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र. ३.२८ हुंड्याच्या प्रमाणा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	किती हुंडा घेतला जातो	वारंवारीता	टक्केवारी
१	१५००० ते २०,०००	३८	३८.७७%
२	२१००० ते ३५०००	१७	१७.३४%
३	३१००० ते ४०,०००	१५	१५.३०%
४	४१००० ते ५०,०००	१९	१९.३८%
५	५०,००० पेक्षा जास्त	०९	०९.१८%

प्रस्तुत तक्ता क्र. ३.२८ मध्ये बंजारा समाजामध्ये हुंड्याच्या प्रमाण संबधीचे वर्गीकरण्यात आलेले ९८ (९८%) निवेदकांना किती हुंडा घेताना जातो यासंबधी प्रश्न विचारण्यात आला तेव्हा १५००० ते २०,००० हुंडा घेणारे ३८ (३८.७७%) निवेदक असल्याचे आढळून आले. २१००० ते ३०००० पर्यंत हुंडा घेणारे १७ (१७.३४%) निवेदक आले. ३१००० ते ४०००० पर्यंत हुंडा घेणारे १५ (१५.३०%) निवेदक आढळून आले. आणि ५०,००० पेक्षा जास्त हुंडा घेणारे १९ (१९.३८%) निवेदक आढळून आले. सारांश बंजारा समाजामध्ये हुंडा घेण्याऱ्याचे प्रमाण ९८ (९८%) इतके असल्याचे आढळून आले.

बंजारा समाजात हुंडा का व कशासाठी घेतला जातो. या संबधीची माहिती तक्ता क्र. ३.२९ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ३.२९ हुंडा घेण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	हुंडा घेण्याचे कारण	वारंवारीता	टक्केवारी
१	सामाजिक प्रतिष्ठा	३५	३५.७१%
२	परंपरा	२०	२०.४०%
३	आर्थिक मदत	४३	४३.८७%

प्रस्तुत तक्ता क्र. ३.२९ मध्ये बंजारा समाजात हुंडा का व कशासाठी घेतला जातो. याचा मागोवा घेता ९८ (९८%) निवेदकांना प्रश्न विवारुन त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या. प्रश्नाच्या प्रतिक्रियेसाठी समाजिक समाजिक प्रतिष्ठा, परंपरा आणि आर्थिक मदत असे तीन पर्याय देण्यात आले होते. सामाजिक प्रतिष्ठा म्हणून हुंडा घेणारे ३५ (३५.७१%) निवेदक आहेत. परंपरा म्हणून हुंडा घेणारे २० (२०.४०%) निवेदक आहेत. आणि आर्थिक मदत म्हणून हुंडा घेणारे ४३ (४३.८७%) निवेदक आढळून आले.

संदर्भ

१) डॉ. बी. एम. कऱ्हाडे - मूलभूत संकल्पना - पिंपळापुरे ॲन्ड क. पब्लिशर्स नागपूर, प्रथम आवृत्ती जुन २००८, पृ. क्र. ९५, ९६.

२) डॉ. भोईटे / बोबडे - सामाजिक संस्था - विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, जुन १९९४, पृ. क्र. ९२.

प्रकरण ०४
आर्थिक आणि सामाजिक स्थिती

पृथ्वी तलावर जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्यासाठी पैसा लागतो. मग ती व्यक्ती स्त्री असो अथवा पुरुष. व्यक्तीचा आर्थिक दर्जा ठरविणारा महत्वाचा घटक म्हणजे पैसा, भांडवल किंवा संपत्ती होय. पारंपारीक समाजापासून ते आधुनिक समाजामध्ये जीवन जगणाऱ्या व्यक्तीचा दर्जा हा त्याच्याकडे असणाऱ्या संपत्ती वरुन ठरविला जातो. आर्थिक प्राप्ती व्यक्तीची समाजिक गरज तसेच तिची स्वतःची प्रतिष्ठा उंचावत असते. आर्थिक प्राप्तीवरुन तिचा राहणीमानाचा दर्जा कसा आहे याची देखील जाणीव होते. त्यामुळे आर्थिक घटक आणि दर्जा यांचा अतिशय जवळचा संबध आहे. देशातील विकासाच्या प्रक्रियेमध्ये रोजगार, आर्थिक क्रिया व स्त्री-पुरुषाचे योगदान दर्शविले जाते. आर्थिक क्रियेत गुंतलेली लोकसंख्या किंवा उत्पादीत लोकसंख्या देशाच्या उत्पादनात भर घालत असते. अवलंबितांची संख्या ही अनउत्पादित गटात मोडली जाते. उत्पादीत आणि अनउत्पादीतांची संख्या देशाचा समाजिक विकास किती व कसा होत आहे हे दाखवते. तेव्हा त्यावरुन त्या-त्या देशाच्या सामाजिक विकासाची कल्पना येते. एकूणच एखाद्या गटाची सामाजिक परिस्थिती किंवा समाजिक स्थिती ही त्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. बंजारा हा एक समाजिक गट म्हणून विचारात घेतला असता त्यांची आर्थिक परिस्थिती, हा गट कसा आहे, कोणत्या स्वरुपात जीवन जगत आहेत, त्यांचा राहणीमानाचा दर्जा कसा आहे. याचा मागोवा या ठिकाणी घेण्यात आलेला.

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिती कशा प्रकारची आहे, आर्थिक उत्पन्नाची कोणकोणती साधने आहेत याचा या प्रकरणामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. ग्रामीण भागामध्ये शेती हे उत्पन्नाचे साधन मानले जाते. तेव्हा बंजारा समाजातील लोकाकडे किती प्रमाण शेती आहे. याची माहिती व त्याचा आर्थिक दर्जाची कोणकोणती साधने आहेत. हे तपासून पाहणे क्रमप्राप्त ठरते.

तक्ता क्र. ४.१ शेती संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आपल्या कडे शेती आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७३	७३%
२	नाही	२७	२७%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाचा अभ्यास करतांना १०० निवेदकाची निवड करण्यात आली व त्यांना प्रश्न विचारण्यात आला की, आपल्या कडे शेती आहे काय ? यासाठी होय आणि नाही असे पर्याय समोर ठेवण्यात आले होते. तेव्हा १०० पैकी ७३ (७३%) निवेदकांनी शेती असल्याचे सांगीतले परंतु २७ (२७%) निवेदकांनी शेती नसल्याचे सांगीतले. परंतु कोणत्या प्रकारची शेती आहे. बागायती आहे की, कोरड वाहू आहे. या संबधीची माहिती तक्ता क्र. ४.२ मध्ये सांगण्यात आलेली आहे.

तक्ता ४.२ शेती प्रकारा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शेतीचा प्रकार कोणता आहे	वारंवारिता	टक्केवारी
१	बागायती	१८	२४.६५%
२	कोरडवाहू	५५	७५.३४%

ग्रामीण भागात शेती हे आर्थिक उत्पनाचे साधन मानले जाते. बऱ्याच कुटुंबाची उपजीवीका शेतीच्या उत्पनावर चालत असते. तेव्हा बंजारा समाज देखील यास अपवाद नाही बंजारा समाजातील ७३ (७३%) निवेदकाकडे शेती असून ती कोरडवाहू स्वरुपाची आहे असे सांगणारे ५५ (७५.३४) निवेदक आढळून आले. व बागायती शेती आहे. असे सांगणारे १८ (२४.६५) निवेदक आढळून आले. बंजारा समाजाकडे शेती हे आर्थिक उत्पन्नाचे साधण जरी असले तरी बागायती शेतीच्या प्रमाणात कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.

शेती जरी असली तरी ती किती एकर आहे. याचा मागोवा घेताला आहे. बंजारा समाजातील लोकांकडे असणारी शेतीची माहिती तक्ता क्र. ४.३ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.३ शेतीच्या क्षेत्रासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शेती असेल तर किती एकर आहे ?	वारंवारिता	टक्केवारी
१	०१ ते ०२ एकर	३७	५०.६८%
२	०३ ते ०४ एकर	१६	२१.९१%
३	०५ ते ०७ एकर	०९	१२.३२%
४	०८ ते १० एकर	०६	०८.२१%
५	१० पेक्षा जास्त	०५	०६.८४%

तक्ता क्र. ४.३ मध्ये शेतीच्या क्षेत्रा संबधी माहिती लक्षात घेताना ०१ ते ०२ एकर शेती असणारे ३७ (५०.६८%) निवेदक आढळून आले. ०३ ते ०४ एकर शेती असणारे १६ (२१.९१%) निवेदक आढळून आले. ०५ ते ०७ एकर शेती असणारे ०९ (१२.३२%) निवेदक आढळून आले. ०८ ते १० एकर शेती असणारे ०६ (०८.२१%) निवेदक आढळून आले. आणि १० पेक्षाजास्त एकर शेती असणारे ०५ (०६.८४%) निवेदक असल्याचे आढळून आले.

सारांश, उपरोक्त माहितीच्या आधारे बंजारा समाजात ०१ ते ०२ एकर शेती असणाऱ्याचे प्रमाण जास्त असून १० पेक्षा जास्त एकर शेती असणाऱ्याचे प्रमाण अत्याल्प म्हणजे ०५ (०६.८४%) आहे.

तक्ता क्र. ४.४ जलसिंचनासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शेतीसाठी लागणारे जलस्त्रोत कसे आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	विहिर	२९	३९.७२%
२	बोर	३६	४९.३१%
३	पाटाचे पाणी	०८	१०.९५%

उत्पन्नाची क्षमता वाढवायची असेल शेतीसाठी पाणी असणे आवश्यक आहे. वडवणी तालुक्यातील निवेदकांना शेतीसाठी लागणारे जल स्त्रोत कोणकोणते आहे. त्यासाठी निवेदकांनी विहिर, बोर आणि पाटाचे पाणी असे पर्याय देण्यात आले होते. शेती असणाऱ्या निवेदकांनी स्त्रोत म्हणून विहीर आहे असे सांगणारे २९ (३९.७२%) निवेदक आढळून आले. जलस्त्रोत म्हणून बोर आहे असे सांगणारे ३६ (४९.३१%) निवेदक आढळून आले. पाटाचे पाणी शेतीसाठी वापरणारे ०८ (१०.९५%) निवेदक आढळून आले. बोरचे पाणी शेतीसाठी वापरणांऱ्याचे प्रमाण जास्त आहे.

तक्ता ४.५ शेती अवजारा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शेतीसाठी लागणारी सर्व अवजारे आहेत का ?	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	५७	७०.०८%
२	नाही	१६	२१.९१%

वडवणी तालुक्यातील शेती असणाऱ्या शेतऱ्यांच्या अवजारासंबधीचा मागोवा घेतला तेव्हा ५७ (७०.०८%) निवेदक शेतीसाठी लागणारी सर्व अवजारे आहेत असे सांगणारे आढळून आले. परंतु ज्याच्याकडे शेतीसाठी लागणारी अवजारे कमी अधिक प्रमाणात आहेत असे सांगणारे १६ (२१.९१%) निवेदक आढळून आले. हे निवेदक शेतीसाठी लागणारी अवजारे इतराकडून घेतात असे सांगतांना आढळून आले. कारण सर्वच अवजारे घेणे परवडत नाही असेही काही निवेदक मुलाखतीच्या वेळी सांगतांना आढळून आले.

कोणकोणती अवजारे आहेत याचा उल्लेख तक्ता क्रमांक ४.६ मध्ये करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.६ अवजारे कोणती आहेत या संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणकोणती अवजारे आहेत ?	वारंवारिता	टक्केवारी
१	नांगर	१०	१७.५४%
२	बळीनांगर	१५	२६.३१%
३	औत	२५	४३.८५%
४	तिफन	०७	१२.२८%

शेती करण्यासाठी अवजारे अत्यंत आवश्यक असतात. अवजारे नसेल तर शेती करणे फार कठिण जाते. आपल्याकडे कोणकोणती अवजारे आहेत. यासाठी त्यान नांगर, बळीनांगर, औत आणि तिफन असे पर्याय देण्यात आले होते. नांगर आहे असे म्हणणारे १० (१७.५४%) निवेदक आढळून आले. बळीनांगर

आहे असे सांगणारे १५ (२६.३१%) निवेदक आढळून आले. औत आहे असे सांगणारे २५ (४३.८५%) निवेदक आढळून आले. आणि तिफन आहे असे सांगणारे ०७ (१२.२८%) निवेदक आढळून आले. शेतीसाठी लागणारी सर्वच अवजारे स्वत:कडे जरी नसली तरी ती इतराकडून मिळवावी लागतात, असे निवेदकाकडून मुलाखती दरम्यान समजून आले. अर्थात एकमेकाची मदत शेती अवजारासाठी द्यावी लागते असे सांगणाऱ्या निवेदकांचे प्रमाण जास्त आढळून आले. आपल्याकडे नांगर असेल तर ते दुसऱ्यांना द्यावे लागते व आपल्याला ज्या शेती आवजाराची गरज आहे ते घ्यावी लागते.

तक्ता क्र. ४.७ शेती मशागत संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शेतीची मशागत कशा प्रकारे केली जाते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	बैल	७१	९२.२६%
२	ट्रॅक्टर	०२	०२.७३%

शेतीची मशागत कशा प्रकारे करता याचा मागोवा घेतांना ७१ (९२.२६%) निवेदक बैलाच्या साहय्याने शेती करतांना आढळून आले. ०२ (०२.७३%) निवेदक ट्रॅक्टरच्या मदतीने शेतीची मशागत करतात असे सांगतांना आढळून आले. बंजारा समाजामध्ये आधूनिक तंत्राचा वापर करणारे निवेदक कमी आहेत असे समजून येते.

तक्ता क्र. ४.८ आर्थिक उत्पनासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत ?	वारंवारीता	टक्केवारी
१	शेती	२४	२४%
२	शेतमजुरी	१७	१७%
३	मजुरी	२६	२६%
४	नोकरी	०५	०५%
५	ऊसतोडणी	२८	२८%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्त्रोता बाबतचा मागोवा घेतांना १००

निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला होता की, आपेल आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत आणि या प्रश्नाला शेती, शेतमजुरी, मजुरी, नोकरी व ऊसतोडणी असे पर्याय देण्यात आले होते. शेती हे आमचे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत आहे असे सांगणारे २४ (२४%) निवेदक आढळून आले. शेतमजुरी हे आमचे आर्थिक स्त्रोत आहे असे सांगणारे १७ (१७%) निवेदक आढळून आले. मजुरी हे आमचे आर्थिक स्त्रोत आहेत असे सांगणारे २६ (२६%) निवेदक आहेत. नोकरी हे आर्थिक स्त्रोत आहेत असे सांगणारे ०५ (०५%) निवेदक आढळून आले. आणि ऊसतोडणी हे आमचे आर्थिक स्त्रोत आहेत असे सांगणारे २८ (२८%) निवेदक आढळून आले. उपरोक्त तक्त्याच्या माहितीच्या आधारे असे सांगता येते की, वडवणी तालुक्यातील बंजारा समाजातील निवेदक जास्त प्रमाणात ऊसतोड कामगार असून ऊसतोडणी हे आमच्यश कुटुंबाचे आर्थिक स्त्रोत आहेत असे सांगणाऱ्याचे प्रमाण जास्त असल्याने आढळून आले.

व्यक्ती म्हटली की, सर्व आर्थिक अडचणी त्याच्या समोर असतात. या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी पैसा सर्वात महत्वाचा समजला जातो. त्यासाठी प्रत्येकांना अर्थार्जन करावे लागतात. कुटुंबाची पुर्तता करण्यासाठी वेळप्रसंगी कर्ज देखील काढावे लागतात. बंजारा समाजातील लोकामध्ये कर्ज काढले जातात काय ? कर्ज काढले जात असेल तर ते किती प्रमाणात काढले जातात याचा मागोवा तक्ता क्र. ४.९ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.९ कर्जकाढण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कर्ज काढण्याची गरज वाटते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८५	८५%
२	नाही	१५	१५%

निवेदकाच्या आर्थिक स्थितीची माहिती मिळवतांना कर्ज काढण्याची गरज वाटते काय ? असा प्रश्न विचारुन होय आणि नाही असा पर्याय त्यांच्या समोर देण्यात आलेला होता. कर्ज काढणाऱ्या निवेदकांचा मागोवा घेताना ८५ (८५%) निवेदक कर्ज काढणारे आढळून आले. आणि कर्ज काढण्याची गरज वाटत नाही असे १५ (१५%) निवेदक आढळून आले. बंजारा समाजामध्ये कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले.

बंजारा समाजामध्ये कर्ज काढण्याचे प्रमाण जास्त आहे. हे जरी खरे असले तरी कर्ज काढण्याचे कारण काय आहे. कशासाठी कर्ज काढले जातात याची माहिती तक्ता क्र. ४.१० मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.१० कर्ज काढण्यासंबधीचे कारण

अ.क्र.	कर्ज काढण्याचे कारण काय आहे.	वारंवारीता	टक्केवारी
१	शेतीसाठी	०८	०९.४१%
२	विवाहासाठी	२६	३०.५८%
३	घरबांधणीसाठी	०९	१०.५८%
४	नोकरीसाठी	०५	०५.८८%
५	शिक्षणासाठी	०९	१०.५८%
६	पशुखरेदीसाठी	२८	३२.९४%

दारिद्रय, कमी उत्पन्न, नैसर्गिक आपत्ती अशा काही कारणामुळे कर्ज काढण्याचे प्रमाण बहुंताशी समाजामध्ये दिसून येते. कोणतीच व्यक्ती विनाकारण कर्ज काढत नाही. बंजारा समाजामध्ये कर्ज काढण्याचे कारण काय आहे. याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा संशोधन क्षेत्रातील निवेदकांना कर्ज काढण्याचे कारण काय आहे. यासाठी निवेदकासमोर शेतीसाठी, विवाहासाठी, घरबांधणीसाठी, नोकरीसाठी, शिक्षणासाठी, पशुखरेदीसाठी हे पर्याय ठेवण्यात आले होते. शेतीसाठी कर्ज काढणारे ०८ (०९.४१%) निवेदक आढळून आले. मुला-मुलीच्या विवाहासाठी पैशाची गरज असते तेव्हा अशा वेळी कर्ज काढणारे २६ (३०.५८%) निवेदक आढळून आले. घरबांधणीसाठी कर्ज काढणारे ०९ (१०.५८%) निवेदक आढळून आले. नोकरी हा उत्पन्नाचा कायमचा मार्ग आहे. आणि त्यासाठी कर्ज काढणारे ०५ (०५.८८%) निवेदक आहेत. शिक्षणासाठी कर्ज काढणारे ०९ (१०.५८%) निवेदक आढळून आले. पशुखरेदीसाठी कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण सर्वात जास्त असून त्याची संख्या २८ (३२.९४%) इतकी आहे. सदरील तक्त्याच्या अध्ययानावरुन असे लक्षात येते की, विवाहासाठी आणि पशुखरेदीसाठी कर्ज काढणाऱ्या निवेदकाचे प्रमाण जास्त आहे.

संशोधन क्षेत्रातील निवेदकांनी कोणाकडून कर्ज काढलेले आहेत, कर्ज कसे काढावे, कोणाकडून काढावे यासंबधीची माहिती तक्ता क्र. ४.११ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.११ कर्ज कोणाकडून घेतले जाते यासंबधी वर्गीकरण

अ.क्र.	कर्ज कोणकडून घेतले जातात	वारंवारीता	टक्केवारी
१	बँक	१८	२१.१७%
२	पतपेढी	०३	०३.५२%
३	सोसायटी	२५	२९.४१%
४	मित्र	०५	०५.८८%
५	खाजगी सावकार	३४	४०.००%

बंजारा समाजातील निवेदकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करतांना १०० निवेदका पैकी ८५ (८५%) निवेदक हे कर्ज घेणारे आहेत. परंतु कर्ज कोणाकडून घेतले जातात याचा मागोवा घेतांना बँके कडून कर्ज घेणारे १८ (२१.१७%) निवेदक आहेत. पतपेढी कडून कर्ज काढणारे ०३ (०३.५२%) निवेदक आहेत सोसायटी कडून कर्ज घेणारे २५ (२९.४१%) निवेदक आहेत मित्राकडून कर्ज घेणारे ०५ (०५.८८%) निवेदक आहेत. आणि खाजगी सावकार कडून कर्ज घेणारे ३४ (४०.००%) निवेदक आहेत.

सारांश बंजारा समाजामध्ये कर्ज काढण्याचे प्रमाण जास्त असून खाजगी सावकाराकडून कर्ज घेण्याचे किंवा काढण्याचे प्रमाण जास्त आहे. बंजारा समाजातील कर्जबाजारीपणा बहुकारणी आहे असे दिसून येते.

तक्ता क्र. ४.१२ कर्ज फेडीसंबंधीचे वर्गीकरण

अ.क्र.	घेतलेले कर्ज वेळेवर फेडले जाते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	१९	२२.३५%
२	नाही	६६	७७.६४%

घेतलेले कर्ज वेळेवर फेडले जातात काय ? असा प्रश्न निवेदकांना विचारुन त्याच्या समोर होय किंवा नाही असे पर्याय ठेवण्यात आले होते. घेतलेले कर्ज वेळेवर फेडले जातात असे म्हणणारे १९ (२२.३५%) निवेदक आहेत. परंतु घेतलेले कर्ज काही कारणामुळे वेळेवर फेडता येत नाही असे सांगणारे ६६ (७७.६७%) निवेदक आढळून आले. घेतलेले कजे वेळेवर का फेडता येत नाही, त्याची कारणे कोणकोणती आहेत. याचा मागोवा तक्ता क्र. ४.१३ मध्ये घेण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.१३ कर्ज न फेडण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कर्ज न फेडण्याचे कारण ?	वारंवारीता	टक्केवारी
१	वार्षिक उत्पन्नात घट	२३	३४.८४%
२	निसर्गाचा कोप	१४	२१.२१%
३	कौटुंकिब खर्चात वाढ	२९	४३.९३%

प्रत्येकाना कर्ज काढावे वाटते परंतु ते फेडावेही लागते. फेडतांना कोणकोणत्या अडचणी येतात याचा मागोवा घेतांना निवेदकांना कर्ज कशामुळे फेडले जात नाही याचे कारण काय आहे ? यासाठी निवेदकांना पर्याय देण्यात आलेले होते. ते म्हणजे वार्षिक उत्पन्नातील घट, निसर्गाचा कोप आणि कौटुंबिक खर्चात वाढ. वार्षिक उत्पन्नात घट झाल्यामुळे कर्ज फेड करता येत नाही असे सांगणारे २३ (३४.८४%) निवेदक आढळून आले. निसर्गाच्या कोपामध्ये अनेक बाबीचा उल्लेख करता येतो. पावसाचे प्रमाण कमी, गारपीट, अवकाळी पाऊस ही सर्व नैर्सिक कोपामध्ये येतात. यासर्व कारणामुळे उत्पन्न कमी होते. म्हणून कर्जाची परत फेड वेळेवर करता येत नाही असे सांगणारे १४ (२१.२१%) निवेदक आढळून आले. विवाह, आजारपण, ही सर्व कौटुंबिक खर्च वाढविणारी बाब आहे. असा खर्च वाढला तर कर्जाची परत फेड करता येत नाही असे सांगणारे २९ (४३.९३%) निवेदक आढळून आले. सारांश रुपाने असे सांगता येते की, निवेदकांनी घेतलेले कर्ज वेळेवर न फेडण्यासाठी विविध कारणे जबाबदार असल्याचे दिसून येते.

निवेदकांना बचतीसंबधीचे ज्ञान आहे किंवा नाही याचा मागोवा घेण्यासाठी आपण बचत करता काय ? करत असाल तर बचतीचा प्रकार किंवा स्त्रोत कोणते आहेत. यासंबधीची माहिती तक्ता क्र. ४.१४ मध्ये घेण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.१४ बचती संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कुटुंबाच्या भविष्यासाठी बचत करता काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	९२	९२%
२	नाही	०८	०८%

बंजारा समाजातील लोक बचत करता काय ? या संबधीची माहिती निवेदकाकडून घेतांना कुटुंबाच्या भविष्यासाठी बचत करता काय ? यासंबधीची माहिती जाणून घेतांना त्याच्या समोर होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते. तेव्हा ९२ (९२%) निवेदक होय असे म्हणतांना आढळून आले. व बचत करत नाहीत असे म्हणणारे केवळ ०८ (०८%) निवेदक आढळून आले.

बचत कशी व कोणत्या ठिकाणी करतात याचा मागोवा तक्ता क्र. ४.१४ मध्ये घेण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. ४.१५ बचतीच्या ठिकाणा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणत्या ठिकाणी बचत करता ?	वारंवरीता	टक्केवारी
१	बँका	४८	५२.१७%
२	पतपेढी	१३	१४.१३%
३	पोस्ट	१६	१७.३९%
४	एल.आय.सी.	१५	१६.३०%

काटकसर करुन बचत करणे हा प्रत्येक व्यक्तीचा धर्म आहे. कारण काटकसर ही वृधपणाची आरामाची खुर्ची आहे. बंजारा समाजातील निवेदक बचत करतात काय ? बचत करत असतील तर कुठे करतात याचा मागोवा घेतांना जी माहिती मिळालेली आहे त्याचे स्पष्टीकरण उपरोक्त तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे. बँकेमध्ये बचत करणारे ४८ (५२.१७%) निवेदक आढळून आले. पतपेढीमध्ये बचत करणारे १३ (१४.१३%) निवेदक आढळून आले. पोस्टामध्ये बचत करणारे १६ (१७.३९%) निवेदक आढळून आले. एल.आय.सी. मध्ये बचत करणारे १५ (१६.३०%) निवेदक आढळून आले. बँकामध्ये बचत करणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक असून त्यापाटोपाठ एल.आय.सी. मध्ये बचत करणारे निवेदकांचे प्रमाण दुसऱ्या क्रमांकावर आहे. यावरुन बंजारा समाजामध्ये बचत करण्याची माहिती सर्व स्तरावरील निवेदकांना झालेली आहे असे म्हणता येईल.

सामाजिक परिस्थिती

पृथ्वी तलावर असणारा कोणताही समाज असो. त्या समाजातील लोकांना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक नियमाचे पालन करावे लागतात. सामाजिक परिस्थितीमध्ये धार्मिक, क्रिया, प्रथा, रुढी, परंपरा श्रध्दा व अंधश्रध्दा, नवस प्रकार, देवदेवता, भुत बाधा, करणी, भानामती, उपवास इत्यादी समावेश केला जातो. प्रत्येक व्यक्तीने आपल्या धर्माप्रमाणे, संस्कृतीप्रमाणे वर्तन करावे असा अलिखीत नियम आहे. अर्थात व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य धर्म पार पाडते. नियंत्रणाचे प्रामुख्याने दोन प्रकार पाडले जातात. ते म्हणजे औपाचारीक आणि अनौपचारीक. नियंत्रण करण्याचे काम प्राचीन काळापासून होत आलेले आहे. खरे पाहता व्यक्ती आणि समाज यांचे जीवन नियंत्रण ठेवणे, अनैतिकतेपासून त्यांना दूर ठेवणे असे धर्माचे प्रयोजन आहे. विविध समूहाचे धार्मिक जीवनाच्या मुळाशी एक मुलगामी संकल्पना आहे व ती म्हणजे पावित्र्य. ही पावित्र्याची संकल्पना विविध मूर्त व अमूर्त स्वरुपात प्रकट होत असते.

बंजारा समाजाच्या समाजिक परिस्थितीचा आढावा घेतांना असे आढळून आले की, बंजारा समाजातील लोक देवदेवतांना भजतात. देवावर श्रध्दा, अंधश्रधेवर विश्वास ठेवणारे लोक आढळतात. बंजारा समाजातील समाजिक परिस्थिती कशी आहे. याचा मागोवा या ठिकाणी घेण्यात आलेला आहे. बंजारा समाजातील निवेदकांचा देवावर विश्वास आहे का ? याचा मागोवा तक्ता क्र. ४.१६ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.१६ देवासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	देवावर आपला विश्वास आहे का ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	९४	९४%
२	नाही	०६	०६%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करतांना निवेदकांचा देवावर विश्वास आहे काय ? हे जाणून घेण्यासाठी त्याच्या समोर दोन पर्याय देण्यात आले होते ते म्हणजे होय किंवा नाही. ९४ (९४%) निवेदक हे देवावर विश्वास ठेवणारे आढळून आले. फक्त ०६ (०६%) निवेदक देवावर आमचा विश्वास नाही असे सांगणारे आढळून आले. यावरुन असे स्पष्ट होते की, बंजारा समाजात देवावर विश्वास असणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. मुलाखत समयी देवावर विश्वास नाही असे सांगणारे हे पद्वी व पदव्युतर स्तरावरील निवेदक होते. अर्थात पद्वी व पदव्युतर स्तरामधील निवेदक नास्तीक असल्याचे आढळून आले.

बंजारा समाजातील निवेदक कोणकोणत्या देवला मानतात. त्याचे प्रमाण काय आहेत याची माहिती तक्ता क्र. ४.१७ मध्ये सांगण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.१७ देवाला मानणाऱ्याचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणत्या देवाला मानतात	वारंवारीता	टक्केवारी
१	सेवालाल महाराज	२६	२७.६५%
२	जेतालाल महाराज	१३	१३.८२%
३	सामकी याडी	१५	१५.९५%
४	सामतदादा	०८	०८.५१%
५	तुळजाभवानी	१७	१८.०८%
६	सतीमाता	१०	१०.६३%
७	कंकाळ देवी	०५	०५.३१%

बंजारा समाजातील निवेद कोणत्या देवाला मानतात यासंबधी माहिती ही वरील तक्त्यात दर्शविली आहे. सेवालाल महाराजांना मानणारे २६ (२७.५६%) निवेदक आहेत. जेतालाल महाराजांन मानणारे १३ (१३.८२%) निवेदक आहेत. सामकी याडीला मानणारे १५ (१५.९५%) निवेदक आहेत. सामतदादाला मानणारे ०८ (०८.५१%) निवेदक आहेत. तुळजा भवानीला मानणारे १७ (१८.०८%) निवेदक आहेत. सतीमातेला मानणारे १० (१०.६३%) निवेदक आहेत. कंकाळ देवी यांना मानणारे ०५ (०५.३१%) निवेदक आहेत. वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या सर्वच देवदेवतांना बंजारा समाजात मानले जातात. परंतु बंजारा समाजाचे महान संत श्री. सेवालाल महाराज यांना मानणऱ्यांचे प्रमाण सर्व देवते पेक्षा जास्त असल्याचे दिसून यते. बंजारा समाजातील निवेदकाचा विश्वास देवावर श्रध्दा असून देवदेवतांचा कोप देखील होतो. या संबधीची माहिती तक्ता क्र. ४.१८ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.१८ देवदेवतांच्या कोपासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	देवदेवतांचा कोप होते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८४	८४%
२	नाही	१६	१६%

बंजारा समाजातील निवेदक विविध प्रसंगी देवदेवतांचा कोप होतो असे मानतात. संशोधन काळादरम्यान मुलाखत घेतांना १०० निवेदकांना प्रश्न विचारण्यात आला होता तो म्हणजे देवदेवतांचा कोप होतो काय ? यासाठी होय आणि नाही असे पर्याय देण्यात आलेले होते. होय म्हणणारे ८४ (८४%) निवेदक आहेत आणि नाही म्हणणारे १६ (१६%) निवेदक आढळून आले बंजारा समाजात देवदेवतांच्या कोपाची भिती बाळगणारे निवेदक ८४% आहेत असे दिसून येते.

दैवीकोपामुळे कोणते नुकसान होते यासंबधीची माहिती तक्ता क्र. ४.१९ मध्ये देण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. ४.१९ दैवीकोपामुळे होणाऱ्या नुकसानीचे वर्गीकरण

अ.क्र.	देवी कोपामुळे कोणते नुकसान होते	वारंवारीता	टक्केवारी
१	शारीरिक	४२	५०.००%
२	मानसिक	२८	३३.३३%
३	आर्थिक	१४	१६.६६%

दैवीकोपामुळे कोणते नुकसारन होते यासंबधीचा मागोवा घेतांना प्राप्त झालेली माहिती सदरील तक्त्यामध्ये दिसून येते. दैवीकोपामुळे शारिरीक नुकसान होते असे सांगणारे ४२ (५०.००%) निवेदक आढळून आले. मानसिक नुकसान होते असे सांगणारे २८ (३३.३३%) निवेदक आढळून आले. आर्थिक नुकसान होते असे सांगणारे १४ (१६.६६%) निवेदक आढळून आले. शारीरिक नुकसानीमध्ये हात-पाय वाकडे होणे, पोटात दु:खने असे कारण सांगताना आढळून आले. मानसिक नुकसानी मध्ये वेड लागणे, डोकेदुखणे, चकरायेणे इ. गोष्टीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. आर्थिक नुकसानी मध्ये व्यवसायात, शेतीउत्पन्नात, व्यापारात घट होते. आर्थिक नुकसान होऊ शकते असे निवेदकाकडून ऐकण्यात आले.

तक्ता क्र. ४.२० पशुबळी संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	देवदेवतांना पशुबळी दिला जातो काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८४	८४%
२	नही	१६	१६%

देवदेवतांना पशुबळी दिला जातो काय याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा निवेदकांकडून मिळणाऱ्या प्रतिक्रिया अशा होत्या की, देवदेवतांना पशु बळी दिला पाहिजे असे सांगणारे ८४ (८४%) निवेदक आढळून आले. देवदेवता पशुबळी देवूनये असे सांगणारे १६ (१६%) निवेदक आढळून आले. बंजारा समाजामध्ये देवदेवतांना खुष करण्यासाठी पशूबळी देण्याची प्रथा सर्वाधिक आणि पूर्वीपासून चालत आलेली असावी असे म्हणावयास काहीच हारकत नाही.

देवदेवतांना खुष करण्यासाठी कोणकोणत्या पशूचा बळी दिला जातो याची माहिती तक्ता क्र. ४.२१ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली.

तक्ता क्र. ४.२१ पशूबळीच्या प्रकारासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणत्या पशुचा बळी दिला जातो. ?	वारंवारीता	टक्केवारी
१	शेळी	१२	१४.२८%
२	मेढी	११	१३.०९%
३	रेडा	०६	७.१४%
४	कोंबडा	१८	२१.४२%
५	बोकूड	३६	४२.८५%
६	इतर	०१	०१.१९%

निवेदकाच्या मुलाखती घेतांना आपण देवदेवतांना पशु बळी देतात काय ? देत असाल तर कोणकोणत्या पशूचा बळी दिला जातो. यासंबधी माहिती सदरील तक्त्यामध्ये सांगीतलेली आहे. देवदेवतांना शेळीचा बळी देणारे १२ (१४.२३%) निवेदक आढळून आले. मेंढीचा बळी देणारे ११ (१३.०९%) निवेदक आहेत. रेड्याचा बळी देणारे ०६ (०७.१४%) निवेदक आहेत. कोबड्यांचे बळी देणारे १८ (२१.४२%) निवेदक आहेत.

बोकडांचा बळी देणारे ३६ (४२.८५%) निवेदक आहेत. नरबळी देण्याची प्रथा पूर्वी बंजारा समाजामध्ये होती असे मुलाखती घेतांना निवेदकाकडून समजून आले. अशी माहिती सांगणारे ०१ (०१.१९%) निवेदक आढळून आहेत. आजच्या परिस्थिती बंजारा समाजामध्ये नरबळीची प्रथा नाही असे दिसून आले. थोडक्यात बंजारा समाजात पशूबळीची प्रथा आहे हे मात्र कोणीही नाकारु शकत नाही.

तक्ता क्र. ४.२२ नवस प्रथेसंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	देवाला नवस करण्याची प्रथा आहे का ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७२	७२%
२	नाही	२८	२८%

तक्ता क्र. ४.२२ मधील माहिती जाणून घेण्यासाठी १०० निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला की, देवाला नवस करण्याची प्रथा आहे काय ? यासाठी त्यांच्यासमोर होय किंवा नाही असे पर्याय ठेवण्यात आले होते. होय असे म्हणणारे ७२ (७२%) निवेदक आढळून आले. आणि नाही असे म्हणणारे २८ (२८%) निवेदक आढळून आले. बंजारा समाजामध्ये नवस का केले जातात ? याचे कारण काय आहे. यासंबधीची माहिती खालील तक्त्यामधे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.२३ नवसाच्या कारणासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	नवस करण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	मुल-बाळ होण्यासाठी	३२	४४.४४%
२	संपत्ती मिळण्यासाठी	१२	१६.६६%
३	नोकरीसाठी	०५	०६.९४%
४	व्यवसायासाठी	०९	१२.०५%
५	विवाह / लग्न होण्यासाठी	१४	१९.४४%

नवस करण्याच्या कारणाचा शोध घेताला असता निवेदकाकडून त्याची विविध कारणे सांगण्यात आली. ती म्हणजे मुल-बाळ हावेत यासाठी नवसकरणारे ३२ (४४.४४%) निवेदक आढळून आले. संपत्ती

मिळवण्यासाठी नवस करणारे १२ (१६.६६%) निवेदक आढळून आले. नोकरीसाठी नवस करणारे ०५ (०६.९४%) निवेदक आढळून आले. व्यवसायासाठी नवस करणारे ०९ (१२.०५%) निवेदक आढळून आले. विवाह किंवा लग्न होण्यासाठी नवस करणारे १४ (१९.४४%) निवेदक आढळून आले. सदरील तक्त्याच्या अध्ययनावरुन असे सांगता येते की, बंजारा समाजात विविध कारणासाठी नवस करण्याचे प्रमाण दिसून येते.

तक्ता क्र. ४.२४ उपवासासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	उपवास करता काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८९	८९%
२	नाही	११	११%

बंजारा समाजातील निवेदकांची उपवासासंबधी माहिती जाणून घेतांना उपवास करणारे ८९ (८९%) निवेदक आढळून आले तर उपवास न करणारे ११ (११%) निवेदक आढळून आले. उपवास करणाऱ्याचे प्रमाण बंजारा समाजात जास्त असल्याचे दिसून येते. उपवास करण्याचे कारण काय आहे. यासंबधीची माहिती तक्ता क्र. ४.२५ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.२५ उपवासाच्या कारणासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	उपवास करण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	श्रध्दा	४४	४९.४३%
२	परंपरा	२०	२२.४७%
३	वैज्ञानीक कारण	१२	१३.४८%
४	लोक सांगतात	१३	१४.६०%

संशोधन कार्य क्षेत्रातील निवेदकांची उपवास करण्याची माहिती जाणून घेतांना उपवास करण्याचे कारण काय आहे. यासाठी त्यांच्या समोर श्रध्दा, पंरपरा, वैज्ञानीक कारण आणि लोक सांगतात असे पर्याय देण्यात आले होते. तेव्हा त्यांन्या प्रतिउत्तर म्हणून निवेदकाकडून मिळालेली माहिती अशी की, श्रध्दा म्हणून उपवास करणारे ४४ (४९.४३%) निवेदक आढळून आले. परंपरा म्हणून उपवास केला जातो असे सांगणारे

२० (२२.४७%) निवेदक आहेत. वैज्ञानीक कारणा मुळे उपवास केला जातो असे सांगणारे १२ (१३.४८%) निवेदक आहेत. केवळ लोक सांगतात म्हणून उपवास करणारे १३ (१४.६०%) निवेदक आहेत. सारांश रुपाने या तक्त्याच्या माहितीवरुन असे सांगता येते की, बंजारा समाजामध्ये श्रध्दा म्हणून उपवास करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे असे दिसून येते.

बंजारा समाजातील निवेदकांचा जसा देवदेवतावर विश्वास आहे. त्याच प्रमाणे जादुवर विश्वास आहे का ? या संबधीची माहिती तक्ता क्र. ४.२६ मध्ये सांगण्यात आलेली आहे किंवा याचे स्पष्टीकरण खालील तक्यामध्ये सांगण्यात आले आहे.

तक्ता क्र. ४.२६ जादुसंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	जादुवर आपला विश्वास आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८२	८२%
२	नाही	१८	१८%

पुर्वीपासूनही बंजारा समाज डोंगर, दऱ्याखोऱ्यात राहणारा समाज म्हणून ओळखला जातो. बंजारा समाजाचे विश्व म्हणजे जादुटोणा ऐवढेच आहे. जी एखादी गोष्ट इश्वरामुळे साध्य होत नाही ती गोष्ट मात्र जादुमुळे व्यक्तीस साध्य होऊ शकते अशी या समाजाची समजूत आहे. बंजारा समाजाचा अभ्यास 'जादुला' टाळून होऊ शकत नाही. प्रस्तुत तक्ता क्र. ४.२६ याच्या पाहणीवरुन असे लक्षात येते की, बंजारा समाजात जादुवर विश्वास ढेवणारे ८२ (८२%) निवेदक आहेत. फक्त १८ (१८%) निवेदकांचा मात्र जादुवर विश्वास नाही असे दिसून येते.

तक्ता क्र. ४.२७ जादुमुळे होणाऱ्या नुकसानीचे वर्गीकरण

अ.क्र.	जादुमुळे होणारे नुकसान	वारंवारीता	टक्केवारी
१	शारीरिक	४८	५८.५३%
२	मानसिक	२७	३२.९२%
३	आर्थिक	०७	०८.५३%

बंजारा समाजाच्या अध्ययन काळादरम्यान जादुमुळे कोणते नुकसान होते, याचा मागोवा घेतांना जादुमुळे शारीरिक नुकसान होते असे सांगणारे ४८ (५८.५३%) निवेदक आढळून आले. शारीरिक आजारामध्ये हातपाय लुळे होणे, अंगावर गाढी येणे, इत्यादी प्रकारचे आजार जादुमुळे होतात असे त्यांना वाटते. यामध्ये सर्वाधिक प्रमाण निरक्षर निवेदकाचे आहे. जादुमुळे मानसिक आजार होतात असे मानणारे २७ (३२.९२%) निवेदक आहेत. मानसिक आजारामध्ये अंगात आळस भरणे, कामात लक्ष न देणे, विसरभोळे पणा वाढणे, वेड लागणे इत्यादी प्रकारची बाधा होऊ शकते असे निवेदक सांगतांना आढळून आले. जादुमुळे आर्थिक नुकसान होते असेही म्हणणारे ०७ (०८.५३%) निवेदक आढळून आले. आर्थिक नुकसानीमध्ये घरात आग लागणे, संपतीचे वाटोळे होणे, शेतात पिक न येणे, चोरी होणे, अशा प्राकरचा त्रास होऊ शकतो. असा समज बंजारा समाजाचा आहे.

तक्ता क्र. ४.२८ जादुकरणाऱ्या व्यक्तीसंबधीची वर्गीकरण

अ.क्र.	जादुकरणाऱ्या व्यक्ती बदल भिती वाटते का ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८२	८२%
२	नही	१८	१८%

जादु करणाऱ्या व्यक्ती बदल भिती वाटते का ? असा प्रश्न विचारुन याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ८२ (८२%) निवेदकांनी भिती वाटते असे सांगताना आढळून आले. परंतु केवळ १८ (१८%) निवेदकांनी मात्र जादुकरणाऱ्या व्यक्तीबदल कसलीच भिती वाटत नाही असे सांगीतले. थोडक्यात बंजारा समाजात जादुवर विश्वास ठेवणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे असे दिसून येते.

बंजारा समाजात जादुटोण्यावर जास्त विश्वास आहे तसाच तो भुत खेतावर आहे किंवा नाही याचा मागोवा तक्ता क्र. ४.२९ मध्ये घेण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ४.२९ भूतबाधा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	भूतबाधावर आपला विश्वास आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७३	७३%
२	नाही	२७	२७%

समाज हा कोणताही असो प्रत्येक समाजामध्ये भुतबाधा, करणी, चेटुक, भानामती यावर कमी अधिक प्रमाणात विश्वास असतो. परंतु बंजारा समाजाचे विश्व म्हणजे भुतबाधा होय. संशोधन काळा दरम्यान निवेदकांची भूतबाधा संबधीची भावना कशी आहे याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा भूतबाधावर विश्वास ठेवणारे ७३ (७३%) निवेदक आढळून आले. याचे कारण लक्षात घेतले असता असे दिसून आले की, जो माणूस पुण्यवान असतो तो मात्र भुत होत नाही अशी चर्चा मुलाखत घेतांना निवेदकाकडून स्पष्ट करण्यात आली. उपरोक्त तक्त्यामध्ये २७ (२७%) निवेदकांनी भुतबाधा संबधी आपले मत व्यक्त करतांना असे सांगतले की, भूतबाधा ही केवळ एक प्रकारची भिती आहे. यामध्ये नोकरीकरणारे निवेदक आणि पदवी आणि पदव्युत्तर निवेदकांचा समावेश आहे.

सारांश रुपाने विचार केल्यास निरक्षर लोकामध्ये भूतबाधाचे प्रमाण जास्त असते यास बंजारा समाज देखील अपवाद मानता येणार नाही.

तक्ता क्र. ४.३० आजारी व्यक्तीच्या उपचारासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आजारपणात कोणाकडे उपचार घेतात	वारंवारीता	टक्केवारी
१	डॉक्टर	४८	४८%
२	मांत्रीक	२०	२०%
३	भगत	१५	१५%
४	जादुगर	०५	०५%
५	घरी	१२	१२%

प्रस्तुत तक्ता क्र. ४.३० मध्ये दर्शविल्या प्रमाणे निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला की, आजारी पडल्यावर उपचारासाठी कोणाकडे घेऊन जातात ? ४८ (४८%) निवेदक उपचार करुन घेण्यासाठी डॉक्टर कडे जातात. २० (२०%) निवेदक उपचारासाठी मांत्रीकाकडे जातात. १५ (१५%) निवेदक भगताकडे उपचार घेणारे आहेत. ०५ (०५%) निवेदक हे जादुगार / जादुकरण्याऱ्या व्यक्तीकडे उपचारासाठी जातात. उपचारासाठी कोठेही जात नाही मात्र सर्वसाधारण आजार असला की, उपचार घरीच केला जातो असे सांगणारे १२ (१२%) निवेदक आहेत. उपरोक्त तक्त्याच्या माहितीवरुन असे लक्षात येते की, ४८% निवेदकामध्ये डॉक्टराकडून उपचार करुन घेण्याची जागृती निर्माण झालेली असली तरीही आजच्या परिस्थितीमध्ये देखील (२०+१५+०५+१२) ५२% निवेदक मात्र आजही पारंपारिक पध्दतीनेच उपचार घेतांना दिसून येतात. म्हणजेच

बंजारा समाजात आजही उपचारा संबधी जेवढी जनजागृती व्हायला पाहीजे ती मात्र झालेली दिसून येत नाही.

तक्ता क्र. ४.३१ सण-उत्सव संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आपला आवडता सण कोणता आहे	वारंवारीता	टक्केवारी
१	होळी	४३	४३%
२	दिवाळी	१५	१५%
३	दसरा	१०	१०%
४	नागपंचमी	०९	०९%
५	गोकुळ आष्टमी	१५	१५%
६	मकर संक्राती	०५	०५%
७	इतर	०३	०३%

प्रत्येक समाजाची सण-उत्सवाची पध्दत ही वेगवेगळी आहे. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही. होळी हा सण जसजसा जवळ येईल तस तसे बंजारा समाजातील लोकांच्या मनात एक प्रकारचा आनंद असतो. मुळातच नाचगाण्यात मगर मस्त जीवन जगणारा समाज म्हणजे बंजारा समाज होय. संशोधन काळा दरम्यान निवेदकाच्या मुलाखती घेतांना उत्सवा संबधी आवड कशी आहे याचा जेव्हा मागोवा घेताला त्यावेळी आपला आवडता सण कोणत आहे असा प्रश्न विचारुन त्याची जाणीव करुन घेतली. होळी हा सण सर्वात जास्त आवडतो असे म्हणणारे ४३ (४३%) निवेदक आढळून आले. १५ (१५%) निवेदक दिवाळी सण आवडतो असे म्हणतांना आढळून आले. १० (१०%) निवेदक दसरा सण आवडतो असे म्हणतांना आढळून आले. ०९ (०९%) निवेदक नागपंचमी सण आवडतो असे म्हणतांना आढळून आले. १५ (१५%) निवेदक गोकुळ आष्टमी हा सण आवडतो असे सांगतांना आढळून आले. ०५ (०५%) निवेदक मकर संक्रात हा सण आवडतो असे सांगताना आढळून आले. गुडीपाडवा, रामनवमी, जयंती इत्यादी सण आवडणारे ०३ (०३%) निवेदक आढळून आले याचा समावेश इतर सणामध्ये करण्यात आलेला आहे.

बंजारा समाजात जेवढे काही सण-उत्सव आहेत त्यामध्ये सर्वात जास्त अवडणारा सण म्हणजे फक्त ‘होळी’ हाच दिसून येतो.

तक्ता क्र. ४.३२ सांस्कृतीक कार्यक्रमासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	सांस्कृतिक कार्यक्रम कोणकोणते होतात	वारंवारीता	टक्केवारी
१	बंजारा भजन	७३	७३%
२	भारुड	०२	०२%
३	किर्तन	०१	०१%
४	गोंधळ	२४	२४%

पुर्वीपासून पारंपारिक जीवन जगणाऱ्या बंजारा समाजातील निवेदकाला असा प्रश्न विचारण्यात आला की, आपल्या समाजात कोणकोणते सांस्कृतिक कार्यक्रम होतात. तेव्हा ७३ (७३%) निवेदक बंजारा भजन होतात असे म्हणतांना आढळून आले. बंजारा समाजात 'बंजारा भजन' हे सांस्कृतिक कार्यक्रम प्रत्येक तांड्यात रोज रात्री होतांना दिसून येतात. बंजरा समाजात 'गोंधळ' नावाचा सांस्कृतिक कार्यक्रम फक्त तुळजाभवानीच्या नावाने आयोजित केला जातो असे सांगणारे २४ (२४%) निवेदक आढळून आले. भारुड हा सांस्कृतिक कार्यक्रम होतो असे सांगणारे ०२ (०२%) आढळून आले आणि किर्तन होतात असे सांगणारे ०१ (०१%) निवेदक आहेत.

थोडक्यात बंजारा समाजात पारंपारीक सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्याची प्रथा जास्त प्रमाणात आहे असे दिसून येते.

तक्ता क्र. ४.३३ आधुनिक सांस्कृतिक कार्यक्रमा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	नाटक / सिनेमा पाहता काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	१३	१३%
२	नाही	८७	८७%

बंजारा समाजातील निवेदकांच्या आवडी-निवडी संबधी प्रश्न विचारुन माहिती जाणून घेताना त्यांना असा प्रश्न विचाराण्यात आला होता की, आपण नाटक, सिनेमा, पाहता काय व या प्रश्नासाठी दोन पर्याय देण्यात आले होते म्हणजे होय किंवा नाही. बंजारा समाजात नाटक, सिनेमा न पाहणारे ८७ (८७%) निवेदक आढळून आले. १३ (१३%) निवेदक नाटक, सिनेमा पाहणारे आहेत असे दिसून आले नाटक, सिनेमा कोणकोण पाहतात यासंबधीची माहिती तक्ता क्र. ४.३४ मध्ये सांगण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ४.३४ नाटक, सिनेमा संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	नाटक, सिनेमा कोणकोण पाहता ?	वारंवारीता	टक्केवारी
१	एकटे	०८	६१.५३%
२	कुटुंबातील सदस्या सह	०५	३८.४६%

प्रस्तुत तक्त्यामध्ये निवेदकांची नाटक, सिनेमा या बाबतची आवड पाहिली असता. ०८ (६१.५३%) निवेदक हे स्वत:च्या छंदाची पूर्तता एक एकटे करतांना दिसून येतात. नाटक, सिनेमा केवळ एक-एकट्याने पाहणे अयोग्य वाटते त्यासाठी कटुंबातील सदस्या बरोबर आपण हे पाहिले पाहिजे असे सांगणारे ०५ (३८.४६%) निवेदक आढळून आले. थोडक्यात बंजारा समाजामध्ये आधुनिक सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेण्याची प्रथा अतिशय कमी प्रमाणात आहे असे दिसून येते. आधुनिकते पेक्षा पारंपारिक कार्यक्रमास प्राधान्य देणारा समाज म्हणजे बंजारा समाज होय.

प्रकरण ०५
शिक्षण आणि राजकिय सहभाग

प्रस्तावाना :-

समाजरचनेतील एक पायाभूत सामाजिक संस्था म्हणून शिक्षण संस्थेचा विचार केला जातो. मानव्दारे आदिम काळापासून ज्ञानसंचेयाची शिक्षण प्रक्रिया सुरु झालेली आहे. समाज विकासाच्या सर्व आवस्थामध्ये शिक्षणप्रक्रियेचे आस्तित्व दिसून येते. सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे जुनी पिढी नवीन पिढीला काही ज्ञान व सामाजिक वारसा हस्तांतरीत करीत असते तर काही ज्ञान व्यक्ती अनुभवातून स्वत: अर्जित करीत असतो. मानवाच्या प्रत्येक पिढीच्या शिक्षण प्रक्रियेच्या साहाय्याने आणि हस्तांतरणाद्वारेच ज्ञानाची वृध्दी होत आली आहे. समाजाच्या जडण-घडणीमध्ये मूल्ये, प्रामणके, आदर्श या घटकांना अतिशय महत्व आहे. हे सर्व घटक शिक्षणाच्या माध्यमाद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असतात. ज्ञानाची ही परंपरागत श्रृंखला म्हणजेच शिक्षण होय. शिक्षणामुळेच मानवाने आपली मानसिक, अध्यात्मिक आणि सामाजिक प्रगती केली आहे. शिणानेच मानवाला प्राणीस्तरावरुन वरती आणले आणि एक श्रेष्ठ सांस्कृतिक प्राणी बनविले आहे. चीनी संत कनफ्युशस म्हणतात की, ''अज्ञानता एक अशा रात्रीच्या सरखी आहे, ज्यात नाही चंद्र ना तारे आहेत.'' शिक्षणाचा उदेश ज्ञानरुपी प्रकाशाला प्राप्त करुन अज्ञानरुपी अंधाऱ्या रात्रीच्या अंधाराला दूर करणे हे आहे. शिक्षणाच्या अभावतच ज्ञान आणि विज्ञान दोन्हीचा अभाव आहे. ज्ञान आणि सांस्कृतिक वारसा यांच्या हस्तांतरणाचे कार्य शैक्षणिक संस्थाद्वारे केले जाते.

शिक्षण हा शब्द 'शिक्ष' या संस्कृत धातूपासून बनला असून त्याचा अर्थ शिकणे अथवा ज्ञान मिळविणे असा होतो. ढोबळ अर्थाने शिक्षणाचा तात्पर्य पुस्तकी ज्ञान आणि लिहिता वाचता येणे असा घेतला जातो. दैनंदिन व्यवहारात शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे यासारख्या औपचारिक संस्थामधून जे ज्ञान मिळते ते शिक्षण होय असे मानले जाते. परंतु शिक्षणाचा हा अर्थ फारच संकुचित आहे. व्यापक दृष्टीने शिक्षणाचा अर्थ सर्व प्रकारचे ज्ञान संग्रह जसे : मानवाच्या सर्वांगीण विकासाशी घेतला जातो. व्यक्तीच्या अंगी ज्या उपजत सुप्त प्रवृत्ती आणि कार्यशक्ती असतात त्या शिक्षणाने जागृत करुन त्यात योग्य तो विकास घडवून त्याला जबाबदार नागरीक बनविणे हा शिक्षणाचा सर्वमान्य अर्थ आहे. काही शिक्षण तज्ञ व त्यांचे ण्यारव्यासाठी शिक्षण विषयक विचार पुढील प्रमाणे आहेत.

१) स्वामी विवेकानंद :- यांच्या मते ''केवळ डोक्यात माहिती भणे म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाने व अध्यापनाने

शीलसंपन्न नवीन समाज निर्माण झाला पाहिजे.'' मूल स्वंयप्रयत्नाने शिकते आणि आपला विकास करुन घेते. शिक्षकाने मार्गदर्शन करुन योग्य असे वातावरण त्यांच्या विकासाठी तयार केले पाहिजे. शिक्षणाने आत्मविश्वास जागृत केला पाहिजे. शिक्षणाने विश्वबंधुत्वाची भावना निर्माण केली पाहिजे.

२) म. फुले :- यांच्या मते, ''समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार म्हाजे शिक्षण होय.'' शुद्रादिशुद्रांची जागृती शिक्षणाशिवाय होणार नाही. दलितांचा उदार करावयाचा असेल तर शिक्षणाचा प्रसार करावाच लागेल. शिक्षण नसेल तर बुध्दीचा विकास होणार नाही. प्रगती शिवाय धन मिळणार नाही आणि धन नसल्यास माणूस दलित बनून खचून जाईल. त्यासाठी त्यांनी सांगीतलेले विधान ''विद्येविना मती गेली, मतिविना निती गेली, नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' हे विचार प्रवण करणारे आहेत.

३) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन :- यांच्या मते, ''लोकशाहीनिष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे किंवा त्यांना एखाद्या व्यवसायाबाबत तरबेज करणे नव्हे तर त्यापेक्षा अधिक काही आहे ते मनाचे औदार्य, मनाचा मोठेपणा, मानवप्राण्याविषयी आदर व एकसंघ राहण्याचे कौशल्य होय. त्यामुळे मानवी हृदयाला सौदर्यप्राप्त झाले पाहिजे.''

वरील तत्त्ववेत्याच्या विचारातून शिक्षणाची विविध रुपे स्पष्ट झाली आहे. त्यामुळे शिक्षण ही अशी संस्था आहे की, ज्याचा उदेश बालकाचे मानसिक, सामाजिक आणि भौतिक गुणांचा विकास करणे हे आहे की, ज्यामुळे तो संपूर्ण पर्यावरणाशी अनुकूलन करु शकेल. शिक्षण मानवाच्या आंतरीक व बाह्य गुंणाचा विकास करते.

शिक्षण हे सामाजिक व आर्थिक बदल आणि विकास घडवून आणणारे प्रभावी साधन मानले जाते. व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, अध्यात्मीक, वैयक्तीक त्याचबरोबर देशाच्या संपूर्ण विकासासठी त्याच्या आवश्यकता आहे. चारित्र संबर्धन आणि पात्रतेच्या माध्यमातून शिक्षण हे व्यक्तीला त्याच्या परिपूर्णतेच्या जवळ घेऊन जाते. शिक्षण हे कनिष्ठ जाती पर्यंत पोहचले असले तरी त्याचा फायदा त्यांना घेतायेतोच असे नाही. तर मिळणाऱ्या शिक्षणावर आज आर्थिक परिस्थिती अवलंबून आहे. तेव्हा उत्तम शिक्षण, चांगली नोकरी, उत्तम आर्थिक स्थिती शिक्षणामूळे जशी आर्थिक स्थिती सुधारते तशीच आर्थिक सुबता शिक्षणाला ही हातभार लावते. ज्या समाजाने हे शिक्षण मिळविले तो समाज आर्थिकदृष्ट्या संपन्न झाला. शिक्षणापासून जे वंचित राहिले त्यांची आर्थिक परिस्थिती दुर्बलच राहिलेली आहे. आपल्या आर्थिक दु:स्थितीची कारणे आपल्या मागासले पणामागील प्रमुख कारण आहे.

बंजारा समाजातील शिक्षणाविषयी जागृकता प्रमाण हे जाणून घेतांना या सर्व बाबीचा विचार केलेला आहे. बंजारा समाजाचे शिक्षणाचे प्रमाण जाणून घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. थोडक्यात सदरील प्रकरणात शैक्षणिक प्रश्नांचा उहापोह करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ५.१ मुला-मुलीच्या शिक्षणासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आपल्या मुला मुलीने शिकावे असे वाटते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८७	८७%
२	नाही	१३	१३%

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून तिची सुरुवात ही वयाच्या पाचव्या वर्षापासून सुरु होते. जीवनाच्या अंताबरोबर शिक्षण प्रक्रियेचाही अंत होतो असे मत प्लेटो यांनी केलेले आहे. बंजारा समाजाची शैक्षणिक स्थिती जाणून घेणे हा उदेश होता. निवेदकाच्या मनातील शिक्षणाचा हेतू जाणून घेतांना निवेदकांना असा प्रश्न विचारला की, आपल्या मुला-मुलीने शिक्षण घ्यावे असे वाटते काय ? या प्रश्नासाठी निवेदकासमोर होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आलेले होते. या पर्यायाला मिळालेला प्रतिसाद असा आहे की, १०० निवेदका पैकी ८७ (८७%) निवेदक शिक्षण घेतले पाहिजे असे सांगताना आढळून आले ; तर १३ (१३%) निवेदक आपल्या मुला-मुलीने शिकू नये असे सांगतांना आढळून आले. म्हणजेच बंजारा समाजात शिक्षणाची जानीव जागृती झालेली दिसून येते.

तक्ता क्र. ५.२ किती शिक्षण घेतले पाहिजे यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुला-मुलीने कुठपर्यंत शिकावे असे वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	प्राथमिक	०८	०९.१५%
२	माध्यमिक	१०	११.४९%
३	उच्चमाध्यमिक	२४	२७.५८%
४	पदवी	३६	४१.३७%
५	पदव्युतर	०९	१०.३४%

निवेदकाच्या मुलाखती घेतांना आपल्या मुला-मुलीने कुठपर्यंत शिक्षण घ्यावे असे वाटते ? आणि या प्रश्नाला प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, पदवी आणि पदव्युतर असे पर्याय देण्यात आलेले होते. याप्रसंगी आपल्या मुला-मुलीने फक्त प्राथमिक शिक्षण घेतले पाहिजेत असे म्हणणारे ०८ (०९.१५%) निवेदक आहेत. माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतले पाहिजे असे म्हणणारे १० (११.४९%) निवेदक आहेत. उच्चमाध्यमिक पर्यत शिक्षण घेतले पाहिजे असे म्हणणारे २४ (२७.५८%) निवेदक आहेत. पदवी पर्यंत शिक्षण घेतले पाहिजे असे म्हणणारे ३६ (४१.३७%) निवेदक आहेत. आणि पदव्युतर पर्यंत आपल्या मुला-मुलीने शिक्षण घेतले पाहिजे असे म्हणणारे केवळ ०९ (१०.३४%) निवेदक आढळून आले. यावरुन असे लक्षात येते की, बंजारा समाजात शिक्षणाची जाणीव जरी झालेली असली तरी उच्च शिक्षणाकडे असणारा ओढा मात्र कमी असल्याचा दिसून येतो. केवळ ज्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण आहे, अशाच निवेदकांनी पदवी व पदव्युतर शिक्षण घेतले पाहिजे असे मत व्यक्त करतांना आढळून आले. निक्षर कुटुंबातील निवदेक शिक्षणाच्या बाबतीमध्ये उदासीन असाल्याचे आढळून आले.

शिक्षणाचा संबध जीवनामध्ये कुठेना कुठे फायदा होतो काय ? याची माहिती तक्ता क्र. ५.३ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ५.३ शैक्षणिक फायद्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शिक्षणाचा फायदा जीवनात होतो काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	६२	६२%
२	नाही	३८	३८%

वडवणी तालुक्यातील निवेदकाच्या शैक्षणिक फायद्या संबधीचा मागोवा घेताना १०० निवेदकांना शिक्षणाचा फायदा जीवनात होतो काय ? यासाठी निवेदका समोर होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आलेले होते. शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे प्रवेशद्वार आहे. शिक्षणाचा फायदा जीवनात केव्हा ना केव्हा होतो असे सांगणारे ६२ (६२%) निवदेक आढळून आले. शिक्षणाचा जीवनात फायदा होत नाही असे सांगणारे ३८ (३८%) निवेदक आढळून आले. मुलाखतीच्या वेळी शिक्षणाचा फायदा होत नाही असे सांगणारे सर्व निरक्षर आणि प्राथमिक शिक्षण घेतलेले निवेदक होते. शिक्षणाचा जीवनात फायदा होतो असे सांगणारे निवेदक जास्त प्रमाणात आढळून आले. यांवरुन बंजारा समाजात शैक्षणिक वातावरणाची निर्मीती झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ५.४ कोणकोणता फायदा होतो यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शिक्षणाचा कोणता फायदा होतो असे वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	सामाजिक प्रतिष्टा वाढते	१२	१९.३५%
२	व्यवसाय करता येतो	२२	३५.४८%
३	नोकरी लागते	१८	२९.०३%
४	कर्ज काढता येते	१०	१६.१२%

कोणकोणत्या प्रकारचा फायदा शिक्षणामुळे होतो. याचा मागोवा घेताना निवेदकाच्या प्रतिक्रिया मुलाखातीच्या वेळी आढळून आल्या याचे वर्गीकरण या ठिकाणी करण्यात आले आहे. शिक्षणामुळे सामाजिक प्रतिष्ठा वाढते असे सांगणारे १२ (१९.३५%) निवेदक आढळून आले. व्यवसाय करता येतो असे सांगणारे २२ (३५.४८%) निवेदक आढळून आले. नोकरी लागते असे मत व्यक्त करणारे १८ (२९.०३%) निवेदक आढळून आले. शिक्षण घेतल्यामुळे व्यवसाय करण्यासाठी कर्ज काढता येते असे सांगणारे १० (१६.१२%) निवेदक आढळून आले.

शिक्षणाचा फायदा होत नाही असा निवेदकाच्या प्रतिक्रिया ऐकयात आल्या तेव्हा शिक्षणाचा फायदा होत नाही असे का वाटते याचा मागोवा तक्ता क्र. ५.५ मध्ये घेण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ५.५ शिक्षणाचा फायदा होत नाही यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शिक्षणाचा फायदा होत नाही असे का वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	नोकरी मिळत नाही	१६	४२.१०%
२	नोकरीस पैसा द्यावा लागतो	१८	४७.३६%
३	वशिला लागतो.	०४	१०.५२%

शिक्षणाचा फायदा होत नाही असे का वाटते ? यासाठी निवेदकाच्या समोर नोकरी मिळत नाही, नोकरीस पैसा द्यावा लागतो आणि त्यासाठी वशिला लागतो असे पर्याय ठेवण्यात आले होते. शिक्षण जरी घेतले तरी गोरगरीबासाठी त्याचा काही उपयोग नाही. नोकरी लागत नाही. असे सांगणारे १६ (४२.१०%) निवेदक आहेत. नोकरीस पैसा द्यावा लागतो असे सांगणारे १८ (४७.३६%) निवेदक आहेत. नोकरीसाठी

वशिला लागतो असे सांगणारे ०४ (१०.५२%) निवेदक आहेत. यावरुन असे लक्षात येते की, शिक्षण केवळ नोकरी साठीच असते अशी निवेदकाची धारण असल्याचे आढळून आले. आजच्या परिस्थिती मध्ये कितीही शैक्षणिक पदव्या प्राप्त केल्यातरी नोकरीस पैसा द्यावा लागतो, वशिला त्यासाठी असणे आवश्यकच आहे असे निवेदकाकडून समजून आले. या सर्व कारणाचा परिणाम शिक्षणावर झालेला दिसून येतो.

तक्ता क्र. ५.६ मुलीच्या शिक्षणातील अडचणी संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुलींच्या शिक्षणासाठी अडचणी येतात काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७८	७८%
२	नाही	२२	२२%

बंजारा समाजातील मुलींच्या शिक्षणातील अडचणी संबंधी माहिती जाणून घेताना निवेदकांना मुलीच्या शिक्षणासाठी अडचणी येतात काय ? यासाठी निवेदकांच्या समोर होय आणि नाही असे पर्याय देण्यात आले होते. एकूण १०० निवेदका पैकी ७८ (७८%) निवेदक शिक्षणामध्ये अनेक अडचणी येतात असे सांगतांना आढळून आले. मुलीच्या शिक्षणामध्ये अडचणी येत नाहीत असे सांगणारे एकूण निवेदका पैकी २२ (२२%) निवेदक असल्याचे आढळून आले. परंतू हे सर्व निवेदक साक्षर, माध्यमिक, पदवी व पदव्युतर स्तरातील अर्थात ज्या कुटुंबामध्ये शैक्षणिक वातावरण आहे अशा असल्याचे दिसून आले. अर्थात ज्या कुटुंबामध्ये शैक्षणिक वातावरण आहे अशा कुटुंबातील लोक मुलीच्या शिक्षणामध्ये अडचणी येत नाहीत असे सांगतांना दिसून आले.

तक्ता क्र. ५.७ मुलीच्या शिक्षणातील अडचणी संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणकोणत्या अडचणी येतात.	वारंवारीता	टक्केवारी
१	जास्त शिक्षण जास्त हुंडा	३८	४८.७१%
२	बाहेरगावी पाठवता येत नाही	२३	२९.४८%
३	राहण्याची सोय नसते	१७	२१.७९%

मुलीच्या शिक्षणामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात यासंबधी माहिती जाणून घेतांना निवेदकाकडून त्यासंबधीच्या प्रतिक्रिया ऐकण्यात आल्या ते म्हणजे अशा की, मुलीने जास्त शिक्षण घेतले की जास्त हुंडो

द्यावा लागतो. कारण त्याच्या जीवनाच सहचर निवडतांना तेवढ्याच प्रमाणात शिक्षण घेतलेला असावा लागताअसे सांगणारे ३८ (४८.७१%) निवेदक आढळून आले. शिक्षणामुळे एवढीच अडचण नसून मुलींना बाहेरगांवी पाठवता येत नाही. त्याचे अनेक कारण सांगणारे २३ (२९.४८%) निवेदक आढळून आले. मुलींना बाहेरगांवी राहण्याची सोय नसते. सोयजरी असेल तरी पण ती खर्चिक बाब असते ही सुध्दा शिक्षणातील एक अडचण आहे असे सांगणारे १७ (२१.७९%) निवेदक आढळून आले. यावरुन मुलींना शिकवण्याची इच्छा जरी असली तरी मुलींच्या शिक्षणामध्ये अनेक अडचणी असाल्याचे दिसून येते.

प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण घेतांना बरेचशे पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवत नाहीत. या कारणाचा शोध तक्ता क्र. ५.८ मध्ये घेण्यात आलेला आहे. त्याची कारणे कोणकोणती आहेत. याचा देखील मागोवा घेण्यात आलेला आहे तो पुढील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ५.८ मुलींना शाळेत न पाठविण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुलींना शाळेत न पाठवण्याचे कारण काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	घरकाम करावे लागते	३५	३५%
२	शेतात काम करावे लागते	३१	३१%
३	मजुरी करावी लागते	२०	२०%
४	शाळा लांब असते	११	११%
५	खर्च परवडत नाही	०३	०३%

शिक्षणामुळे दृष्टी व्यापक आणि विशाल होते. आजचे जग तर अतिशय वेगवान झाले आहे. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात प्रचंड प्रमाणात आणि वेगाने भर पडत आहे. अशी परिस्थिती असतांना देखील बंजारा समाजात शिक्षणाच्या बाबतीत अशी उदासीनता का असावी ? मुलींना शाळेत का पाठविले जात नाही. यासंबधी माहिती विचारात घेतांना अनेक निवेदकांनी मुलींना शाळेत न पाठविण्याची वेगवेगळी कारणे सांगीतल्याचे दिसून येते. मुलींना घर काम करावे लागते त्यामुळे त्यांना शाळेत पाठविता येत नाही असे सांगणारे ३५ (३५%) निवेदक आढळून आले. मुलींना शेतात मदत करावी लागते असे म्हणणारे ३१ (३१%) निवेदक आढळून आले. मुलींना आर्थिक मदत म्हणून मजुरी करावी लागते असे म्हणणारे २० (२०%) निवेदक आढळून आले. शाळा लांब असल्यामुळे मुलींना शाळेत पाठवता येत नाही असे सांगणारे ११ (११%) निवेदक आढळून आले. मुलींच्या शिक्षणासाठी खर्च परवडत नाही असे सांगणारे ०३ (०३%) निवेदक आढळून आले. यावरुन असे लक्षात येते की, बंजारा समाज हा पुर्वीपासून दऱ्याखोऱ्यात राहत असल्याने शिक्षणाचे गांभीर्य त्यांना जास्त

प्रामणात समजलेले दिसून येत नाही. मुलींच्या शिक्षणा बाबत उदासिनता दिसून येते.

तक्ता क्र. ५.९ मुलांना शिक्षणासंबाधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुलांच्या शिक्षणासाठी कोणती शाळा योग्य वाटते ?	वारंवारीता	टक्केवारी
१	आश्रम शाळा	४९	४९%
२	जि. प. शाळा	२१	२१%
३	संस्थेची शाळा	३०	३०%
४	खाजगी शाळा	००	००%

बंजारा समाजातील मुलासाठी शाळा शिकण्यासाठी कोण्त्या शाळेची निवड करणे योग्य वाटते असा प्रश्न केला तेव्हा ४९ (४९%) निवेदकांनी आश्रम शाळा मुलाच्या शिक्षणासाठी योग्य वाटते असे सांगणारे निवेदक आढळून आले. मुलाच्या शिक्षणासाठी जि. प. शाळा योग्य वाटते असे सांगणारे २१ (२१%) निवेदक आढळून आले. संस्थेची शाळा योग्य आहे सांगणारे ३० (३०%) निवेदक आढळून आले. खाजगी शाळा संबधी एकाही निवेदकांनी आपले मत संगीतल्याचे दिसून येत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये खाजगी शाळा ह्या राहिलेल्या नाहीत. सारांश बंजारा संमाजातील मुलांना आश्रम शाळेत पाठवण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे कारण येथे मुलांना खण्या पिण्याची व राहण्याची सोय असते.

तक्ता क्र. ५.१० शिक्षणासाठी बाहेरगांवी जाण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मुलांनी शिक्षणासाठी बाहेरगांवी जावे असे वाटते काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७९	७९%
२	नाही	२१	२१%

मुलांनी शिक्षणासाठी बाहेरगांवी जावे असे वाटते काय ? यासंबधीचा मागोवा घेतांना निवेदकांच्या समोर होय किंवा नाही असे पर्याय ठेवण्यात आले होते. आपल्या मुलांनी शिक्षणासाठी बाहेर गांवी जावे असे सांगणारे ७९ (७९%) निवेदक असल्याचे आढळून आले. मुलांनी शिक्षणासाठी बाहेरगांवी जाऊ नये असे सांगणारे २१ (२१%) निवेदक आढळून आले.

मुलांना बाहेरगांवी का पाठविले जावे ? याचे कारण काय आहे. यासंबधीची माहिती तक्ता क्र. ५.११ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ५.११ मुलांना बाहेरगांवी पाठविण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	बाहेरगांवी पाठविण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	शिकवणी असतात	२६	३२.९१%
२	शहराचे वातावरण चांगले असते	३३	४१.७७%
३	अभ्यासाची सोय होते.	२०	२५.३१%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजातील मुलांनी शिक्षण घेण्यासाठी बाहेरगांवी पाठवण्याच्या कारणाचा शोध घेतला असता त्या प्रश्नांना मिळणारे उत्तर असे होते की, बाहेरगांवी मुलांना शिक्षण घेण्यासाठी शिकवण्या असतात असे सांगणारे २६ (३२.९१%) निवेदक आहेत. शहरामध्ये शिक्षणाचे वातावरण चांगले असते असे सांगणारे ३३ (४१.७७%) निवेदक आहेत. बाहेरगांवी अभ्यासाची सोय असते असे सांगणारे २० (२५.३१) निवेदक आहेत. सारांश, बंजारा समाजामध्ये शैक्षणिक जागृती झालेली असून मुलांनी शिक्षण हे बाहेरगांवी घेतले पाहिजे त्याची विविध कारणे त्यांनी सांगीतलेली आपणास आढळून येतात.

तक्ता क्र. ५.१२ मुलांनाबाहेरगांवी न पाठविण्याचे कारण

अ.क्र.	मुलांना बाहेरगांवी पाठवू नये असे का वाटते	वारंवारीता	टक्केवारी
१	वाईट संगत लागते	०६	२८.५७%
२	जास्त खर्च होतो.	१२	५७.१४%
३	नोकरीची हमी नाही	०३	१४.२८%

प्रत्येक पालकांना आपल्या पाल्याच्या वर्तणुकी संबधी मनात भिती वाटते. कारण आपला पाल्य हा चांगले शिक्षण घेऊन आपल्या जीवनाची चांगली सुरुवात करावी असे सर्वानाच वाटते. परंतु कुटुंबातून बाहेर गेलेला मुलगा शिक्षण घेतांना कसा वागतो याबदल त्यांच्या मनात एक प्रकारची शंकाच असते. ती म्हणजे बाहेरगांवी मुलांना शिक्षणासाठी पाठवले तर त्यास वाईट संगत लागते असे सांगणारे ०६ (२८.५७%)

निवेदक आढळून आले. बाहेरगांवी पाठवल्यास मुलांना शिक्षणासाठी खर्च लागतो असे सांगणारे १२ (५७.१४%) निवेदक आढळून आले. शिक्षण घेऊनही मुलांना नोकरीची हमी नाही त्यामुळे बाहेरगांवी का पाठवावे असे सांगणारे ०३ (१४.२८%) निवेदक आढळून आले. मुलांना बाहेरगांवी न पाठविण्याची विविध कारणे मुलाखतीच्या समयी आलेली आहेत.

तक्ता क्र. ५.१३ तांड्यातील शाळेचे वर्गीकरण

अ.क्र.	आपल्या गांवात / तांड्यात शाळा आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८०	८०%
२	नाही	२०	२०%

बंजारा समाजातील निवेदकांना आपल्या गांवात / तांड्यात शाळा आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला. त्या प्रश्नासाठी निवेदकासमोर होय अथवा नाही असे पर्याय देण्यात आले होते. तेव्हा निवेदकाकडून मिळालेली प्रतिक्रिया अशी होती ती म्हणजे गांवात किंवा तांड्यात शाळा आहे असे म्हणणारे ८० (८०%) निवेदक आढळून आले. गांवात किंवा तांड्यात शाळा नाही असे म्हणणारे २० (२०%) निवेदक आढळून आले.

तक्ता क्र. ५.१४ शाळा कितवी पर्यंत आहे यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	आपल्या गांवत / तांड्यात कितवी पर्यंत शाळा आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	१ली ते ४थी पर्यंत	६०	७५%
२	१ली ते ७वी पर्यंत	०८	१०%
३	१ली ते १०वी पर्यंत	१२	१५%

बंजारा समाजातील निवेदकांना आपल्या गांवात / तांड्यात शाळा आहे काय ? याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा त्या प्रश्नांना मिळणारी प्रतिक्रिया अशी होती की, १ली ते ४थी पर्यंत शाळा आहे असे सांगणारे ६० (७५%) निवेदक आढळून आले. १ली ते ७वी पर्यंत शाळा आहे असे सांगणारे ०८ (१०%) निवेदक आढळून आले. १ली ते १०वी पर्यंत शाळा आहे असे सांगणारे १२ (१५%) निवेदक आढळून आले. यावरुन

असे लक्षात येते की, १ली ते ४थी पर्यंत ६० (७५%) शाळा तांड्यात आहे असे सांगणारे सर्वाधिक निवेदक आहेत. बंजारा समाज ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणी १ली ते १०वी पर्यंत शाळा नाही असे सांगणारे १२ (१५%) निवेदक आढळून आले.

सारांश बंजारा समाजामध्ये १ली ते १०वी पर्यंत शाळेचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. ऐवढेच नाही तर काही ठिकाणी १ली ते ७वी पर्यंत शाळेचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ५.१५ शाळेतील शिक्षकच्या उपस्थिती बदलचे वर्गीकरण

अ.क्र.	शाळेत शिक्षक दररोज येतात काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	७४	७४%
२	नाही	२६	२६%

शाळेत शिक्षक दररोज येतात काय यासंबधीची माहिती जाणून घेतांना निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला की, शाळेतील शिक्षक दररोज शाळेत येतात काय ? तेव्हा त्यांना पर्यायासाठी दोन उत्तरे दिलेली होती. होय किंवा नाही. शाळेतील शिक्षक दररोज येतात असे सांगणारे ७४ (७४%) निवेदक आढळून आले. शाळेत शिक्षक दररोज येत नाहीत असे सांगणारे २६ (२६%) निवेदक आढळून आले. बंजारा तांड्यातील शिक्षक दररोज शाळेत येत नाही असे म्हणणाऱ्या निवेदकाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

राजकिय सहभाग

मानव हा जसा सामाजिक प्राणी आहे तसा तो राजकिय प्राणी आहे असे विधान आजकालच्या काळात केले जाते. त्याचे प्राणीत्व असणेच आपल्याला राजकिय वातावरणाची त्याला किती आवड आहे, जाणीव आहे, ज्ञान आहे हे दर्शविते. त्यामुळे व्यक्तीच्या राजकिय सहभागाचाही विचारकरणे भाग पडते. आज व्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या राजकिय प्रक्रियेत सहभागी होताना दिसते. कारण प्रत्येक क्षेत्रावर राजकिय प्रणालीचा प्रभाव पडलेला आहे. खरे पाहता व्यक्तीच्या संबंधाची क्षेत्रे वेगवेगळी असतात. कधी समाजिक धार्मिक, राजकिय तर कधी आर्थिक, शैक्षणिक अशी असु शकतात. या सर्व प्रकारच्या क्षेत्रात वावरतांना तिची इच्छा असो अथवा नसो, दुरुन का होईना तिचा राजकारणाशी संबध येत असतो. राजकारणाशिवाय व्यक्तीला जगणे शक्य नसते. त्यामुळे राजकारण हा शब्द सर्वस्वर्शी आणि सर्वव्यापी बनला आहे.

दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याच्या प्रयत्न प्रत्येक व्यक्ती करीत असते. हे व्यक्तीगत स्वरुप जेव्हा

सार्वजनिक बनते तेव्हा त्याला राजकिय स्वरुप येत असते. म्हणून राजकारण ही मानवी समूहावर शासन चालविण्याची एक विशीष्ट अशी कला आहे. ही राज्यव्यवस्था चालविण्यासाठी जी पध्दत आयोजित केली जाते तिला राजकारण म्हटले जाते.

सत्ता गाजविण्याचा अधिकार असलेला आणि असा अधिकार नसलेला असे दोन वर्ग राजकिय प्रक्रियेत समाविष्ट असतात. सत्ताअसणाऱ्या व्यक्तीना मात्र सतत कार्यरत राहावे लागते. आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी तो सतत सबंध वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. राजकारण हे कधीही स्थिर नसते. त्यासाठी कार्यरत राहून त्याला आपले संबध योग्य स्वरुपात टिकवून ठेवणे आवश्यक असते.

राजकिय क्षेत्रात दोन वर्ग आहेत असे मानले तरी सतेच्या संदर्भात राजकिय सहभागाचा विचार करता पहिला वर्ग सतेत असतोच आणि त्याचा राजकिय सहभाग नजरेत भरणारा असतो. परंतु राजकारणाबाबत तीन वर्गही दिसतात. त्या तीन वर्गपैकी पहिल्या दोन वर्गाचाच विचार राजकिय सहभाग या संकल्पनेत अभिप्रेत असतो. राजकारणात स्वारस्य नसणारे लोक राजकारणाशी संबधित नसतातच असे ठामपणे म्हणता येत नाही. तसेच त्यांचे राजकरणाबदल मतभेद वा इतर काही स्वरुपावर व फलितावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नसते. हे राजकारणात स्वास्थ न दाखविणारे लोक नाही म्हटले तरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे काही शक्तीच्या प्रभावामुळे म्हणा किंवा प्रलोभनामुळे, मतदानासारख्या माध्यमातून राजकिय सहभाग अनुकूल असतात असे राजकिय अभ्यासकांच्या अनुभवांती सिध्द झालेले आहे. म्हणूनच राजकिय सहभागात अशा एकूण चार प्रकारच्या लोकांचा सहभाग हा अनिवार्य स्वरुपाचा असतो. राजकारणात स्वास्थ नसणाऱ्या लोकांचा विचार गृहीत धरुन राजकिय सहभागाचा विचार केला तर असे जाणवते किंवा अनुभवास येते की, मतदानापुरतेचराजकिय स्वरुप मर्यादीत नसते. विविध राजकिय सभा, चळवळी, निदर्शने उमेदवाराबाबत फिरणे, ग्रामपंचायत-नगरपालिकेच्या निवडणुकाविषयी चर्चा करणे इ. विविध माध्यमातून नाही म्हटले तरी लोक सहभागी होत असतात. मतदान हा राजकिय सहभागाचा तात्पुरत्या स्वरुपाचा एक प्रकार असतो. मतदान केले म्हणजेच लोक राजकिय प्रक्रियेत कायमस्वरुपी सहभागी असतातच असे नाही. मतदानाची प्रक्रिया आटोपल्यानंतर सुध्दा त्यांचा विविध प्रकारे राजकिय सहभाग असतोच. म्हणजेच लोकशाही व्यवस्थेत तरी निदान जास्तीत जास्त लोक राजकारणात या ना त्या प्रकारे चर्चा करीत असतात. राजकिय प्रक्रिया ही बंजारा समाजा पर्यंत पोहचली आहे काय ? राजकारणा विषयीची जागरुकता, सहभाग हे सर्व जाणून घेण्याचा प्रयत्न सदरील प्रकरणात केला आहे.

बंजारा समाजात राजकारणाची जाणीव आहे का ? याचा मागोवा तक्ता क्र. ५.१६ मध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. ५.१६ राजकारणाच्या जानीवेसंबधी वर्गीकरण

अ.क्र.	आपणास राजकारणाची जाणीव आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	४६	४६%
२	नाही	५४	५४%

मानवी जीवनाच्या अनेक पैलु पैकी राजकिय पैलु एक महत्वाचा भाग आहे. संशोधन काळादरम्यान बंजारा समाजातील निवेदकांना असा प्रश्न विचारण्यात आला की, आपणास राजकारण्याची जाणीव आहे काय ? यासाठी होय किंवा नाही असे पर्याय देण्यात आले होते. राजकारणाची जाणीव असणारे ४६ (४६%) निवेदक आहेत आणि राजकारणाची जाणीव नसणारे ५४ (५४%) निवेदक आहेत.

तक्ता क्र. ५.१७ मतदानाच्या जानीवे संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मतदानाची जाणीव आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	६८	६८%
२	नाही	३२	३२%

बंजारा समाजातील निवेदकांची मतदाना संबधीची माहिती विचारात घेत असताना निवेदकांना मतदानाची जानीव आहे का असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नासाठी होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते. बंजारा समाजातील निवेदकांना मतदानाची जानीव आहे असे सांगणारे ६८ (६८%) निवेदक आहेत आणि मतदानाची जानीव नाही असे सांगणारे ३२ (३२%) निवेदक आहेत. थोडक्यात बंजारासमाजामध्ये मतदानाची जानीव ६८% लोकामध्ये झालेली आहे असे दिसून येते.

तक्ता क्र. ५.१८ मतदानकरण्याच्या कारणासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	मतदान करण्याचे कारण काय आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	हक्क	३८	५५.८८%
२	उत्सुकता	२०	२९.४१%
३	आर्थिकलाभ	१०	१४.७०%

वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाची राजकीय परिस्थिती चा आढावा घेतांना निवेदकाना मतदान करण्याचे कारण काय ? यासाठी तीन पर्याय देण्यात आले होते हक्क, उत्सुकता आणि आर्थिक लाभ इत्यादी. या प्रश्नाला प्रतिउत्तर देतांना हक्क म्हणून मतदान करणारे ३८ (५५.८८%) निवेदक आढळून आले. उत्सुकता म्हणून मतदान करणारे २० (२९.४१%) निवेदक आढळून आले आणि केवह आर्थिक लाभ मिळतो म्हणून मतदान करणारे १० (१४.७०%) निवेदक आढळून आले. बंजारा समाजात मतदान करण्याची जागृती जरी निर्माण झालेली असली तरी काही निवेदक मात्र केवळ पैसा मिळावा याच अपेक्षेने मतदान करतात असे आढळून आले.

तक्ता क्र. ५.१९ राजकियपक्षाविषयीच्यां ज्ञानासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	राजकियपक्षाविषयीचे ज्ञान आहे काय ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८८	८८%
२	नाही	१२	१२%

भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये अनेक पक्ष व घटक पक्ष आहेत. बंजारा समाजातील निवेदकामध्ये राजकिय ज्ञान आहे का ? यासाठी त्यांच्या समोर दोन पर्याय देण्यात आले होते. या प्रश्नाला उत्तर म्हणून निवेदकाकडून मिळणारी प्रतिक्रिया अशी होती, ती म्हणजे राजकिय पक्षा विषयी ज्ञान आहे असे सांगणारे ८८ (८८%) निवेदक आहेत. राजकिय पक्षा विषयी ज्ञान नाही असे सांगणारे १२ (१२%) निवेदक आहेत. थोडक्यात बंजारा समाजामध्ये राजकिय पक्षाविषयी जनजागृती झाल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ५.२० कोणत्या पक्षा विषयी ज्ञान आहे या संबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणत्या पक्षा बदल ज्ञान आहे	वारंवारीता	टक्केवारी
१	कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस	३२	३६.३६%
२	भाजप आणि शिवसेना	२३	२६.१३%
३	जनता दल	१३	१४.७७%
४	आर. पी. आय.	१०	११.३६%
५	इतर	१०	११.३६%

निवेदकांना कोणत्या पक्षा बदल ज्ञान आहे याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षा बदल ज्ञान असणारे ३२ (३६.३६%) निवेदक आढळून आले. भा.ज.पा. आणि शिवसेना पक्षाबदल ज्ञान असणारे २३ (२६.१३%) निवेदक आढळून आले. जनता दल या पक्षाबदल ज्ञान आसणारे १३ (१४.७७%) निवेदक आढळून आले. आर. पी. आय. आणि इतर पक्षाबदल ज्ञान असणारे १० (११.३६%) निवेदक आढळून आले. बंजारा समाजामध्ये कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस यापक्षाबदल सर्वाधिक ज्ञान असून त्या पठोपाठ भा.ज.पा. आणि शिवसेना या पक्षाबदल ज्ञान असल्याचे दिसून येते. इतर पक्षाबदल अतिशय कमी प्रमाणात ज्ञान असल्याचे दिसून आले.

तक्ता क्र. ५.२१ निवडणुकीत भाग घेण्यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	निवडणुकीत भाग घ्यावा असे वाटते का ?	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	२८	२८%
२	नही	७२	७२%

सर्व सामान्य व्यक्तीस निवडणुकीत आपण ही भाग घ्यावा व आपल्या समुहाचे नेतृत्व करावे असे वाटणे स्वभाविक आहे. बंजारा समाजातील राजकिय माहिती जाणून घेण्यासाठी निवेदकांना निवडणुकीत भाग घ्यावा असे वाटते का ? यासाठी त्याच्यासमोर होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आलेले होते. निवडणुकीत भाग घ्यावा असे म्हणणारे २८ (२८%) निवेदक आहेत. बंजारा समाजातील निवेदकांना निवडणुकीत भाग घेणे आपले काम नाही असे सांगणारे ७२ (७२%) निवेदक आहेत. बंजारा समाजातील निवेदकांना निवडणुकीत भाग घेण्यापेक्षा मतदान करणेच योग्य वाटते. कारण निवडणुकीत सहभाग घेता येत नाही. फक्त २८ (२८%) निवेदकच मात्र राजकारणात सहभाग घ्यावा असे सांगतांना आढळून आले.

तक्ता क्र. ५.२२ निवडणुकीत भाग घेण्याच्या कारणासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	निवडणुकीत भाग घेण्याचे कारण ?	वारंवारीता	टक्केवारी
१	देशाचा विकास	०२	०७.१४%
२	जातीचा विकास	०९	३२.१४%
३	गांवचा विकास	०४	१४.२८%
४	आर्थिक विकास	१३	४६.४२%

निवडणुकीत भाग घेण्यासंबधी निवेदकांचा मागोवा घेतांना निवेदककांना निवडणुकीत भाग घेण्याचे कारण काय आहे. तेव्हा निवेदकाकडून या प्रश्नाला मिळालेले उत्तर असे की, निवडणुकीत भाग घेतल्याने देशाचा विकास होऊ शकतो असे सांगणारे ०२ (०७.१४%) निवेदक आढळून आले. निवडणुकीत सहभाग घेतल्याने जातीचा विकास होऊ शकतो असे सांगणारे ०९ (३२.१४%) निवेदक आढळून आले. गांवाचा विकास होतो यासाठी निवडणुकीत सहभाग घेताला पाहिजे असे सांगणारे ०४ (१४.२८%) निवेदक आढळून आले. परंतु आर्थिक विकासासाठी निवडणुकीत भाग घेतला पाहिजे असे सांगणारे सर्वाधिक म्हणजे १३ (४६.४२%) निवेदक आढळून आले. म्हणजे सांगावयाचे तात्पर्य असे की, बंजारा समाजामध्ये आर्थिक मिळकतीसाठी निवडणुकीत सहभाग घेतला पाहिजे असे सांगणारे निवेदक जास्त प्रमाणात असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र. ५.२३ स्वजातीच्या लोक प्रतिनिधीचा फायदा यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	स्वजातीच्या लोकप्रतिनिधीचा फायदा होतो काय	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८०	८०%
२	नाही	२०	२०%

निवडणुकीमध्ये स्वजातीचा उमेदवार उभा राहिला आणि तो निवडूण आला तर त्याचा फायदा होतो काय असा जेव्हा प्रश्न विचाराला तेव्हा त्या प्रश्नाला मिळणाऱ्या प्रतिक्रिया अशा होत्या की, जर स्वजातीचा प्रतिनिधी निवडूण आला तर त्या फायदा होतो असे सांगणारे ८० (८०%) निवेदक आढळून आले. स्वजातीच्या लोकप्रतिनिधीचा फायदा होत नाही असे सांगणारे २० (२०%) निवेदक आढळून आले. निवडणुकीमध्ये स्वजातीचा प्रतिनिधी असेल तर जातीला निश्चीत फायदा होतो असे दिसून येते.

तक्ता ५.२४ कोणता फायदा होतो यासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	कोणता फायदा होतो ?	वारंवारीता	टक्केवारी
१	शासकिय योजनाची माहिती कळते	३१	३८.७५%
२	आर्थिक फायदा होतो	३४	४२.०५%
३	सामाजिक फायदा होतो	१५	१८.७५%

स्वजातीच्या प्रतिनिधीचा कोणता फायदा होतो. यासंबधीची माहिती जाणून घेतांना निवेदकाकडून मिळालेल्या प्रतिक्रिया अशा होत्या की, शासकीय योजनाची माहिती मिळते असे सांगणारे ३१ (३८.७५%) निवेदक आढळून आले. स्वजातीच्या प्रतिनिधी मुळे आर्थिक फायदा होतो असे सांगणारे ३४ (४२.०५%) निवेदक आढळून आले. सामाजिक फायदा होतो असे सांगणारे १५ (१८.७५%) निवेदक आढळून आले.

तक्ता ५.२५ शासन चालवण्यास योग्य पक्षासंबधीचे वर्गीकरण

अ.क्र.	शासन चालवण्यास कोणता पक्ष योग्य आहे ?	वारंवारीता	टक्केवारी
१	कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस	६०	६०%
२	भा. ज. पा. व शिवसेना	३०	३०%
३	आमआदमी पक्ष	१०	१०%

सद्यकालीन परिस्थितीमध्ये शासन चालवण्यास कोणता पक्ष योग्य वाटतो यासंबधीची माहिती निवेदकाकडून जाणून घेतांना शासन चालवण्यास कोणता पक्ष योग्य आहे. तेव्हा कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस शासन चालवण्यास योग्य आहे असे सांगणारे ६० (६०%) निवेदक आढळून आले. भा.ज.पा. व शिवसेना हे पक्ष शासन चालवण्यास योग्य पक्ष आहे असे सांगणारे ३० (३०%) निवेदक आढळून आले. आणि अलिकडच्या काळामध्ये नव्याने उदयास आलेला पक्ष आमआदमी पक्ष शासन चालवण्यास योग्य आहे असे सांगणारे १० (१०%) निवेदक आढळून आले. भाजपा व शिवसेना तसेच आमआदमी पक्षा पेक्षा कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस वर बंजारा समाजाचा विश्वास असल्याचे दिसून येते.

प्रकरण ०६
निष्कर्ष आणि उपायोजना

''वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाजशास्त्रीय अभ्यास.'' या विषयाची निवड संशोधनासाठी करण्यात आलेली होती. संशोधन कर्त्यास संशोधन करत असतांना संशोधनासाठी ज्या विषयाची निवड केलेली आहे त्या विषयाच्या प्रति त्यांना काही गृहीत कृत्यांची मांडणी करावी करावी लागते. त्या गृहीत कृत्याच्या आधारे संशोधनाचे निष्कर्ष स्पष्ट करावे लागतात. अर्थातच गृहीतकृत्याच्या मांडणी प्रमाणे त्या गृहीतकृत्याची तपासणी होणे हा संशोधनातील सर्वांत महत्वाचा भाग समजला जातो. थोडक्यात कोणत्याही संशोधनामध्ये गृहीतकृत्याची पडताळणी पाहणे हाच खरा संशोधनाचा उदेश समजला जातो. प्रस्तुत संशोधनामध्ये हाच उदेश डोळ्यासमोर ठेवून निष्कर्षाची मांडणी करण्यात आलेली आहे. संशोधन करत असतांना संशोधक हा वेगवेगळ्या तंत्राच्या आधारे तथ्य संकलन करीत असतो. या संकलीत तथ्याच्या आधारेच निवड केलेल्या विषयाच्या बाबतीला निष्कर्षाची मांडणी करतांना त्यामध्ये शास्त्रीयता हा दृष्टीकोण समोर ठेवून निष्कर्षाची मांडणी करण्यात आलेली आहे. निकर्षामध्ये संशोधनासाठी ज्या गृहीतकृत्यांची योजना होती त्याप्रमाणे निष्कर्ष मांडण्याचा एक अल्पसा प्रयत्न याठिकाणी करण्यात आलेला आहे. तो पुढील प्रमाणे आहे.

बंजारा समाजात विविध रुढी, प्रथा व परंपरायांचे प्राबल्य आहे

भारतीय समाज हा विविधतने नटलेला समाज आहे. भारतामध्ये अनेक जाती, जमातीचे, विविध धर्माचे लोक वास्तव्य करतांना दिसून येतात. अशा भारतीय समाजामध्ये बंजारा समाजाचा देखील वास आहे. प्रत्येक समाजाची संस्कृती ही वैशिष्ट्ये पूर्ण असते. इतर समाजाच्या तुलनेत बंजारा समाजाची संस्कृती कशी भिन्न आहे. याचा परामर्ष याठिकाणी घेण्यात आलेला आहे. संस्कृती म्हणजे समग्र समाजाची जीवन जगण्याची पध्दती किंवा जीवनमार्ग होय. मानवनिर्मीत अशा सर्व भौतिक व अभौतिक गोष्टीचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. अभौतिक संस्कृती ही मानवाच्या दृष्टीने अतिशयश महत्वाची मानली जाते. त्यामध्ये ज्ञान, कला, कौशल्य, विचार, मूल्ये, रितिरिवाज, श्रध्दा, विचार प्रणाली, नितीकल्पना यांचा समावेश करण्यात येतो. जीवन जगण्याची त्या-त्या समाजाची आदर्श रीत म्हणजे संस्कृती होय. प्रत्येक समाजाची संस्कृती जशी वेगळी असते तशीच बंजारा समाजाची संस्कृती देखील वेगळी आहे. बंजारा समाजामध्ये स्वत:ची संस्कृती टिकवणे हाच खरा त्याचा आधार समजाला जातो.

समाज हा कोणताही असो त्या समाजाला एक प्रकारचा इतिहास असतो. प्रत्येक समाजात काही

काळाच्या अंतराने परिवर्तन होत असतात. तरीपण त्या समाजाचे स्थूलरुप मात्र टिकून राहते. याचे कारण म्हणजे स्वत:ला टिकवून ठेवण्याच्या यंत्रणा समाजाने निर्माण केलेल्या असतात. प्रत्येक समाजामध्ये संस्कृतीचे हस्तांतरण एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असतात. बंजारा समाज देखील यास अपवाद नाही. बंजारा समाजाने देखील आपली संस्कृती पिढ्यान-पिढ्या जोपासत असल्याचे दिसून येते. पारंपारिक रुढी, प्रथा व परंपरा यांचा पगडा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. विवाह हा एक सोळा संस्कारापैकी एक संस्कार मानला जातो. बंजारा समाजात विवाह विधीला महत्व प्राप्त झालेले आहे. विवाहविधी हा पूर्वी बंजारा समाजातील पुरोहित करीत असे. जाधव कुळातील लोक हे पुरोहिताचे काम करीत असे. आजही काही प्रमाणात बंजारा पुरोहिताकडून असे विवाह लावले जातात. पारंपाकि पध्दतीने विवाह लावण्याचे प्रमाण आजच्या परिस्थिती ०७ (०७%) इतके असून आधुनिक पध्दतीने विवाह लावण्याचे प्रमाण ९३ (९३%) इतके आहे. बंजारा समाजामध्ये आधुनिक विवाहाचे प्रमाण जरी जास्त असले तरी विवाह प्रसंगी स्त्रिया बंजारा भाषेत गीत गांताना दिसून येतात. विवाहाच्या वेळी नवरदेव किंवा नवरीस बाहेर काढतांना, हळद लावतात अशा प्रकारचे गीत गाण्याची प्रथा बंजारा समाजामध्ये आजही दिसून येते. तक्ता क्र. (३.२०)

बंजारा समाजामध्ये पूर्वीच्या काळात बाल विवाहाची प्रथा होती. आजच्या परिस्थितीमध्ये बंजारा समाजात बालविवाहाची प्रथा आहे काय ? याचा जेव्हा मागोवा घेताला तेव्हा बंजारा समाजात बाल विवाह करण्याचे प्रमाण फक्त २% इतके असल्याचे दिसून येते. परिवर्तनाच्या काळात बंजारा समाजाने स्वत:स बदलून घेतले आहे. यामुळे आजच्या काळात बंजारा समाजात प्रौढ विवाहाचे प्रमाण ९८% इतके असल्याचे दिसून येते तक्ता क्र. (३.२१) आजच्या काळामध्ये बालविवाह करणे कायद्याने गुन्हा आहे, याची जानीव सर्वस्तरातील लोकांना झालेली असून बालविवाह करु नये असे म्हणणारे ६९% निवेदक आढळून आले. बालविवाहमुळे सदरील कुटुंबाची व व्यक्तीची निंदानालास्ती होते. म्हणून आजच्या काळात समाजाची भिती वाटते म्हणून बालविवाह करु नये असे म्हणणारे २९% निवेदक आढळून आले. काही अपवाद म्हणून बंजारा समाजामध्ये बालविवाह होतांना दिसून येतात. (तक्ता क्र. ३.२२)

पुर्वीपासूनच बंजारा समाजामध्ये विवाहविषयक निर्णय घेण्याचा अधिकार हा कुटुंब प्रमुखांना होता. तो आजही आहे असे नाकारता येणार नाही. आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा ६९% कुटुंब प्रमुख हे विवाह विषयक निर्णय घेतांना दिसून येतात. कुटुंबातील सदस्य विवाह विषयक निर्णय घेतात असे २१% निवेदक आहेत. व फक्त १०% निवेदक विवाहाच्या बाबतीमध्ये स्वत: निर्णय घेतात असे दिसते. यावरुन असे म्हणता येईल की, बंजारा समाजामध्ये विवाहाविषयक निर्णय घेण्याचा अधिकार हा कुटुंब प्रमुखालाच असतो असे दिसून येते. तक्ता क्र. (३.२३)

बंजारा समाजात विवाह करतांना पुर्वीच्या काळात मुलामुलीच्या पसंतीचा विचार केला जात नसे. आई-वडिल सांगतील तोच निर्णय अंतिम समजला जात असे. कारण विवाहाची जुळणी करण्याचे काम बंजारासमाजातील उपजात 'ढालीया' हे करत असे. परंतु आज ही परिस्थिती बदललेली आहे. आज विवाह जुळणी पुर्वी मुला-मुलीचे मत विचारात घेतले पाहिजे असे म्हणणारे ७३% निवेदक आढळून आले. मुला-मुलीच्या पसंतीचा वचार न करता विवाह जुळणी करणारे फक्त २७% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (३.२४) असे जरी असले तरी मुला-मुलीचे विवाह हे जातीअंतर्गतच होतात. आंतर जातीय विवाहला समाजाची अजिबात मान्यता नाही. संशोधन काळादरम्यान आंतरजातीय विवाहाच्या बाबतीचा मागोवा घेतला तेव्हा १००% निवेदकांनी त्यास विरोध दर्शविला. तक्ता क्र. (३.२५) याच्या कारणाचा मागोवा घेतांना निवेदकांची प्रतिक्रिया अशी होती की, जात पंचायत अशा विवाहाला मान्यता देत नाही किंवा जात पंचायतीची भिती वाटते असे सांगणारे ८३% निवेदक आढळून आले अशा प्रकरच्या विवाहीतांना समाज वाळीत टाकतो असे म्हणणारे १०% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (३.२६)

हुंडा देण्या-घेण्याची प्रथा ही बंजारा समाजामध्ये पूर्वीपासूनच चालत आलेली प्रथा आहे. परंतु याचे स्वरुप मात्र वेगळे होते. पूर्वीच्या काळी बंजारामध्ये वधू मूल्य देण्याची प्रथा होती. आज मात्र याचे स्वरुप बदलले आहे. आज वधूमुल्याच्या ऐवजी वर मूल्य ही प्रथा बंजारा समाजात प्रचलीत असल्याचे दिसून येते. हुंडा देणे व घेणे आजच्या काळामध्ये एक प्रतिष्ठा बनलेली दिसून येते. बंजारा समाजामध्ये हुंडा घेणाऱ्याचे प्रमाण ९८% तक्ता क्र.(३.२७) हुंडा घेण्याचे कारण मात्र वेगवेगळे असल्याचे दिसून आले. बंजारा समाजामध्ये सामाजिक प्रतिष्ठा म्हणून हुंडा-घेणाऱ्याचे प्रमाण हे ३५% आहे. परंपरा म्हणून हुंडा घेणाऱ्याचे २०% इतके असून, आर्थिक मदत म्हणून हुंडा घेणारे ४३% निवेदक आढळून आले. यावरुन असे दिसून येते की, बंजारा समाजातील ही प्रथा पूर्वीसारखी राहीलेली नसून तिचे स्वरुप मात्र आज बदललेले दिसून येते तक्ता क्र. (३.२९)

पूर्वीच्या काळी बंजारा समाजामध्ये कुटुंब नियोजनाची सुविधा नव्हती त्यामुळे आपल्या कुटुंबात किती अपत्यांना जत्म द्यावा असा काही नियम नव्हता.एकदा सुरु झालेली जनन क्षमता जेव्हा नैसर्गिक रित्या बंद होईल तेव्हाच ती थांबवली जात असे. साधारणता १० ते १२ अपत्यांना जन्म देणारे स्त्री-पुरुष मोठ्या संख्येने आढळून येत असे. बंजारा समाजात स्त्रियांनी जर तागाच्या बिया खालल्या तर मुलबाळ होत नाही असा समज त्यांच्यामध्ये होता. पण ते शंभर टक्के परिणामकारण असेलच असे म्हणता येत नव्हते. बदलत्या समाजाच्या संपर्कामुळे आरोग्य विषयक सुविधांचे महत्व त्यांना पटत आहे. कुटुंब नियोजन शस्त्र क्रिया ही फक्त स्त्रियानीच करावी अशी मानसिकता आज देखील बंजारा समाजात असल्याचे दिसून येते. याचे कारण जेव्हा विचारले तेव्हा असे सांगीतले की, बंजारा समाजातील पुरुषांना कष्टाची कामे करावी लागतात त्यामुळे पुरुषांनी शस्त्र क्रिया करुन घेऊ नये. एका स्त्रीने तर मुलाखतीमध्ये असे सांगितले की, पुरुषांची शस्त्र क्रिया घेऊन जर मुल

जन्माला आले तर सर्व दोष स्त्रीला दिला जातो. जन्माला आलेले मुल हे दुसऱ्या पुरुषापासून झालेले असावे असा संशय स्त्रियांवर घेतला जातो. तिची अफवा तांडाभर पसरविली जाते. जननिंदेचा सामना करण्यापेक्षा शस्त्रक्रिया करुन घेणे केव्हाही चांगले म्हणून बंजारा समाजामध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेण्याचे प्रमाण पुरुषा पेक्षा स्त्रिया मध्ये जास्त असल्याचे दिसून येते. कुटुंब नियोजन शस्त्र क्रिया कोण करुन घेतात याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा ७७% स्त्रिया आणि २३% पुरुष कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतात असे आढळून आले. तक्ता क्र. (३.१४)

बंजारा समाजावर पूर्वीपासूनचे हिंदू धर्माचा प्रभाव असल्यामुळे बंजारा समाज हा धर्मभोळा समाज म्हणून ओळखला जात असे. इश्वर हा सृष्टीचा निर्माता आहे. त्याच्या नामस्मरणा शिवाय कोणत्याही कार्याची सुरुवात करु नये. त्याची कृपा असेल तरच सर्वाचे भले होते असा दृढ विश्वास आहे. देवावर विश्वास असल्या कारणामुळे उपवास करणाऱ्याचे प्रमाण देखील जास्त आहे. तक्ता क्र. (४.२४) उपवास कण्यासंबधीचा मागोवा घेताना त्यांच्या कडून वेगवेगळ्या प्रतिक्रिया ऐकण्यात आल्या. यामध्ये श्रध्दा म्हणून उपवास करण्याऱ्याचे प्रमाण ४४% इतके आहे. परंपरा म्हणून उपवास करणारे २०% निवेदक आढळून आले. वैज्ञानीक कारणामुळे उपवास करणारे १२% निवेदक आढळून आले. परंतु १३% निवेदक हे लोक सांगातात म्हणून आम्ही उपवास करतो असेही निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (४.२५) यावरुन असे लक्षात येते की, केवळ आर्थिक भावनेमुळे उपवास करणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक आहे असे दिसून येते.

बंजारा समाजात देवदेवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी पशुबळी द्यावा लागतो. पशुबळीची प्रथा ही पारंपारिक समाजापासून ते आजपर्यंत चालु असल्याचे दिसून येते. या समाजामध्ये मांसाहरी नवस करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे असे दिसून येते. नवस प्रकारामध्ये शेळी, मेंढी, रेडा, कोबडा, बोकूड इ. पशुंचा बळी दिला जातो. देवदेवतांना पशु बळी दिला नाही तर तो सर्व आपला नायनाट करेल अशी बंजाराची धारणा आहे. संशोधन क्षेत्रातील निवेदकाकडून याची माहिती करुन घेतांना देवदेवतांना पशू बळी दिला जातो काय ? असा प्रश्न विचारला तेव्हा होय म्हणणारे ८४% निवेदक आढळून आले आणि नाही म्हणणारे फक्त १६% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (४.२०)

बंजारा समाजात आर्थिक मागासलेपणा बहू कारणी आहे

प्रत्येक समाजातील व्यक्तीचा दर्जा हा तिच्या आर्थिक उत्पन्नावर आधारीत असतो. म्हणजेच व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरविण्यामागे त्या व्यक्तीची आर्थिक प्राप्ती किती आहे ही गोष्ट जशी महत्वाची आहे. तसेच व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा देखील त्यावर ठरविला जातो. एखाद्या सामाजिक गटाची परिस्थिती ही तिच्या आर्थिक घटकावर अवलबून असते. यास बंजारा समाज देखील अपवाद नाही.

संशोधन क्षेत्रातील निवेदकाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतांना विविध घटकांचा या ठिकाणी

उलेख करणे क्रमप्राप्त ठरते. वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाची आर्थिक परिस्थिती अतिशय बेताची असल्याचे दिसून येते. या तालुक्यातील निवेदकाकडे ७३% शेती असून २७% निवेदक बिगर शेती धारक असल्याचे दिसून येतात. तक्ता क्र. (४.१) शेतीचा प्रकार कोणता आहे याचा मागोवा घेताना बागायती शेती पेक्षा कोरडवाहू शेतीचे प्रमाण ७५.३४% इतके आढळून आले. या परीसरातील २४.७५% निवेदक बागायती शेती करतात असे आढळून आले. तक्ता क्र. (४.२) ०१ ते ०२ एकर शेती असणाऱ्याचे प्रामण ५०.६८% इतके असून ०३ ते ०४ एकर शेती असणाऱ्याचे प्रमाण २१.९१% इतके आहे. ०५ ते ०७ एकर शेती असणाऱ्याचे प्रमाण १२.३२% इतके आहे. आणि १० एकर पेक्षा जास्त शेती असणाऱ्याचे प्रमाण ०६.८४% इतके आहे. तक्ता क्र. (४.३) बंजारा समाजातील निवेदकाकडे शेतीसाठी लागणारी जी अवजारे आवश्यक आहेत ती देखील पुरेशा प्रमाणात असल्याचे दिसून येत नाही. तक्ता क्र. (४.५) शेतीची मशागत ही पारंपारिक पध्दतीनेच करणाऱ्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येते. बैलाच्या साहय्याने शेती करणारे ९२.२६% निवेदक असून ट्रॅक्टरच्या मदतीने शेती करणारे फक्त ०२.७३% निवेदक आढळून आले तक्ता क्र. (४.७)

बंजारा समाजातील निवेदकांचे आर्थिक स्त्रोत कोणात्या प्रकारचे आहेत याचा मागोवा घेतांना शेती, शेतमजुरी, मजुरी, नोकरी आणि ऊसतोडणी इ. सर्व आर्थिक उत्पन्नात वाढ करणारे घटक आहेत असे सांगीतल्याचे दिसून येते. बंजारा समाजामध्ये नोकरी करणाऱ्याचे प्रमाण फक्त ५% असल्याचे दिसून येते. परंतु आर्थिक उत्पन्नाचे सर्वात मोठे साधन म्हणजे ऊसतोडणी होय असे म्हणणारे २८% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (४.८)

बंजारा समाजामध्ये कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण ८५% असून कर्ज न काढणाऱ्याचे प्रमाण केवळ १५% इतके आहे. तक्ता क्र. (४.९) कर्ज कशासाठी घेतले जातात याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा शेतीसाठी, विवाहासाठी, घरबांधणी, नोकरीसाठी, शिक्षणासाठी, आणि पशु खरेदीसाठी या सर्वांसाठी कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण वेगवेळे दिसून आले. तक्ता क्र. (४.१०) बंजारा समाजातील लोक आजही खाजगी सावकाराकडून कर्जकाढतात याचे प्रमाण ३४ (४०%) इतके असून बँकेकडून कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण १८ (२१.१७%) इतके असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. (४.११) कर्ज काढणाऱ्याचे प्रमाण जास्त जरी असले तरी कर्ज फेडणाऱ्याचे प्रमाण मात्र कमी आहे. कर्ज न फेडण्याचा कारणाचा शोध घेतांना निवेदकांनी वार्षीक उत्पन्नातील घट, नेसर्गिक कोप, आणि कौटुंबिक खर्चात वाढ झाल्याने ते वेळेवर फेडता येत नाही असे कारण सांगणारे निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (४.१२) कुटुंबाच्या भविष्यासाठी बचत करणे आवश्यक आहे. कारण काटकसर ही वृध्दपणाची आरामाची रोजी रोटी आहे असे बुजूर्ग सांगताना आपणास ऐकावयास मिळते. बंजारा समाजामध्ये बचत करण्याची पध्दत वाढलेली दिसून येते. तक्ता क्र. (४.१४) बँकामध्ये बचत केली

जावी अशी जानीव जागृती ५२.१७% लोकामध्ये झालेलेल दिसून येते. बंजारा लोक आज विविध ठिकाणी बचत करतांना दिसून येतात. मात्र याचे प्रमाण कमी अधिक प्रामण दिसून येते. तक्ता क्र. (४.१५)

बंजारा समाजातील लोकाची आर्थिक प्रगती न होण्याचे विविध कारणे आहेत. ती म्हणजे कोरडवाहू शेती, शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचा अभाव, कर्ज बाजारीपणा, उत्पन्नाचे स्त्रोत अतिशय कमकुवत, शिक्षणाचे प्रमाण अत्याअल्प, इ. सर्व ही आर्थिक प्रगतीमधील अडथळे समजता येईल. म्हणून बंजारा समाज हा आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून आर्थिक मागासलेपणा हा बहूकारणी आहे. हे आपणास या ठिकाणी सिध्द करता येते.

बंजारा समाजात अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे

पुर्वीपासूनच डोंगर, दऱ्याखोऱ्यात राहणारा समाज हा बंजारा समाज होय. अनाधी काळापासून निसर्गाच्या सानिध्यात राहत असल्यामुळे त्याची देवदेवतावर अपार श्रध्दा आहे. हा समाजपुर्वीपासूनच अंधश्रध्देवर विश्वास ठेवणारा समाज म्हणून त्याची ओळख आहे. शकून व अपशकून यावर विश्वास ठेवणारा समाज म्हणजे तो बंजारा समाज. कावळा शिवणे, मांजर आडवी जाणे, पाण्याची रिकामी घागर समोरुन येणे, हे अशपकून आहे. कुटुंबातील व्यक्तीने कॉलरा, कुष्ठरोग, देवी, गोवर, कांजण्या, डोळ्याचा विकार या सर्व आजारे व्यक्ती पिढीत असेल तर त्यास ते दैवी कोप समजतात. दैवी कोपावर या समाजाचा पूर्ण विश्वास आहे. याचे उदाहरण द्यायचे झाले तर लहाण मुलास कांजण्या किंवा गोवर निघाल्यास त्या काळात सबंधित पती-पत्नीने यौवन संबंध ठेवू नये. असा नियम आजही आहे. पती पत्नीमध्ये या क्रिया झाल्या तर दैवी शक्ती असंतुष्ट होते आणि आजार जास्त होतात असा समज असल्यामुळे कुटुंबातील व्यक्ती पावित्र्य राखण्याचा प्रयत्न करतात. आपल्या कुटुंबावर काही वाईट आपत्ती येवू नये या साठी याकालावधीत शारिरीक संबध ठेवणे निषिध्द मानले जातात.

बंजारा समाजातील निवेदक देवदेवतांना विविध प्रसंगी कोप होऊ नये म्हणून देवदेवतांना मानतात. व्यक्तीकडून चुका झाल्यास देवदेवता रागावतात या देवतांना खुष ठेवण्यासाठी नवस करावा लागतो. नवस करण्याची प्रथा या समाजात पूर्वीपासून चालत आले आहे. आज देखील बंजारा समाजात नवस करणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. आजच्या परिस्थिती मध्ये यासंबधीचा मागोवा घेताना ७२% निवेदक देवदेवतासाठी नवस करतांना दिसून येतात. तक्ता क्र. (४.२२) बंजारा समाजात अशा काही देवदेवता आहेत की, त्यासाठी त्यांना नवस करावाच लागतो. कंकाळ देवी, तुळजाभवानी, सामतदादा, सामकीमाता, इत्यादी देवदेवतांना नवस करुन तो नवस फेडला जावा असा समाजाचा दंडक असतो. जर तो नवस आपण फेडला नाही तर कुटुंबाची व कुटुंबातील व्यक्तीची हानी होते असा गैर समज या समाजात आहे. त्यासाठी तो फेडला जावा अशी समज

आहे. जर नवस फेडला नाही तर शारिरीक, मानसिक, आर्थिक नुकसान देखील होऊ शकते. शारिरीक नुकसानीमध्ये अंगात ताप भरणे, हातपायलुळे होणे, पोटात दु:खणे, डोकेदुखणे यासारखे नुकसान होतात असे मानणाऱ्याचे ४८ (५८.५३%) इतके आहे. माणसिक नुकसानी मध्ये वेडे होणे, झोपीत बडबड करणे, झोपेत चालणे, असे आजार होऊन मानसाचे नुकसाने होते. असे म्हणणाऱ्याचे प्रमाण २७ (३२.९२%) इतके आहे. आर्थिक नुकसानीमध्ये गाय-बैल मरणे, आग लागणे, चोरी होणे यासारखे नुकसान होते. तक्ता क्र. (४.२७)

बंजारा समाजाचे विश्व म्हणजे देवदेवता, जादुटोणा, भानामती, करणी, जादु, भुते यांनी वेढलेले दिसते. मानवाने जसा धर्म आचरण म्हणून स्वीकारला आणि त्याच्यामाध्यमातून इश्वरी कल्पना निर्माण केली तशीच कल्पना जादुच्या बाबतीत सुध्दा स्वीकारली आहे. आपल्या भोवती पसरलेली चराचर सृष्टी, त्यामध्ये सामावलेली शक्ती आणि घडणाऱ्या घटनेद्वारे आलेले अनुभव यामुळे त्यांचा अंधश्रध्देवर विश्वास बसला. एखादी घटना कशानेही साध्य होत नाही परंतु ती घटना मात्र जादुमुळे नक्कीच साध्य होते असा समज बंजारा समाजामध्ये आहे. बंजारा समाजाचा अभ्यास हा जादुला टाकुन होऊ शकत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये जादु संबधीचा मागोवा घेतांना असे निदर्शनास आले की, आज जादुवर विश्वास ठेवणारे ८२% निवेदक आढळून येतात. फक्त १८% निवेदकांचा मात्र जादुवर विश्वास नाही. तक्ता क्र. (४.२६)

जादुकरणाऱ्या व्यक्तीबदल भिती वाटते काय ? असा प्रश्न जेव्हा विचारुन त्याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्याची निवेदकांनी वेगवेगळी कारणे सांगीतल्याचे दिसून आले. जादुमुळे भिती वाटते असे सांगणारे ८२% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (४.२८)

बंजारा समाजातील निवेदकांचा भुतबाधा या गोष्टी वर अतिशय विश्वास आहे. अमावशा किंवा पोर्णीमाला भुत दिसतात असे वयोवृध्द व्यक्ती सांगताना दिसून आले. आज विज्ञान युग आहे या वैज्ञानीक युगामध्ये सुध्दा भुतबाधा होते असे सांगणारे ७३% निवेदक आढळून आले. भुतबाधा ही अंधश्रध्दा आहे. त्याला सत्याचा आधारी नाही, ती थोतांड आहे असे सांगणारे २७% निवेदक आढळून आले. यावरुन असे सांगता येते की, बंजारा समाजाचा भुतबाधेवर विश्वास आहे हे स्पष्टच होते. तक्ता क्र. (४.२९)

बंजारा समाजात शैक्षणिक मागासलेपणा असून मुलीच्या शिक्षणाचे प्रामण कमी आहे.

प्रत्येक व्यक्तीचा दर्जा ठरावितांना शिक्षण हा सर्वात महत्वाचा मुद्दा मानलेला आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा बौध्दीक विकास होतो. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रस्तुत अध्ययनामध्ये बंजारा समाजाची शैक्षणिक परिस्थिती तपासून पाहण्याचा उदेश होता. वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाची शैक्षणिक स्थितीचा आढावा घेतला तेव्हा आपल्या मुलाने शिक्षण घ्यावे असे वाटते काय ? यासाठी होय किंवा नाही असे दोन पर्याय निवेदकांच्या समोर ठेवण्यात आले होते. आपल्या मुला-मुलीने शिक्षणघ्यावे असे सांगणारे ८७% निवेदक आहेत. परंतू मुला-मुलीने शिक्षण घेऊ नये असे सांगणारे फक्त १३% निवेदक असल्याचे आढळून आले.

संशोधन क्षेत्रातील ८७% निवेदकांना आपल्या मुला-मुलीने शिक्षण घ्यावे असे सांगीतले असले तरी त्यांनी कुठपर्यंत किंवा किती शिक्षण घ्यावे याचा मागोवा घेतांना किंवा त्याच्या प्रतिक्रिया जाणून घेतांना असे निदर्शनास आले की, प्राथमिक शिक्षण घ्यावे असे ०८ (९.१५%) निवेदक आढळून आले. माध्यमिक पर्यंत शिक्षण घ्यावे असे सांगणारे १० (११.४९%) निवेदक आढळून आले. उच्चमाध्यमिक पर्यंत शिक्षण घ्यावे असे सांगणारे २४ (२७.५८%) निवेदक आढळून आले. आणि पदवी पर्यंत आपल्या मुला-मुलीने शिक्षण घेतले पाहिजे असे सांगणारे ३६ (४१.३७%) आणि पदव्युतर पर्यंत मुला मुलीने शिक्षण घेतले पाहिजे असे सांगणारे ०९ (१०.३४%) निवेदक आढळून आले तक्ता क्र. (५.२)

अर्थात शिक्षणाचा फायदा जीवनात होतो याची जाणीव आज जवळपास लोकांना झोलली दिसून येते. ६२% निवेदक शिक्षणाचा जीवनात फायदा होतो असे म्हणतांना आढळून आले. व ३८% निवेदक म्हणतात शिक्षणाचा जीवनात फायदा होत नाही. परंतु शिक्षणाचा जीवनामध्ये विविध कारणासाठी फायदा होतो. असे म्हणणारे निवेदक आढळून आले. शिक्षणामुळे समाजिक प्रतिष्ठा वाढते, व्यवसाय करता येतो नोकरी लागते ऐवढेच नाही तर जीवन जगण्यासाठी अथवा व्यवसाय करण्यासाठी कर्ज देखील काढता येते. तक्ता क्र. (५.४)

शिक्षणाचा फायदा होत नाही असे म्हणणारे ३८% निवेदक आढळून आले, हे सर्व साक्षर आणि निरक्षर स्तरातील होते. या कारणाची माहिती जाणून घेतांना असे दिर्शनास आले की, शिक्षण होऊन नोकरी मिळत नाही, नोकरीसाठी पैसा द्यावा लागतो. नोकरीस वशिला लागतो. यामुळे या स्तरातील लोकांमध्ये शिक्षणाबद्दल उदासिनता दिसून येते. तक्ता क्र. (५.५)

बंजारा समाजामध्ये मुला पेक्षा मुलीच्या शिक्षणामध्ये अनेक अडचणी येतात असे सांगतांना आढळून आले. असे ७८% निवेदक आढळून आले. फक्त २२% निवेदक मुलीच्या शिक्षणासाठी अडचणी येत नाहीत असे सांगतांना निदर्शनास आले. तक्ता क्र. (५.६)

बंजारा समाजातील मुलींच्या शिक्षणाचा मागोवा घेतांना त्यांच्या शिक्षणात कोणकोणत्या अडचणी येतात तेव्हा वेगवेगळी कारणे समोर आली ती म्हणजे मुलीने जास्त शिक्षण केले तर जास्त हुंडा द्यावा लागतो. तसेच मुलींना बाहेरगांवी पाठवता येत नाही. कारण बाहेरगांवी मुलींच्या राहण्याची सोय नसते. तक्ता क्र. (५.७) मुलीना घरकाम करावे लागते. शेतात काम करावे लागता, मजुरी करावी लोते, शाळा लांब असते, याच बरोबर बऱ्याच निवेदकांनी असे सांगीतले की, मुलींच्या शिक्षणचा खर्च परवडत नाही. ही सर्व मुलींच्या शिक्षणातील अडथळा समजला जातो. म्हणून बंजारा समाजामध्ये मुलाच्या शिक्षणापेक्षा मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे असे ठामपणे सागता येते. तक्ता क्र. (५.८)

बंजारा समाजात आधुनिक सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेण्याची प्रथा कमी आहे.

समाज हा कोणताही असो प्रत्येक समाजाची सांस्कृतीक जीवन जगण्याची तऱ्हा अथवा पध्दत ही वेगवेगळी असते. ती इतर जाती-जमाती प्रमाणे एकसंघ किंवा सारखी नसते. प्रत्येक समाजात कला व मनोरंजन असतात. प्रत्येक व्यक्तीला मनोरंजनाची आवश्यकता आहे. मनोरंजन व कला हे संस्कृतीचे घटक समजले जातात. पुरातन काळापासून मानव हा कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे स्वत: बरोबर इतरांचे मनोरंजन करीत आलेला आहे. मनोरंजनाला मानवी जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. जीवन सुखी व समृध्द करण्यासाठी मनोरंजन अत्यंत आवश्यक मानले जाते. मनोरंजन नसेल तर जीवन व्यर्थ समजले जाते. मुळातच बंजारा समाज हा शारिरीक कष्ट करणारा समाज म्हणून त्याची ओळख आहे. शारीरिक कष्टामुळे त्याच्या जीवनात नैराश्य निर्माण झालेले असते. तो जर दुर करावयाचा असेल तर मनोरंजना शिवाय दुर होऊ शकत नाही.

बंजारा समाज हा अनादीकाळापासूनच सांस्कृतिक आनंद घेणारा समाज म्हणून ओळखला जातो. यामध्ये नृत्य, होळी, बंजारा गीत, बंजारा भजन, बंजारा केनावट, बंजारा कथा इ. ही सर्व बंजारा समाजातील सांस्कृतिक कार्यक्रम होत. या समाजातील लोक दिवसभर काबाड कष्ट करुन आल्यानंतर रात्रीच्या वेळी काही तरी मनोरंजन व्हावा म्हणून बंजारा समाजातील लोक भजन गातात. हे भजन प्रामुख्याने बंजारा समाजाचे आराध्य दैवत श्री. संत सेवालाल महाराज यांच्या नावाने गायीले जाते. यावेळी तांड्यातील सर्व स्त्री-पुरुष सहभागी होतात. बंजारा समाजातील स्त्रिया विविध उत्सवप्रसंगी फेर थरुन गाणी म्हणतात व त्याबरोबर नृत्य देखील करतात. होळी सारख्या सणाला बंजारा समाजात अत्यंत महत्व आहे. सण त्याचा एक प्रकारचा आवडता सण समजला जातो. या उत्सवप्रसंगी लहाणापासून ते थोरमोठ्या पर्यंत सर्वजन सहभागी होतात. या उत्सव प्रसंगी स्त्री-पुरुष मद्यपान करता .

आज समाजात परिवर्तन होत आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये बंजारा समाज जेवढा बदलायला पाहिजे तेवढा मात्र तो आज बदललेला दिसत नाही. हा समाज पारंपारीक सांस्कृतिक कार्यक्रमाला महत्व देणारा समाज आहे. आजचा बंजारा समाज हा आधुनिक संस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतांना दिसत नाही. सांगावयाचे तात्पर्य असे की, या समाजातील लोक आजही जास्त करुन नाटक, सिनेमा पाहतांना दिसून येत नाही. तक्ता क्र. (४.३३) जे लोक नाटक / सिनेमा पाहतात याचे प्रमाण मात्र अतिशय अल्पशा प्रमाणामध्ये असल्याचे दिसून येते. जे लोक नाटक, सिनेमा पाहत असतील ते केवळ एकएकटे पाहतांना दिसून येतात. कुटुंबातील सदस्याबरोबर आधुनिक कार्यक्रम पाहणाऱ्याचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे आढळून येते. तक्ता क्र. (४.३४) यावरुन असे स्पष्ट होते की, बंजारा समाजामध्ये आधुनिक सांस्कृतीक कार्यक्रमाचा आनंद घेण्याची प्रथा किंवा परंपरा अतिशय कमी असल्याने दिसून येते.

बंजारा समाज राजकिय दृष्ट्या अजागृत आहे

राजकारण हा शब्द मुळातच सर्वस्पर्शी आहे. तो मानवाच्या जीवनाचा एक अंग बनलेला आहे. कोणत्याही व्यक्तीने इतराशी केलेले डावपेच म्हणजे राजकारण होय. राजकारण हे मानवी समाजाच्या सर्वच स्तरातील सघटीत शक्तीचे शास्त्र आहे. लहान-मोठ्या समुहातील गुंतागुंतीच्या प्रश्नांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राजकारण होय. राजकारणात व्यक्तीला सतत कार्यरत रहावे लागते. समाजात जे अनेकविध प्रश्न असतात त्याचा व्यक्तीला सहानुभूती पूर्वक विचार करावा लागतो. सातत्याने लोकाचे प्रश्न सोडवावे लागतात. राजकारण हे कधी ही स्थिर राहत नाही. जगातील जवळपास सर्वच देशातील लोक राजकिय प्रक्रियेत सहभागी झालेले असतात. बंजारा समाज देखील यास अपवाद नाही. संशोधन क्षेत्रातील बंजारा समाजाच्या राजकारणात कितपत सहभाग आहे याचाही विचार करणे क्रम प्राप्त ठरते. बंजारा समाजाच्या राजकिय सहभागाचा आणि राजकिय जाणीव जाग्रतीचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. राजकिय सहभागातील प्राथमिक स्वरुपाचा सहभाग म्हणजे निवडणुकीमध्ये मतदान करणे होय. मतदान करणे आणि राजकारणात सहभागी होणे ह्या दोन्ही क्रिया परस्पर वेगळ्या मानलेल्या आहेत. बंजारा समाजातील लोकांना राजकारणाची जाणीव आहे का ? याचा मागोवा घेतांना ४६% निवेदक जाणीव असल्याचे आढळून आले. परंतु काही निवेदकांना राजकारणाची जाणीव नाही असे म्हणणारे ५४% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (५.१६) ज्या निवेदकांना राजकारणाची जाणीव आहे ते लोक जास्त करुन मतदानामध्ये सहभागी होतात. बंजारा समाजातील लोक मतदान का करतात याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा काही निवेदक हक्क म्हणून मतदान करतांना आढळून आले तर काही निवेदक उत्सुकता आणि पैसा भेटतो म्हणून मतदान करतात असे आढळून आले. तक्ता क्र. (५.१८)

बंजारा समाजातील ८८% निवेदकांना राजकिय पक्षाचे ज्ञान आहे असे आढळून आले. केवळ १२% निवेदकांना राजकिय पक्षाचे ज्ञान नाही अशी माहिती संशोधन काळादरम्यान निदर्शनास आली. तक्ता क्र. (५.१९) बंजारा समाजातील निवेदकांना वेगवेगळ्या राजकीय पक्षा बदल ज्ञान असल्याचे निदर्शनास आले. तक्ता क्र. (५.२०) संशोधन क्षेत्रातील निवेदकांना निवडणुकीत भाग घ्यावा असे वाटते का ? निवडणुकीत भाग घेण्याचे कारण काय आहे. याचा जेव्हा मागोवा घेतला तेव्हा या प्रश्नाला दिलेले उत्तर असे होते की, निवडणुकीत भागघेतल्याने देशाचा विकास होतो. जातीचा विकास होतो. त्याच बरोबर गावचा आणि अर्थिक विकास देखील होतो असे सांगतांना २८% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (५.२२) स्वजातीच्या लोकप्रतिनिधीचा फायदा होतो असे ८०% निवेदक आढळून आले. कोणकोणता फायदा होतो तेव्हा निवेदकाकडून शासकिय योजनाची माहिती कळते, आर्थिक फायदा होतो, सामाजिक फायदा होतो असे सांगतांना दिसून आले. तक्ता क्र. (५.२४)

आजच्या परिस्थितीमध्ये कोणता पक्ष शासन चालवण्यास योग्य आहे याची माहिती करुन घेतांना कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष शासन चालवण्यास योग्य वाटतो असे ६०% निवेदक आढळून आले. भा. ज. पा. व शिवसेना पक्ष शासन चालवण्यास योग्य आहे असे म्हणणारे ३०% निवेदक आढळून आले. तसेच शासन चालवण्यास आम आदमी पक्ष शासन चालवण्यास योग्य आहे असे सांगणारे १०% निवेदक आढळून आले. तक्ता क्र. (५.२५)

सरांश, बंजारा समाजामध्ये मतदान करण्याची जाणीव किंवा जागृती जरी झालेली असली तरी बंजारा समाजाचा राजकारणात (निवडणुकीमध्ये) सहभाग असल्याचा दिसून येतो. वडवणी तालुक्यातील काही लोकांचा अपवाद वगळता बहुतांशी निवेदक राजकारणात म्हणजे निवडणुकीत सहभागी झाल्याचे दिसून आले नाही. राजकारण किंवा निवडणुकीमध्ये पैसा व जनसंपर्क आवश्यक असतो असे सांगतांना अनेक निवेदक आढळून आले.

उपाय योजना

संशोधन करणाऱ्या संशोधकाने मानवी समाजातील एखादी समास्या अथवा एखादा अभ्यास विषय निवडणे आणि त्या समस्येचा सर्वागिण अभ्यास करणे त्या संशोधकाचे कर्तव्य ठरते. निवडलेल्या समस्येचा विविध अंगाने अभ्यास करुन त्या अभ्यास विषयामधून ज्या काही समस्या जाणवतात त्या समस्येवर काही उपाय योजना सुचविणे हा खरा संशोधनाचा उद्देश असतो. ''वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामजिक व आर्थिक स्थितीचा एक समाज शास्त्रीय अभ्यास.'' या विषयाची निवड करुन बंजारा समाजाच्या ज्या काही समस्या निदर्शनास आल्या त्या समस्या सोडविण्यासाठी शासनाकडून अथवा समाजसेवी संघटनेकडून काही तरी प्रयत्न व्हायला पाहिजे. या प्रति सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे होत.

१) बंजारा समाजाची जी वस्तीस्थाने आहेत अशा ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक, व उच्चमाध्यमिक शाळा काढून त्या ठिकाणी चांगल्या शिक्षकाची नियुक्ती करावी.

२) उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरी भागात जावे लागते. त्यासाठी वाहतुकीची सेवा पुरविली जावी.

३) मुलीच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी स्वतंत्र मुलींच्या शाळा काढाव्यात.

४) आरोग्य विषयक सुविधा तांड्यापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी १० ते १२ तांड्यात मिळून प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करावी.

५) आर्थिक उन्नतीसाठी शासकिय पातळीवरुन बंजारा समाजासाठी विशेष योजनाची पूर्तता करावी.

६) प्रत्येक तांड्यावर पीण्याच्या पाण्याची नळयोजना करावी.

७) प्रत्येक तांड्यावर अंधश्रध्दा निर्मूलन केंद्राची स्थापना करावी.

अनुसूची क्र. □□□

: मुलाखत अनुसूची :

"वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा एक समाजशास्त्रीय अभ्यास."

: संशोधक :

प्रा. राठोड भिवराव जैसू

समाजशास्त्र विभाग

पद्मभूषण वसंतराव पाटील महाविद्यालय, पाटोदा,

जि. बीड.

निवेदकाचे नाव :----------

निवेदकाचा पूर्ण पत्ता :----------

निवेदकाचा धर्म :- १) हिंदू २) इस्लाम ३) ख्रिश्चन ४) जैन ५) शिख ६) इतर

निवेदकाचे वय :- १) २६ ते ३० २) ३१ ते ३५ ३) ३६ ते ४० ४) ४१ ते ४५ ५) ४५ च्या पुढे.

निवेदकाचे लिंग :- १) स्त्री २) पुरुष

निवेदकाचे शिक्षण :- १) निरक्षर २) साक्षर ३) प्राथमिक ४) माध्यमिक ५) उच्चमाध्यमिक ६) पदवी ७) पदव्युतर.

निवेदकांचा वैवाहिक दर्जा :- १) विवाहित २) अविवाहित ३) विधवा ४) विधुर ५) घटकस्फोटीत ६) परित्याक्ता

: कौटुंबिक आणि वैवाहिक माहिती :

१) कुटुंब प्रमुख कोण आहे ? :- १) स्त्री २) पुरुष

२) कुटुंबाचा प्रकार कोणता आहे. :- १) संयुक्त २) विभक्त

३) राहत्या घराचे स्वरुप. :- १) झोपडी २) कुडाचेघर ३) पत्रे ४) दगड-माती ५) चिरेबंदी ६) आर.सी.सी.

४) वापरात असलेल्या खोल्याची संख्या. :- १) एक २) दोन ३) तीन ४) चार ५) पाच ६) पाच पेक्षा जास्त

५) घरात असलेल्या वस्तु. :- १) टि.व्ही २) फ्रिज ३) शिलाई मशिन ४) हिटर ५) वॉशिगमशिन ६) मिक्सर ७) कपाट ८) रेडिओ ९) व्हि.सी.डी. १०) सी.डी. ११) टेपरेकॉर्ड १२) इस्त्री १३) फॅन १४) टेलीफोन १५) मोबाईल १६) गॅस १७) इतर.

६) घरातील सुविधा कोणकोणत्या आहेत. १) वीज २) नळ कनेक्शन ३) शौचालय ४) स्नानगृह ५) इतर.

७) कुटुंबात कोणती भाषा बोलली जाते. १) बंजारा २) मराठी ३) दोन्ही ४) इतर

८) आहाराचा प्रकार कोणता आहे. १) शाकाहरी २) मांसाहरी ३) दोन्ही

९) कुटुंबातील स्त्रियाचा दर्जा कसा आहे. १) श्रेष्ठ २) कनिष्ठ ३) मध्यम

१०) कुटुंब नियोजन शस्त्राक्रिया कोण करुन घेतात. १) स्त्री २) पुरुष

११) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कधी करावी असे वाटते. १) एकअपत्यानंतर २) दोनअपत्यानंतर ३) तीन अपत्यानंतर ४) चार अपत्यानंतर ५) चार पेक्षा जास्त अपत्यानंतर

१२) कोणते अपत्य जन्माला यावे असे वाटते. १) मुलगा २) मुलगी ३) दोन्ही

१३) मुलगाच जन्माला यावे असे का वाटते. १) वंशाचा दिवा २) सांभाळ करावा ३) संपती रक्षण

१४) कुटुंबात मुलगी जन्मास आली तर कसे वाटते. १) चांगले वाटते २) वाईट वाटते

१५) वाईट वाटण्याचे कारण काय आहे. १) हुंडा द्यावा लागतो २) दुसऱ्याघरी जाते ३) दुसऱ्याची वाईट नजर राहते ४) इतर.

१६) बंजारा समाजातील विवाहाचे स्वरुप. १) आधुनिक २) पारंपारिक

१७) बंजारा समाजात बालविवाहाची प्रथा आहे काय १) होय २) नाही.

१८) बाल विवाह न करण्याचे कारण काय आहे. १) समाजाची भिती २) कायद्याची भिती

१९) विवाह विषयक निर्णय कोण घेतात. १) कुटुंबप्रमुख २) कुटुंबातील सदस्य ३) स्वतः

२०) विवाह जुळणी पूर्वी मुला-मुलीच्या पसंतीचा विचार केला जातो काय ? १) होय २) नाही

२१) मुला-मुलीने आंतरजातीय विवाह करावा असे वाटते का ? १) होय २) नाही

२२) आंतर जातीय विवाह न करण्याचे कारण काय आहे १) समाजाची भिती वाटते २) जातपंचायतीची भिती वाटते ३) समाज वाळीत टाकतो.

२३) बंजारा समाजात हुंडा घेतला जातो काय ? १) होय २) नाही

२४) किती हुंडा घेतला जातो. १) १५००० ते २०००० २) २१००० ते ३०००० ३) ३१००० ते ४०००० ४) ४१००० ते ५०००० ५) ५०००० पेक्षा जास्त.

२५) हुंडा घेण्याचे कारण १) सामाजिक प्रतिष्ठा २) परंपरा ३) आर्थिकमदत.

: आर्थिक आणि सामाजिक माहिती :

१) आपल्या कडे शेती आहे काय ? १) होय २)नाही

२) शेतीचा प्रकार कोणता आहे १) बागायती २) कोरवाहू

३) शेती असेल तर किती एकर आहे ? १) ०१ ते ०२ एकर २) ०३ ते ०४ एकर ३) ०५ ते ०७ एकर ४) ०८ ते १० एकर ५) १० पेक्षा जास्त

४) शेतीसाठी लागणारे जलस्त्रोत कसे आहे. १) विहीर २) बोर ३) पाटाचे पाणी

५) शेतीसाठी लागणारी सर्व अवजारे आहेत काय ? १) होय २) नाही

६) कोणकोणती अवजारे आहेत. १) नांगर २) बळीनांगर ३) औत ४) तिफन

७) शेतीची मशागत कशा प्रकारे केली जाते. १) बैल २) ट्रॅक्टर

८) आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत. १) शेती २) शेतमजुरी ३) मजुरी ४) नोकरी ५) ऊसतोडणी

९) कर्ज काढण्याची गरज वाटते काय ? १) होय २) नाही

१०) कर्ज काढण्याचे कारण काय आहे. १) शेतीसाठी २) विवाहासाठी ३) घरबांधणीसाठी ४) नोकरीसाठी ५) शिक्षणासाठी ६) पशुखरेदीसाठी

११) कर्ज कोणाकडून घेतले जातात. १) बँक २) पतपेढी ३) सोसायटी ४) मित्र ५) सावकार

१२) घेतलेले कर्ज वेळेवर फेडले जाते काय ? १) होय २) नाही

१३) कर्ज न फेडण्याचे कारण. १) वार्षिक उत्पन्नात घट २) निसर्गाचा कोप ३) कौटुंबिक खर्चात वाढ.

१४) कुटुंबसक्ष्स भविष्यासाठी बचत करता काय ? १) होय २) नाही

१५) कोणत्या ठिकाणी बचत करता १) बँक २) पतपेढी ३) पोस्ट ४) एल. आय. सी.

१६) देवदेवतावर विश्वास आहे का ? १) होय २) नाही

१७) कोणत्या देवाला मानतात. १) सेवालाल महाराज २) जेतालाल महाराज ३) सामकीयाडी ४) सामतदादा ५) तुळजाभवानी ६) सतीमाता ७) कंकाळदेवी.

१८) देवदेवतांचा कोप होतो काय ? १) होय २) नाही

१९) दैवीकोपामुळे कोणते नुकसान होते. १) शारीरिक २) मानसिक ३) आर्थिक

२०) देवदेवतांना पशूबळी दिला जातो काय ? १) होय २) नाही

२१) कोणत्या पशूचा बळी दिला जातो. १) शेळी २) मेंढी ३) रेडा ४) कोबडा ५) बोकूड ६) इतर

२२) देवाला नवस करण्याची प्रथा आहे काय ? १) होय २) नाही

२३) नवस करण्याचे कारण काय आहे ? १) मुलबाळ होण्यासाठी २) संपती मिळण्यासाठी ३) नोकरीसाठी ४) व्यवसायासाठी ५) विवाह / लग्न होण्यासाठी

२४) उपवास करता काय ? १) होय २) नाही

२५) उपवास करण्याचे कारण काय आहे ? १) श्रध्दा २) परंपरा ३) वैज्ञानिक कारण ४) लोक सांगतात.

२६) जादुवर आपला विश्वास आहे काय ? १) होय २) नाही

२७) जादुमुळे होणारे नुकसान १) शारीरिक २) मानसिक ३) आर्थिक

२८) जादुकरणाऱ्या व्यक्तीबदल भित्ती वाटते काय ? १) होय २) नाही

२९) भुतबाधावर आपला विश्वास आहे काय ? १) होय २) नाही

३०) आजारपणात कोणाकडे उपचार होतात. १) डॉक्टर २) मांत्रिक ३) भगत ४) जादुगार

३१) आपला आवडता सण कोणता आहे. १) होळी २) दिवाळी ३) दसरा ४) नागपंचमी
५) गोकुळ आष्टमी ६) मंकर संक्रांत ७) इतर

३२) सांस्कृतिक कार्यक्रम कोणकोणते होतात. १) बंजारा भजन २) भारुड ३) किर्तन ४) गोंधळ

३३) नाटक, सिनेमा पाहता काय ? १) होय २) नाही

३४) नाटक, सिनेमा कोणकोण पाहता १) एकटे २) कुटुंबातील सदस्या सह.

: शैक्षणिक आणि राजकिय माहिती :

१) आपल्या मुला-मुलीने शिकावे असे वाटते काय ? १) होय २) नाही

२) मुला-मुलीने कुठपर्यंत शिकावे असे वाटते. १) प्राथमिक २) माध्यमिक ३) उच्चमाध्यमिक
४) पदवी ५) पदव्युतर

३) शिक्षणाचा फायदा जीवनात होतो काय ? १) होय २) नाही

४) शिक्षणाचा कोणता फायदा होतो असे वाटते. १) सामाजिक प्रतिष्ठा वाढते
२) व्यवसायकरता येतो ३) नोकरी लागते ४) कर्ज काढता येते

५) शिक्षणाचा फायदा होत नाही असे का वाटते. १) नोकरी मिळत नाही
२) नोकरीस पैसा द्यावा लागतो ३) वशिला लागतो

६) मुलींच्या शिक्षणासाठी अडचणी येतात काय ? १) होय २) नाही

७) कोणत्या अडचणी येतात १) जास्तशिक्षण जास्त हुंडा २) बाहेरगांवी पाठवता येत नाही
३) राहण्याची सोय नसते.

८) मुलींना शाळेत न पाठविण्याचे कारण काय १) घरकाम करावे लागते २) शेतात काम करावे लागते
३) मजुरी करावी लागते ४) शाळा लांब असते ५) खर्च परवडत नाही

९) मुलांच्या शिक्षणासाठी कोणती शाळा योग्य वाटते. १) आश्रमशाळा २) जि. प. शाळा
३) संस्थेची शाळा ४) खाजगी शाळा

१०) मुलांनी शिक्षणासाठी बाहेरगांवी जावे असे वाटते काय ? १) होय २) नाही

११) बाहेरगांवी जाण्याचे कारण काय आहे. १) शिकवणी असतात
२) शहराचे वातावरण चांगले असते.

१२) मुलांना बाहेरगांवी पाठवूनये असे का वाटते. १) वाईट संगत लागते २) जास्त खर्च होतो
३) नोकरीची हमी नाही.

१३) आपल्या गांवात / तांड्यात शाळा आहे काय ? १) होय २) नाही

१४) आपल्या गांवात / तांड्यात कितवी पर्यंत शाळा आहे ? १) १ ली ते ४ थी २) १ ली ते ७ वी ३) १ ली ते १० वी पर्यंत

१५) शाळेत शिक्षक दररोज येतात काय ? १) होय २) नाही

१६) आपणास राजकारणाची जाणीव आहे काय ? १) होय २) नाही

१७) मतदानाची जाणीव आहे काय ? १) होय २) नाही

१८) मतदान करण्याचे कारण काय आहे ? १) हक्क २) उत्सुकता ३) आर्थिक लाभ

१९) राजकिय पक्षाविषयीचे ज्ञान आहे काय ? १) होय २) नाही

२०) कोणत्या पक्षाबदल ज्ञान आहे. १) कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस २) भा.ज.पा. आणि शिवसेना ३) जनता दल ४) आर. पी. आय. ५) इतर

२१) निवडणुकीत भाग घ्यावा असे वाटते काय ? १) होय २) नाही

२२) निवडणुकीत भाग घेण्याचे कारण १) देशाचा विकास २) जातीचा विकास ३) गांवचा विकास ४) आर्थिक विकास

२३) स्वजातीच्या लोक प्रतिनिधीचा फायदा होतो काय ? १) होय २) नाही

२४) काय फायदा होतो १) शासकिय योजनांची माहिती कळते २) आर्थिक फायदा होतो ३) सामाजिक फायदा होतो.

२५) शासन चालवण्यास कोणता पक्ष योग्य आहे. १) कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस २) भा.ज.पा. आणि शिवसेना ३) आमआदमी पक्ष

निवेदकाची सही / अंगठा

संदर्भ ग्रंथ सूची

1) Atal Yoges - Adivasi Bharat (1965) New Delhi.

2) Bailey F.G. Carte and Economics Frontier, A Villege in High Land. Orissa (1958) Oxford University Press Bombay.

3) Broom & Selznick - Sociology A text Adopted Reading (1957) Row Peterson and Company white plain - New York.

4) Bowman, Henry - Marriage Maderns (1948 & 1960) Mc Graw Hill Com pany, New York.

5) C.H. Colley - Human Nature And Social Order (1964) Schocken Book New York.

6) Cences of India-Mother Tongue (1961) P.No.-

7) Grierson G. A. & Lunhudyiv Survey of India (1967) Delhi.

8) Glock C. Y. & Stark R. Religion & Society in India (1965) Rand Mc Nally Chicago.

9) Mujumdar D. N. The Fortune of Primitive Tribes (1964), Bombay.

10) paul B. Herton & Chester C Hunt `Sociology (1964) Mc. Graw Hill Book Company, New York.

11) Russel R.V. & Hiralal R. B. Tribe and Caste of the central provincess of India (1975) S. K. Jain, Rajdhani Bank centre Delhi.

12) Report of india All Banjara Study Team -

13) Tylor Edward B. - Primitive Culture (1873) murry Landon.

14) Yinger Milton - Religion, Society and The Individual An Introducation to Sociology (1957)McMillan New York.

१५) डॉ. शैलजा देवगांकर - अदिवासी विश्व (२००१), आनंद प्रकाशन, नागपूर.

१६) श्री. रामनाथ चव्हाण - जाती आणि जमाती (१९८९), मेहता पब्लिकेशन, पुणे.

१७) डॉ. सर्जेराव सांळुखे - समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना (१९९६), नरेंद्र प्रकाशन, पुणे - २.

१८) डॉ. संजय भा. साळुंके - गोडं (२००२), संवेदन प्रकाशन, औरंगाबाद.

१९) डॉ. प्रकाश बोबडे / भोईटे - सामाजिक संस्था (१९९४), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२०) डॉ. डी. डी. शर्मा - भारत में समाज रचना एवं परिवर्तन (१९९७), साहित्य भवन पब्लिकेशन, औरंगाबद.

२१) डॉ. दा. धो. काचोळे - भारतीय समाज रचना (१९९८), कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

२२) डॉ. श्रीराम शर्मा - बंजारा समाज (१९८३), दक्षिण प्रकाशन, गांधी बाजार, हैद्राबाद.

२३) डॉ. यशवंत जाधव - बंजारा जाती : समाज और संस्कृती (१९९२), वाणी प्रकाशन, दिल्ली.

२४) प्रा. देशपांडे / बर्दापूरकर - भारतीय समाज रचना (१९९४), विद्या बुक्स, औरंगाबाद.

२५) प्रा. माणिक माने - भारतीय समाज रचना (१९९७), विद्या प्रकाशन, नागपूर.

२६) श्री. रामनाथ चव्हाण - भटक्या विमुक्ताचे अंतरंग (१९८९), सुगावा प्रकाशन, पुणे.

२७) श्री. कालेलकर गोविंद मंगेश - मुंबई इलाख्यातील जाती (१९९५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२८) श्री. लक्ष्मण माने - विमुक्तायन - (१९९७) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई.

२९) त्रि. ना. अत्रे - गांवगाडा (१९९५) ह.अ. भावे, सेनापती बापट मार्ग, पुणे.

३०) त्रि. ना. अत्रे - गुन्हेगार जाती (१९११), ह.अ.भावे, सेनापती बापट मार्ग, पुणे.

३१) डॉ. प्रकाश बोबडे / लोटे - सामाजिक मानवशास्त्र (१९९१), पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

३२) प्रा. कृष्णकुमार पुजारी - भारतीय समाज रचना (१९९४), कल्पना प्रकाशन, नांदेड.

३३) संगवे विलास - समाजिक मानवशास्त्र (१९७६), पॉप्युलर मुंबई.

३४) पिंगळे भिमराव - वनवासी उपेक्षित जग (१९९०), अभिनव प्रकाशन, बीड.

३५) आ.ह. साळुंखे - धर्म की धर्मा पलीकडे (१९९८), महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, पुणे.

३६) गारे गोविंद - अदिवासाचे शिक्षण (१९९७), साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

३७) व्हि.के.तिवारी - भारत की जनजातीयाँ - (१९९८), हिमालय पब्लिकेशन, मुंबई.

३८) कै. बळीराम हिरामन पाटील - गोरं बंजारे लोकांचा इतिहास (१९१३), यवतमाळ.

३९) श्री. पांडूरंग कच्छेश्वर आंधळे (पाटील) - वनजारी - बनजारी (१९९९), सुरकिर्ती प्रकाशन, नाशिक.

४०) प्रा. प्रेमसिंह जाधव - बंजारो का महान क्षेत्र पोहरा देवी (२००४), बंजारा कमल प्रकाशन, औरंगाबाद.

४१) सोपान गाडे - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक (२००२), अविष्कार प्रकाशन, पुणे.

४२) श्री. रमेश राठोड - श्री. संत सेवालाल महारांचा संक्षिप्त इतिहास (२००२), रविश प्रकाशन, नागपूर.

४३) संत इश्वरसिंग महाराज - बंजारा इश्वर अमृतवाणी (१९७५), बंजारा कमल प्रकाशन, औरंगाबाद.

४४) प्रा. मोतीराज राठोड - गोर बंजारा जन जाती का इतिहास (२००३), विद्या प्रकाशन, कानपूर.

४५) श्री. आर.एल.लामन - लमाण-(२००८), अंजली प्रकाशन, औरंगाबाद.

४६) डॉ. प्रदिप आगलावे - सामाजिक मानवशास्त्र (१९९८), विद्या प्रकाशन, नागपूर.

४७) प्रा. मोतीराज राठोड - गोर बंजारा जन जाती का इतिहास (२००३), विद्या प्रकाशन, कानपूर.

४८) डॉ. गणपत राठोड - बंजारा लोक गितों का सास्कृतिक अध्ययन (२००२), चंद्रलोक प्रकाशन, कानपूर.

४९) प्रा. भाई प्रेससिंह राठोड - बंजारा जागृतीकी दिशाएँ (२००४), बंजारा कलम प्रकाशन, औरंगाबाद.

५०) प्रा. मातोराज राठोड - गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम (२००४), दुर्गादास गिरी प्रकाशन, औरंगाबाद.

५१) श्री. रमेश राठोड - बंजारा गोत्राची उत्पत्ती (२००२), रविश प्रकाशन, नागपूर.

५२) श्री. हरिभाऊ राठोड - लमाण - बंजारा आणि बंजारी (१९९४), सुबोधी प्रकाशन, मुंबई.

५३) प्रा. मोतीराज राठोड - गोर बंजारा वंशाचा इतिहास (२००५), रामसिंग भानावत, मेमोरियल ट्रस्ट, पुणे.

५४) प्रा. मोतीराज राठोड - सिंधू संस्कृती पूर्व गोर संस्कृती (२००४), कलम प्रकाशन, औरंगाबाद.

५५) प्रा. भाई प्रेमसिंह जाधव - श्रीसंत इश्वरसिंग बाबाजी (२००२), बंजारा कमल प्रकाशन, औरंगाबाद.

५६) डॉ. सौ. रुक्मिणी पवार - बंजारा लोकजीवन पध्दती (२००५), कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

५७) जोशी महादेव शास्त्री -भारतीय संस्कृती कोश खंड सहवा (१९७०), पुणे.

मासीक / साप्ताहिक

५८) श्री. दिगंबर राठोड - मासीक - बंजारा एकता (डिसेंबर २०००- २००१), अंबाजोगाई.

५९) श्री. किसन पवार - मासीक - बंजारा एकता (मार्च २००१ ते २००३), अंबाजोगाई.

६०) प्रा. रमेश राठोड - मासीक - बंजारा नायक (जाने २००५ ते २००८), परळी वै.

६१) प्रा. विष्णु जयराम चव्हाण - साप्ताहिक - गोरमाटी (जुन २००१ ते २००२), परळी वै.

६२) श्री. जी. एन. वडते - साप्ताहिक - बंजारा पुकार (१९९१ ते २००४), नांदेड.

६३) श्री. मांगीलाल हरसिंग राठोड - मासीक - बंजारा हिल्स (१९९१ ते २००४), हैद्राबाद.

६४) प्रा. सुनंदा विनोद पाटील - लोकराज्य (जून २००८).

६५) श्री. महाडीक एस. बी. योजना (जुलै - २००८).

Journals / Perodicals

66) Social Action - Londhi Road, New Delhi.

67) India Today - Mumbai

68) साधना - सदाशिव पेठ, पुणे.

69) समाज प्रबोधन पत्रिका - बिंदु चौक, कोल्हापुर

70) प्रौढ शिक्षा - 17 वी इंद्रप्रस्थ, महात्मा गांधी मार्ग, नई दिल्ली.

71) लोकराज्य - जनसंपर्क महासंचालनायल, मंत्रालय, मुंबई.

72 शिक्षण संक्रमण - हिमालय इस्टेट, शिवाजी नगर, पुणे.

73) यशमंथन - राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.

74)	सहकारी महाराष्ट्र	-	5 बी. जे. रोड, पुणे.
75)	अर्थबोध पत्रिका	-	168/21-22 सेनापती बापट मार्ग, पुणे.
76)	अर्थसंवाद	-	शांती प्लाझा, बी-9 880/881 शनिवार पेठ, सातारा.
77)	समीक्षा	-	3220-21 जटवाडा, नेताजी सुभाष मार्ग, दरियागंज, नई दिल्ली. 110002.
78)	समकालीन भारतीय साहित्य	-	स्वामी मंदिर मार्ग, नई दिल्ली.
79)	योजना	-	भारत सरकार नई दिल्ली.
80)	नव अनुष्टुभ	-	शिवाजी नगर, विठोवाडी मार्ग, मु. पो. देवळा नाशिक.

वर्तमानपत्रे

81)	दै. लोकमत	82)	दै. समाचार
83)	दै. लोकमत टाईम्स	84)	दै. दिव्या भारती
85)	दै. सकाळ	86)	दै. सामना
87)	दै. महाराष्ट्र टाईम्स	88)	दै. लोकसत्ता
89)	दै. पुण्यनगरी	90)	दै. मुंबई चौफेर
91)	दै. एकमत	92)	दै. भास्कर